# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १३/२००५.** **दिनांक १८.०९.२००५.**
**स्थळ - शिर्डी कार्यालय.** **वेळ- दुपारी २.०० वाजता.**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे शनिवार दिनांक १० सप्टेबर, २००५ रोजी आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील एसएसएस-वशी-०४-९६४२-२००५,दि. ८ सप्टेबर,२००५ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविणेत आले होते. परंतू सदरहू सभा काही अपरिहार्य कारणास्तव दि.१० सप्टेंबर,२००५ ऐवजी रविवार दि.१८सप्टेंबर, २००५ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित करणेत आली असलेबाबत सर्व सदस्यांना जा.नं.एसएसएस-वशी-०४-९७६२-२००५, दि. १० सप्टेंबर, २००५ चे पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा रविवार दि.१८ सप्टेंबर,२००५ रोजी दुपारी ०२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष | ०२. | मा. श्री शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष |
| ०३. | मा. श्री. राधाकृष्ण एकनाथ विखे पाटील. | ०४. | मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग |
| ०५. | मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे. | ०६. | मा.श्री.प्रकाश रामदास काळे. |
| ०७. | मा. श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव. | ०८. | मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे. |
| ०९. | मा. श्रीमती रिम्पल लोहिया | १०. | मा. डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर. |
| ११. | मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा | १२. | मा. श्री. अशोक भिमाशंकर खांबेकर. |
| १३. | मा. डॉ. पी. एल. तिवारी. | १४. | मा.श्री.कैलास गोविंदराव कोते. |

मा. श्री. भाऊसाहेब रा. वाकचौरे,
कार्यकारी अधिकारी.

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबतच्या मा.श्री समि खतिब, मा.श्री रमाकान्त गणेश कर्णिक, मा. श्री. कृष्णाचन्द्र श्यामसुन्दर पाण्डेय यांचेकडून प्राप्त पत्राची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

सभेच्या सुरुवातीस मा.उपाध्यक्ष यांनी खालीलप्रमाणे दुखवट्याचा ठराव मांडला व तो सर्वानुमते संमत करण्यात आला.

" मा.अध्यक्ष श्री जयंत मुरलीधर ससाणे यांचे वडील कै.मुरलीधर सखाराम ससाणे यांचे दिनांक २२.०८.२००५ रोजी वयाच्या ७३ व्या वर्षी दुःखद निधन झाले.

तसेच मा.विश्वस्त श्री पांडुरंग गमाजी अभंग, यांचे बंधू कै.भानुदास गमाजी अभंग यांचे दिनांक २४.०८.२००५ रोजी अल्पशा आजाराने वयाच्या ६० व्या वर्षी दुःखद निधन झाले."

मा.श्री ससाणे व मा.श्री अभंग यांचे कुटूंबियांचे दुःखात सर्व विश्वस्त व संस्थानचे कर्मचारी सहभागी आहोत"

यानंतर या सभेने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.

यानंतर संस्थानचे विश्वस्त मा.आमदार.श्री राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील यांची अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर अध्यक्ष म्हणून निवड झालेबद्दल संस्थानचे अध्यक्ष मा.श्री जयंत मुरलीधर ससाणे व माजी आमदार मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष यांनी त्यांचा शॉल व श्रीफळ देऊन सत्कार केला .

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१.** **व्यवस्थापन समितीचे दि.०९.०७.२००५ व दि.१८.०७.२००५ रोजी अनुक्रमे शिर्डी व मुंबई येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे तसेच दिनांक ०६.०८.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.४७७** व्यवस्थापन समितीचे दि.०९.०७.२००५ व दि.१८.०७.२००५ रोजी अनुक्रमे शिर्डी व मुंबई येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे तसेच दिनांक ०६.०८.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करतांना खालीलप्रमाणे दुरूस्त्या करण्यात आल्या.

**दि.०९.०७.२००५-**

**०१) निर्णय क्र.२५९ मध्ये शेवटी**

"यावर सविस्तर चर्चा होऊन, याकामासाठी आर्किटेक्ट निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर यांची नेमणूक करणेस व निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली. तसेच नगराध्यक्ष मा.श्री कैलास कोते यांचे विनंतीवरुन सदर परीसरातील नागरिकांसाठी येण्या-जाण्याकरिता एक लहान गेट ठेवण्यास मान्यता देण्यात आली. "

**या ऐवजी**

"यावर सविस्तर चर्चा होऊन, या कामासाठी आर्किटेक्ट निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर यांची नेमणूक करणेस व निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली. तसेच नगराध्यक्ष मा.श्री कैलास कोते

यांचे विनंतीवरुन सदर परिसरातील नागरिकांना येण्या-जाण्याकरिता एक लहान गेट ठेवण्यास मान्यता देण्यात आली. सदरहू निर्णयास मा.विश्वस्त डॉ.एकनाथ बी.गोंदकर यांनी विरोध दर्शविला. परंतू सदर जागेतुन रस्ता ठेवण्यास यापुर्वी व्यवस्थापन मंडळाने मान्यता दिली आहे. त्याप्रमाणे रस्ता ठेवण्यात यावा असे मा.विश्वस्त श्री.कैलास कोते यांनी सांगितले. याबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी समक्ष जागेवर पहाणी करुन निर्णय घ्यावा असें ठरले." (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**०२) निर्णय क्र.२६३ मध्ये शेवटी-**

"या विषयावर चर्चा होत असताना, सध्या सुरु असलेल्या (धर्मशाळेतील) रुग्णालयातील मेडिकल, सर्जिकल व आर्थोपेडिक या विभागातील ७० खाटा नुतनीकरण केलेल्या नवीन रुग्णालयात स्थलांतरीत करणेबाबत मा.श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष, मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.विश्वस्त श्री.कैलास गोविंदराव कोते यांनी निर्णय घ्यावा, असें ठरलें. "

**या ऐवजी**

"या विषयावर चर्चा होत असताना, सध्या सुरु असलेल्या (धर्मशाळेतील) रुग्णालयातील मेडिकल, सर्जिकल व आर्थोपेडिक या विभागातील ५० खाटा नुतनीकरण केलेल्या नवीन रुग्णालयात स्थलांतरीत करणेबाबत मा.श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष, मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.विश्वस्त श्री.कैलास गोविंदराव कोते यांनी निर्णय घ्यावा, असें ठरलें. "

(कार्यवाही-व. प्रशासक, रुग्णालये, वैद्यकीयअधिक्षिका, रूग्णालय.)

**०३) निर्णय क्र.३०० मध्ये शेवटी-**

"तथापि,मौजे डिग्रस मालुंजे, ता.संगमनेर, जि.अहमदनगर, येथे सद्‌गुरु श्री गंगागिरीजी महाराज (सराला बेट) यांचा १५८ वा अखंड हरिनाम सप्ताह दि.१०/०८/२००५ ते दि.१७/०८/२००५ या कालावधीत होणार असून या धार्मिक कार्यक्रमासाठी संस्थानकडून शिधा स्वरुपात मदत मिळावी अशी विनंती केली असून, एक विशेष बाब म्हणून त्यांना रुपये ५० हजारापर्यंत वस्तूरुपाने मदत देण्यात यावी, असें ठरलें. "

**या ऐवजी**

"तथापि,मौजे डिग्रस मालुंजे, ता.संगमनेर, जि.अहमदनगर, येथे सद्‌गुरु श्री गंगागिरीजी महाराज (सराला बेट) यांचा १५८ वा अखंड हरिनाम सप्ताह दि.१०/०८/२००५ ते दि.१७/०८/२००५ या कालावधीत होणार असून या धार्मिक कार्यक्रमासाठी संस्थानकडून शिधा स्वरुपात मदत मिळावी अशी विनंती केली असून, एक विशेष बाब म्हणून त्यांना रुपये ५० हजारापर्यंत वस्तूरुपाने मदत देण्यात यावी, असें ठरलें. सदरहू निर्णयास मा.विश्वस्त डॉ.एकनाथ बी.गोंदकर यांनी विरोध दर्शविला".

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**०४) निर्णय क्र.३३०- शेवटचा परिच्छेद-**

यावर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, श्री मोहन यादव हे ग्रंथपाल या पदावर नियुक्त असले तरी दिनांक २७.०८.२००४ पासून ते प्रत्यक्ष जनसंपर्क विभागाची कामे व पूर्णपणे जबाबदारी सक्षमपणे पार पाडीत आहेत. जनसंपर्क अधिकारी या पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता व अनुभव त्यांचेकडे आहे. संस्थानमध्ये ते एकमेव जर्नालिझम पदविकाधारक कर्मचारी आहेत हे विचारात घेऊन दिनांक १०.०७.२००५ पासून ग्रंथपाल या पदाऐवजी श्री यादव यांचे पदनांमात जनसंपर्क अधिकारी असा बदल करुन त्यांना या पदाची रुपये ५५००-१७५-९००० ही वेतनश्रेणी देण्यात यावी असे ठरले."

**या ऐवजी**

" यावर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, श्री मोहन यादव हे ग्रंथपाल या पदावर नियुक्त असले तरी दिनांक २७.०८.२००४ पासून ते प्रत्यक्ष जनसंपर्क विभागाची कामे व पूर्णपणे जबाबदारी सक्षमपणे पार पाडीत आहेत. जनसंपर्क अधिकारी या पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता व अनुभव त्यांचेकडे आहे. संस्थानमध्ये ते एकमेव जर्नालिझम पदविकाधारक कर्मचारी आहेत हे विचारात घेऊन दिनांक १०.०७.२००५ पासून ग्रंथपाल या पदाऐवजी श्री यादव यांचे पदनांमात जनसंपर्क अधिकारी असा बदल करुन त्यांना या पदाची रुपये ५५००-१७५-९००० ही वेतनश्रेणी देण्यात यावी. तसेच जनसंपर्क अधिकारी या पदासाठी मंजूर असलेल्या रुपये ५५००-९००० या वेतनश्रेणी ऐवजी रुपये ६५००-१०५०० असा वेतनश्रेणीत बदल करणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा. या प्रस्तावास शासनाची मान्यता प्राप्त झालेनंतर त्यापुढे श्री.यादव यांना रुपये ५५००-९००० ऐवजी रुपये ६५००-१०५०० ही वेतनश्रेणी देण्यात यावी," असें ठरलें.

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना )

**दि.१८.०७.२००५-**

**०५) निर्णय क्र.३६५ मध्ये शेवटी-**

"वरील सर्व मुद्दे विचारात घेऊन संस्थानचे शपथपत्र सादर करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. "

**या ऐवजी**

"वरील सर्व मुद्दे विचारात घेऊन संस्थानचे शपथपत्र सादर करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. या कामी मा.अध्यक्ष,मा.उपाध्यक्ष यांनी मा.ॲडव्होकेट धोर्डे यांचेशीचर्चा करावी "

(कार्यवाही-प्रशासन शाखा वशी-२)

**०६) निर्णय क्र.३८३ वगळण्यात यावा**

**दि.०६.०८.२००५-**

**०७) निर्णय क्र.३९४मध्ये शेवटी-**

या खरेदी संबंधी नमुन्यासह निविदा धारकांना बोलावण्यात आले होते. परंतु नमुन्यासह फक्त खालील निविदाधारक उपस्थित होते.

१) Qualisurge, Pune

२) Maureen, Aurangabad

यांच्या नमुन्यांची पाहणी करण्यात आली. नुकत्याच झालेल्या पावसामुळे इतर निविदाधारकांची अडचण लक्षात घेऊन यासंबंधी या समितीने प्रत्यक्ष पाहणी करुन योग्य मालाची निवड करुन वाटाघाटी कराव्यात असे ठरविण्यात आले.

**या ऐवजी**

०१) "ब" गटातील निविदाधारकांच्या एकंदर झालेल्या पहाणीवरुन नं.०१ O.T Autoclave Horizontal High speed यासाठी चार निविदाधारकांपैकी मे.एम.शहा, पुणे यांचा माल उत्कृष्ट आढळला त्यांनी निविदेनुसार प्रत्येक नगाची किंमत रुपये १,४१,५००.०० सादर केली होती. त्यावर वाटाघाटीनंतर २% सवलत लेखी स्वरुपात सादर केली आहे. त्यांना अशा ०६नगांचा पुरवठा आदेश देण्यात यावा असे ठरले.

०२) O.T Sterilizers Electric-यासंबधात पाच निविदाधारकांनी निविदा सादर केल्या होत्या सर्वात मोठ्या साईजच्या स्टरीलायझरची निविदा मे.एम.शहा यांनी भरलेली आहे. इतरांच्या साईज लहान आहेत. तांत्रीक क्षमता योग्य असल्याने मे.एम.शहा यांच्या स्टरीलायझरची निवड करण्यात आली. त्यांनी प्रत्येक नगाला रुपये ८,७५०.०० असा दर दिला असून वाटाघाटीव्दारे त्यात २% सवलत लेखी स्वरुपात सादर केली आहे. त्यांना अशा दहा नगाचा पुरवठा आदेश देण्यात यावा.

०३) "ब" गटातील उर्वरित नं. ०३ ते १५ या नगासाठी मे.वॉर्डन सर्जिकल मुंबई यांचा माल चांगला असल्याचे मत झाल्याने ते कोटेशनमधील दरावर अजून काही सूट देऊ शकतात किंवा कसे याबाबत विचारणा करुन पुरवठा आदेश देण्यात यावा असें ठरले.

**०८) निर्णय क्र.३९५ मध्ये शेवटी-**

"रुग्णालयासाठी लागणाऱ्या फर्निचर, गाद्या इत्यादीचे नमूने आणावे, फक्त २ नमुन्यासहित हजर होते.

१) Quqlisurge, Pune

२) Satpuda, Nashik

यातील गाद्यांसाठी वरील व्यतिरिक्त खालील २ हजर होते.

३) Auto Foam, Aurangabad

४) Yashodeep, Pune

वरील निविदाधारकांनी आणलेल्या नमुन्यांची नोंद घेण्यात आली.

इतर निविदाधारक पावसामुळे नमूने आणू शकले नाहीत, तरी त्यांचे नमुन्यांची समितीतर्फे जागेवर पाहणी करुन वाटाघाटीव्दारे पसंत पडलेल्या मालाचे खरेदीचा निर्णय घ्यावा असे ठरले. "

**यापूढे या विषयावर आजच्या सभेत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला**

"फर्निचर खरेदी संबंधात मा.विश्वस्त डॉ.पी.एल. तिवारी, यांनी मे.मेटल बेड इंडिया प्रा.लि., यांचेकडून फर्निचर घ्यावे असे सुचविले होते. मे.मेटल बेड इंडिया प्रा.लि., यांनी त्यांचे एकूण खरेदीवर ८% सूट देऊ केलेली आहे. तसेच सदर फर्निचर हे इतर पुरवठादारांपेक्षा उत्कृष्ट आहे. त्यामुळे सदर फर्निचर खरेदी करावे अशी सूचना केली आहे. मे.मेटल बेड इंडिया प्रा.लि., यांचेकडून खरेदी करावयाचे एकूण फर्निचरची किंमत रुपये ४७,५०,१०७/- इतकी आहे, खरेदीस मान्यता देण्यात आली. "

**०९) निर्णय क्र.३९६ मध्ये शेवटी-**

"कार्यालयीन फर्निचरसाठी १० निविदा धारकांना नमुने आणण्यास सांगण्यात आले होते. यातील कोणीही नमूने आणू शकले नाहीत. त्यांच्या मालाची लवकरात लवकर जागेवर पाहणी करुन उत्तम मालासंबंधी वाटाघाटी कराव्यात असा निर्णय झाला. यातील वस्तू योग्य दर्जाच्या न आढळल्यास थेट नावाजलेल्या गोदरेज, ऑलविन इत्यादी.कंपनी बरोबरही वाटाघाटी करता येतील असे ठरले."

<u>या ऐवजी</u>

" गट ड प्रकारच्या कार्यालयीन फर्निचरसाठी १० निविदाधारकांनी निविदा भरल्या होत्या. त्यातील काहींची पहाणी केली असता त्यांचे साहित्य योग्य दर्जाचे आढळले नाही. उरलेल्याची पहाणी करुन फर्निचर योग्य नसल्याने उत्कृष्ट अशा गोदरेज कंपनीकडून समक्ष निविदा घेऊन खरेदी करावी असे मत मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी व मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर नोंदविले त्यानुसार त्यांना टेंडरमध्ये मागणी केलेल्या १ ते १३ प्रकारच्या फर्निचरचा पुरवठा आदेश देण्यात यावा असें ठरले."

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**१०) निर्णय क्र.४२४ मध्ये शेवटी-**

" यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानकडे जुनी वापरात नसलेली मेल्ट्रॉन ईपीएबीएक्स टेलिफोन सिस्टम दुरुस्त करुन जंगली महाराज आश्रम, कोकमठाण यांना देणगी म्हणून देण्यात यावी असें ठरले."

**याऐवजी**

" यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानकडे जुनी वापरात नसलेली मेल्ट्रॉन ईपीएबीएक्स टेलिफोन सिस्टम (मध्यवर्ती मूळ यंत्रणा) दुरस्त करुन संस्थानचे नियोजित प्रकल्पासाठी वापरण्यात यावी असे ठरले."

(कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख)

**११) निर्णय क्र.४२५ मध्ये शेवटी-/-**

" तरी डि-राम यांचे टेंडर डॉक्युमेंटप्रमाणे खालील पुरवठादारांकडून कोटेशन मागवून सिस्टम खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रुपये ११,१५,०००/-चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली."

**याऐवजी**

" तरी डि-राम एंटरप्रायजेस, मुंबई यांचे टेंडर डॉक्युमेंटप्रमाणे पुरवठादारांकडून कोटेशन मागवून सिस्टम खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रुपये <u>११,५०,०००</u>/-चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. "

(कार्यवाही-ध्वनीक्षेपण विभाग प्रमुख)

**१२) निर्णय क्र.४३८ मध्ये शेवटी-**

टोलनाका- पथकर बंद करणेसाठी विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदूषण नियंत्रण कर बंद करणेसाठी नगर पंचायत,शिरडी अनुदान देणेबाबत विचार करणे झालेस संस्थानलाही शासनाची मान्यता घ्यावी लागेल. टोलनाका **उत्पन्न-वजा** खर्च असे ४५,६१,९९०/- - ६,००,०००/- = **रुपये ३९,६१,९९०/-** निव्वळ येणारे उत्पन्न हिशोबी धरून त्याबाबतची माहिती प्राप्त करून घेऊन त्या आधारे निव्वळ येणारे उत्पन्नाचे अनुषंगाने अनुदान ठरवावे लागेल.

श्री साईबाबा संस्थान शिरडी यांचे मालकीचे इमारतीवर नगरपंचायत यांचे मार्फत मालमत्ता कर व त्या अनुषंगाने इतर कर उदा. शिक्षण कर, स्वच्छता कर, रोजगार हमी कर यांची साधारणतः रुपये २६,००,०००/- मात्रची आकारणी होते. सदर करातून सवलत मिळावी.याबाबतही संस्थानने यापूर्वी नगरपंचायतीस विनंती केली असून, त्याबाबत मा. कोर्टात टॅक्स अपिले दाखल असून अपील दाखल करणेकामी टॅक्सचा भरणा करावा लागतो. सदर टॅक्समधून संस्थानला वगळणेस नगर पालिकेस विनंती करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी शिरडी नगरपालिका यांना द्यावयाचे रकमेबाबत मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर व स्थानिक विश्वस्त यांचे समितीने याबाबत अंतिम निर्णय घ्यावा असें ठरलें.

**याऐवजी**

टोलनाका- पथकर बंद करणेसाठी विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदूषण नियंत्रण कर बंद करणेसाठी नगर पंचायत,शिरडी अनुदान देणेबाबत विचार करणे झालेस संस्थानलाही शासनाची मान्यता घ्यावी लागेल. टोलनाका **उत्पन्न-वजा** खर्च असे ४५,६१,९९०/- - ६,००,०००/- = **रुपये ३९,६१,९९०/-** निव्वळ येणारे उत्पन्न हिशोबी धरून त्याबाबतची माहिती प्राप्त करून घेऊन त्या आधारे निव्वळ येणारे उत्पन्नाचे अनुषंगाने अनुदान ठरवावे लागेल. <u>असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.</u>

<u>तसेच</u> श्री साईबाबा संस्थान शिरडी यांचे मालकीचे इमारतीवर नगरपंचायत यांचे मार्फत मालमत्ता कर व त्या अनुषंगाने इतर कर उदा. शिक्षण कर, स्वच्छता कर, रोजगार हमी कर यांची साधारणतः रुपये २६,००,०००/- मात्रची आकारणी होते. सदर करातून सवलत मिळावी.याबाबतही संस्थानने यापूर्वी नगरपंचायतीस विनंती केली असून, त्याबाबत मा. कोर्टात टॅक्स अपिले दाखल असून अपील दाखल करणेकामी टॅक्सचा भरणा करावा लागतो. सदर टॅक्समधून संस्थानला वगळणेस नगर पालिकेस विनंती करता येईल <u>असाही</u> प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

[illegible]

"[illegible]

[illegible] २००७ [illegible]

[illegible] २००७ [illegible]

[illegible] २००७ [illegible]

[illegible] २००७ [illegible]

[illegible] २००७ [illegible]

[illegible] २००७ [illegible]

**०८. माहे जुलै, २००५ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ४७८. (H).** माहे जुलै, २००५ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या लिलावाद्वारे झालेल्या विक्रीच्या अहवालाची, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०९. माहे जुलै, २००५ मध्ये मा. कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/- चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ४७८. (I).** माहे जुलै, २००५ मध्ये रुपये २५, ०००/- चे मर्यादेत मा. कार्यकारी अधिकारी, यांचे मान्यतेने विविध आवश्यक बाबींवर करण्यात आलेल्या खर्चाची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**१०. रुग्णालयातील रुग्णांना माहे जुलै, २००५ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ४७८. (J).** माहे जुलै,२००५ मध्ये रुग्णालयातील रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०३. गुंतवणूकी बाबत.**

**निर्णय क्र. ४७९.** माहे सप्टेंबर,२००५ मध्ये मुदत पूर्ण होणाऱ्या व इतर उपलब्ध गुंतवणूकपात्र रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | बँकेचे नांव | दिनांक | मुदतीअंती उपलब्ध रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| ०१. | युनियन बँक ऑफ इंडिया, राहाता | ०२.०९.२००५ | १,७०,५४,९१२.०० |
| ०२. | युटीआय बँक, नाशिक | ०६.०९.२००५ | १,७४,९६,०५६.०० |
| ०३. | माहे सप्टेंबर,२००५ मध्ये, दैनंदिन खर्च वजा जाता गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी रक्कम | | १,५०,००,०००.०० |
| | | एकूण- | **४,९५,५०,९६८.००** |

उपरोक्त उपलब्ध रकमेपैकी रुपये १ कोटी स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा राहुरी, रुपये १ कोटी सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा खंडाळा ता.श्रीरामपूर यांचेकडे तीन वर्ष मुदतीसाठी द.सा.द.शे.६.७५% व्याजदराने गुंतविण्यात यावी. तसेच सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचे मशिनरी खरेदीकामी युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा राहाता यांचेकडे पतपत्रात गुंतविण्यात यावी व उर्वरित रक्कम संस्थानचे दैनंदिन खर्चासाठी वापरण्यात यावी असें ठरलें. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०४. संस्थानचे विविध बँकेकडे असलेली एकूण ०९ बचत खाते बंद करणेबाबत**

**निर्णय क्र.४८०.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे दैनंदिन आर्थिक व्यवहार करणेकामी कामकाजाचे सोईचे दृष्टीने विविध बँकांमध्ये वेळोवेळी बचत खाती उघडण्यात आलेली आहेत. त्यांचा तपशील पुढील प्रमाणे :-

| अ.नं. | बँक / शाखेचे नांव | बचत खाते क्रमांक |
|---|---|---|
| ०१. | युनियन बँक ऑफ इंडिया, विस्तारीत कक्ष - शिर्डी | १०१ |
| ०२. | युनियन बँक ऑफ इंडिया, राहाता | २५९ |
| ०३. | सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शिर्डी | १ |
| ०४. | आंध्र बँक, शिर्डी | १ |
| ०५. | आंध्र बँक, शिर्डी ( नित्य प्रसादालय अन्नदान योजना) | १११ |
| ०६. | पोस्टल बँक (पोस्ट ऑफिस), शिर्डी | १७९३७९ |
| ०७ | स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी | १ |
| ०८. | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | १ |
| ०९. | स्टेट बँक ऑफ इंडिया, राहाता | ११९०००५०११ |
| १०. | बँक ऑफ बडोदा, कोपरगांव | ४५९ |
| ११. | स्टेट बँक ऑफ इंडिया, कोपरगांव | ५१२९ |
| १२. | आय.सी.आय.सी.आय. बँक लि. नाशिक | २७०१०२७९०४ |
| १३. | बँक ऑफ बडोदा, नाशिक (परकीय चलन) | १००५१ |
| १४. | सिंडीकेट बँक, शिर्डी | १ |
| १५. | अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती बँक लि., शिर्डी | १ |
| १६. | अमेरीकन एक्सप्रेस बँक, मुंबई | २२०११७१६७ |
| १७. | सेंट्रल बँक ऑफ इंडिया, दादर | ९३५८ |
| १८. | बँक ऑफ महाराष्ट्र, दादर | ३२०६३१ |
| १९. | स्टेट बँक ऑफ इंडिया, मुंबई | ११०००१०३७१ |
| २०. | स्टेट बँक ऑफ इंडिया, दादर | ११०००५११८ |
| २१. | सेंट्रल बँक ऑफ इंडिया, (ग्रुप ग्रॅच्युटी ) शिर्डी | १५२३३ |
| २२. | सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शिर्डी (कर्मचारी कल्याण निधी) | ५४०१ |
| २३. | स्टेट बँक ऑफ इंडिया, श्रीरामपूर (ATM Donations) | ०१००००९८५१४ |

संस्थानचे उपरोक्त नमूद विविध बँकामधील बचत खात्यांमार्फत आवश्यकतेप्रमाणे आर्थिक व्यवहार केले जातात. तथापि, संस्थानला आवश्यक असणा-या विविध प्रकारच्या बँकींग सेवा शिर्डी, कोपरगांव, राहाता व नासिक येथील बँकांमध्ये एकत्रितपणे उपलब्ध झाल्याने वरील बँकापैकी काही बँकांमधील बचत खात्यांवर काहीही आर्थिक व्यवहार होत नाहीत. एकूण बचत खात्यांची संख्या जास्त असल्यामुळे प्रत्येक बचत खात्यामध्ये त्या बँकेच्या आग्रहानुसार काही रक्कम शिल्लक ठेवावी लागते व त्यामुळे दैनंदिन पातळीवर एकुण (सर्व खात्यांवरील एकत्रित) शिल्लक रक्कम वाढलेली दिसते. आर्थिक व्यवस्थापनाच्या दृष्टीकोनातून हे उचित नसल्यामुळे दैनंदिन वापरासाठी आवश्यक एवढीच रक्कम बचत खाती शिल्लक ठेवणेबाबत मा.अध्यक्षांनी निर्देश दिलेले आहेत.

या बाबी विचारात घेता ज्या बचत खात्यातून आर्थिक व्यवहार होत नाहीत किंवा त्यांचे प्रमाण अत्यल्प आहे अशी खाती बंद करण्यात यावीत, असे नम्र मत आहे. अमेरिकन एक्सप्रेस बँकेकडे Letter of credit साठी बचत खाते उघडण्यात आले होते. परंतु ही Inland letter of Credit ची सुविधा आता राष्ट्रीयकृत बँकाही देत असल्यामुळे ते खातेही बंद करण्यास हरकत नाही. त्यासह अशी बंद करावयाची खाती खालील प्रमाणे आहेत :-

| अ.नं. | बँक / शाखेचे नांव | खाते क्रमांक |
|---|---|---|
| ०१. | अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती बँक लि., शिर्डी | १ |
| ०२. | अमेरीकन एक्सप्रेस बँक, मुंबई | २२०११७१६७ |
| ०३. | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | १ |
| ०४. | सेंट्रल बँक ऑफ इंडिया (कर्मचारी कल्याण निधी), शिर्डी | ५४०१ |
| ०५. | स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी | १ |
| ०६. | सिंडीकेट बँक, शिर्डी | १ |
| ०७ | युनियन बँक ऑफ इंडिया, राहाता | २५९ |
| ०८. | स्टेट बँक ऑफ इंडिया, दादर | ११०००५१९८ |
| ०९. | स्टेट बँक ऑफ इंडिया, मुख्य शाखा, मुंबई | ११०००१०३७१ |

उपरोक्तपैकी अनुक्रमांक ०४ कर्मचारी कल्याण निधीच्या खात्यामध्ये दिनांक १९ ऑगस्ट, २००५ रोजी रुपये ३७,६५६/- इतकी रक्कम शिल्लक आहे.सर्व प्रकारच्या कर्मचारी कल्याण योजनांवरील खर्च एकत्रित विश्वस्तव्यवस्था निधीमधून करण्यात येत आहे. मागील आर्थिक वर्षामध्ये कर्मचारी कल्याण योजनांवर होणारा खर्च या शिल्लक रक्कमेपेक्षा कितीतरी पटीने अधिक आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेता, ही शिल्लक रक्कम एकत्रित विश्वस्तव्यवस्था निधीमध्ये वर्ग करुन, हे खाते देखील बंद करण्यात यावे, असे नम्र मत आहे.

उपरोक्त प्रमाणे सद्यपरिस्थितीत अनावश्यक असलेली ०९ पैकी अ.नं.०२ ते ०९ अशी एकूण ०८ बचत खाती बंद करुन, तेथील शिल्लक रक्कमा संस्थानच्या इतर बचत खात्यांमध्ये वर्ग करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०५. चल व अचल मालमत्तेमध्ये झालेले बदल (Change Reports) बी.पी.टी ॲक्ट, १९५० कलम २२ नुसार सादर करणेविषयी शासनाकडे प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र. ४८१.** श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डीचे व्यवस्थापन, मा.सिटी सिव्हील कोर्ट, मुंबई यांचेकडील मंजूर व्यवस्थापकीय घटनेअन्वये **(Management Scheme)** दिनांक ०१ ऑगष्ट, १९८४ पासून कोर्ट रिसीव्हरकडून, तत्कालीन मा.विश्वस्त मंडळाकडे सोपविण्यात आले होते. त्यानुसार दि.२२ ऑगष्ट, २००४ पर्यंत संस्थानवर विश्वस्त मंडळांचे व्यवस्थापन होते. महाराष्ट्र शासनाने विधी व न्याय विभागाकडील दि.२३ ऑगष्ट, २००४ रोजीच्या अधिसुचनेप्रमाणे उपरोक्त व्यवस्थापकीय घटनेच्या जागी "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम - २००४ " हा स्वतंत्र कायदा पारीत करुन त्यांतील तरतुदींन्वये नूतन व्यवस्थापन समितीची नियुक्ती केली आहे.

बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट, १९५० कलम २२ मधील तरतूदींन्वये, संस्थानच्या अचल मालमत्तेमध्ये झालेल्या बदलांबाबतचा अहवाल **(Change Reports)** मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे वेळोवेळी सादर करण्यात येत असत. या तरतुदींन्वये अचल मालमत्तेमध्ये झालेले काही बदल अद्यापही मा.धर्मादाय आयुक्त, मुंबई यांना कळविणे बाकी आहे. याविषयी सन २००४-०५ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालात संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक यांनी खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केलेले आहेत.

1(a) "The Sansthan did not communicate in some cases the changes in respect of Immovable & Movable Property from time to time to the Regional Office, as stipulated in Section 22 of the Bombay Public Trusts Act. It has been represented that since the management and administration of the trust has been taken over in terms of the said Act, there is no need to communicate such cases any longer to the Regional Office of the Charity Commissioner."

5. "It is not expressly provided in the Act whether the Sansthan is required to submit change reports with the Charity Commissioner with regard to changes in movable, immovable property, investments, etc."

चल व अचल मालमत्तेमध्ये वेळोवेळी होणारे बदल मा. धर्मादाय आयुक्त/शासन यांचेकडे कळविणेबाबत उपरोक्त नमूद अधिनियम-२००४ मध्ये कोठेही स्पष्ट तरतूद नाही. त्यामुळे बॉम्बे पब्लिक ट्रस्ट अॅक्ट, १९५० चे कलम २२ मधील तरतूद अंमलात आणावी किंवा कसे याबाबत शासनाकडून मार्गदर्शन घेणे उचित होईल. तरी सदर मार्गदर्शन घेणेकामी विनंती वजा प्रस्ताव शासनाकडे सादर करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०६. सोने-चांदी वितळवून मिळालेल्या शुध्द सोने व चांदीपासून नाणी तयार करुन "ना नफा ना तोटा " या तत्वावर भक्तांना उपलब्ध करुन देण्याच्या योजनेस शासनाची स्थायी मान्यता घेणेबाबत.**

**निर्णय क्र. ४८२.** श्री साईभक्तांकडून देणगीरुपाने सोने-चांदीचे अलंकार, वस्तू अर्पण केल्या जातात. देणगी स्वरुपात प्राप्त होणा-या या सोने-चांदीच्या अलंकार/वस्तूंपैकी अगदी मोजक्याच अपवादात्मक अशा अत्युत्कृष्ट कलाकुसरीच्या व सदैव जतन करुन ठेवण्यायोग्य असतात. अशा वस्तू बाजूला ठेवून इतर वस्तू वितळविणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७ डिसेंबर, २००४ रोजीच्या सभेसमोर सादर करण्यात आला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, निर्णय क्र.१४१ अन्वये, "संस्थानकडे असलेल्या सोने-चांदीच्या मौल्यवान वस्तू-अलंकारांचे मूल्यांकन करुन, त्यांची (अद्ययावत बाजारभावांवर आधारित) मूळ किंमतीपेक्षा १०% अधिक रक्कम आल्यासच लिलावाव्दारे विक्री करण्यात यावी, अथवा ती वितळविण्यास घ्यावीत आणि उर्वरित सोने-चांदी वितळवून त्यांची नाणी तयार करण्यात यावीत." असा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच सदरील निर्णयान्वये, वस्तू-अलंकार वितळविणेबाबत धोरणात्मक कार्यपध्दती-तथा-नियमावली निश्चित करण्यात आलेली आहे.

उपरोक्त निर्णयास अनुसरुन, विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करतांना, अधिनियम - २००४ चे कलम १७ (४) मधील तरतुदीनुसार प्रत्येक लिलावासाठी स्वतंत्रपणे प्रस्ताव राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीसाठी सादर करणे अव्यवहार्य व प्रशासकीयदृष्टया अडचणीचे होईल, त्यामुळे वरील नमूद निर्णयानुसार निश्चीत करण्यात आलेल्या, मार्गदर्शक कार्यपध्दती-तथा-सर्वसाधारण नियमावलीचा समावेश, प्रस्तावित विनियमांमध्ये (Proposed Rules under the SSST Act, 2004) स्थायी रुपाने समाविष्ट करण्यासाठींचा विनंतीपूर्वक प्रस्ताव जा.नं.एसएसएस/वशी/लेखा/२२१३/०५ दि.२८ फेब्रुवारी, २००५ नुसार शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. त्याबाबतचा निर्णय अद्याप शासन स्तरावर प्रलंबित आहे. याबाबत सन २००४-०५ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालात संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक यांनी खालीलप्रमाणे मुद्दा उपस्थित केलेला आहे.

9. As per Section 17 (4) of the Act, no jewelleries, ornaments and other valuable movable property vested in the Trust, the value of which is more than fifty thousand rupees, shall be sold, pledged or otherwise alienated by the Committee, except with the previous sanction in writing by the State Government. However, it has been noticed that the Sansthan continues to sell Gold Coins and Lockets, which we are informed, were melted and converted prior to the coming into force of the Act. The sansthan has applied to the State Government for permission to convert and sell as per the erstwhile scheme. The matter is pending with the State Government.

संस्थानकडे देणगीरुपाने प्राप्त झालेले सोने-चांदी अलंकार/वस्तू प्रथमतः सन १९९५ साली वितळविण्यात आले. त्यापासून मिळालेल्या शुध्द चांदी पासून श्री साईबाबांची मुद्रा असलेली नाणी सन १९९६ पासून व शुध्द सोन्यापासून तयार करण्यात आलेली नाणी/पदक सन २००० पासून भक्तांना ना नफा ना तोटा या तत्वावर प्रसादरुपाने उपलब्ध करुन देण्यात आले. तेंव्हापासून आजतागायत सदरची कार्यपध्दती अंमलात असून त्यास भक्तांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. पूर्वी तयार करण्यात आलेली नाणी/पदके संपलेली असून, भक्त त्यासाठी वारंवार विचारणा करीत आहेत. त्यासाठी पूर्वीप्रमाणेच सदरची नाणी/पदके भक्तांना त्वरीत उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

तरी वरील सर्व कार्यपध्दतीचा अवलंब करुन, वितळविलेल्या सोने-चांदीपासून जे शुध्द सोने-चांदी प्राप्त होईल त्यातून तसेच आज अखेर संस्थानकडे शिल्लक असलेल्या शुध्द सोने/चांदी पासून, पूर्वीप्रमाणेच श्री साईबाबांची मुद्रा असलेली नाणी व पदके तयार करुन ते "ना नफा ना तोटा " या तत्वावर भक्तांना प्रसादरुपाने उपलब्ध करुन देण्याच्या कार्यपध्दतीला स्थायी मान्यता मिळणेसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. याकामी खालील विश्वस्तांची समिती नेमणेत यावी, असेही ठरले.

०१. मा.श्री.पांडुरंग गमाजी अभंग
०२. मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे.
०३. मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे.

०४. मा. डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर.
०५. मा. श्री. अशोक भिमाशंकर खांबेकर.
०६. मा. श्री. कृष्णचन्द्र श्यामसुन्दर पाण्डेय
०७. मा.श्री.कैलास गोविंदराव कोते.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०७. विश्वस्तव्यवस्था अधिनियमातील तरतूदींन्वये स्थापीत व्यवस्थापन निधीच्या प्रमाणात सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात प्रत्यक्ष झालेल्या खर्चापर्यन्त वाढ करणेसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र. ४८३. (अ)** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)अधिनियम,२००४ मधील तरतुदीप्रमाणे दिनांक २३ ऑगष्ट, २००४ चे अधिसूचनेनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे व्यवस्थापन शासननियुक्त मा.व्यवस्थापन समितीने करणेस सुरुवात केलेली आहे.

या अधिनियमातील 'व्यवस्थापन निधी व त्याचा विनियोग' या संबंधीत कलम २२ मधील तरतूदी पुढीलप्रमाणे आहेत -

१. व्यवस्थापन निधी नावाचा एक स्वतंत्र निधी घटित करण्यात येईल व तो समितीकडे निहित असेल व समितीच्या नियंत्रणाखाली असेल.

२. व्यवस्थापन निधीत शिल्लक रक्कम उपलब्ध असल्यास, ती विचारात घेऊन, विश्वस्त व्यवस्थेच्या लगतपूर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्क्यापेक्षा अधिक नसेल इतकी समितीकडून निश्चित करण्यात येईल एवढी रक्कम, राज्य शासनाच्या मान्यतेने, दरवर्षी या निधीमध्ये जमा करण्यात येईल. राज्य शासनास, आवश्यक वाटले तर, कोणत्याही वर्षात विश्वस्तव्यवस्था निधीतून कोणत्याही अतिरिक्त रकमा या निधीत जमा करण्याबद्दल कोणत्याही वेळी, निर्देश देता येईल.

३. व्यवस्थापन निधीचा, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, पुढील प्रयोजनांसाठी उपयोग करण्यात येईल -

(क) समितीचा अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर सदस्य यांना मानधन, फी व भत्ते देणे,

(ख) समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते देणे,

(ग) या अधिनियमाखालील आपल्या अधिकारांचा वापर करताना आणि आपली कर्तव्ये व कामे पार पाडताना, समितीने किंवा कोणत्याही सदस्याने किंवा अधिका-याने किंवा कर्मचा-याने कायदेशीररीत्या केलेल्या कोणत्याही खर्चाची रक्कम देणे.

उपरोक्त अधिनियमातील कलम २२ (२) मध्ये निर्देशीत केल्याप्रमाणे लगतपूर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्क्यापेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम व्यवस्थापन निधीत वर्ग करणेबाबत तरतूद करणेत आलेली आहे. मागील तीन आर्थिक वर्षांचे स्थूल वार्षिक उत्पन्न, उपरोक्त नमूद प्रयोजनांच्या बाबींवर झालेला खर्च व त्याचे स्थूल उत्पन्नाशी प्रमाण आदि गोषवारा पुढीलप्रमाणे आहे :-

| अ.नं. | आर्थिक वर्ष | स्थूल उत्पन्न | प्रयोजनाच्या बाबींवरील एकूण खर्च व स्थूल उत्पन्नाशी त्याचे प्रमाण | |
|---|---|---|---|---|
| ०१. | २००१-२००२ | रु. ६१,३६,५१,७२३/- | रु. १२,९५,३३,९७८/- | २१.११ टक्के |
| ०२. | २००२-२००३ | रु. ६१,३५,६५,४२३/- | रु. १३,३१,२९,६२३/- | २१.७० टक्के |
| ०३. | २००३-२००४ | रु. ६८,७७,५८,७४१/- | रु. १४,६८,७३,८६८/- | २१.३६ टक्के |

उपरोक्त तपशील विचारात घेता, प्रयोजित बाबींवरील, खर्चांच्या पूर्ततेसाठी व्यवस्थापन निधीत वर्ग करावयाची रक्कम, लगतच्या वर्षाच्या स्थूल उत्पन्नाच्या १० टक्केऐवजी २५ टक्के इतका वाढविल्यास, हा व्यवस्थापन निधी समितीसदस्यांचे मानधन व भत्ते, कर्मचारी वेतन व भत्ते, कंत्राटी स्वरुपातील कुशल-अकुशल व सुरक्षा कर्मचारी आदि बाबींवरील वार्षिक खर्चविषयक बाबींसाठी पुरेसा होईल. यादृष्टीने अधिनियमातील कलम २२ (२) या तरतुदीत सुधारणा करणेसाठी संदर्भ क्रमांक ०४ चा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तसेच संदर्भ क्रमांक ०३ च्या मूळ प्रस्तावानुसार विश्वस्तव्यवस्था निधीतून सन २००४-०५ या आर्थिक वर्षासाठी एकूण रुपये १४ कोटीपर्यन्त खर्च होईल असे गृहीत धरुन, तेवढी रक्कम व्यवस्थापन निधीमध्ये वर्ग करण्यासाठी विधी व न्याय विभागाकडे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. उपरोक्त दोन्ही प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहेत.

**(ब)** सन २००४-०५ या आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल दिनांक १२ ऑगष्ट, २००५ रोजी प्राप्त झालेला आहे. सन २००४-०५ या आर्थिक वर्षासाठी, मागील आर्थिक वर्ष सन २००३-०४ चे एकूण वार्षिक उत्पन्न रुपये ६८,७७,५८,७४१/- च्या दहा टक्के, म्हणजेच रुपये ६,८७,७५,८७४/- मात्र इतकी रक्कम व्यवस्थापन निधीकडे वर्ग करता येईल. परंतु या कलम २२ (३) मधील तरतुदींनुसार, सदर रक्कम खर्चाच्या विहीत बाबींसाठी दहा टक्के तरतूद अत्यंत अपुरी आहे. सन २००४-०५ च्या

लेखापरिक्षण अहवालामध्ये, आर्थिक वर्षात, उपरोक्त नमूद सर्व विहीत बाबींसाठी रुपये १६,३३,५७,५०७/- (२३.७५ टक्के) इतका प्रत्यक्ष खर्च झालेला आहे; म्हणजेच तो तरतुदीपेक्षा रक्कम रुपये ९,४५,८१,६३३/- ने अधिक आहे व त्यास अद्याप शासनाची मान्यता घेणे बाकी आहे, असे स्पष्ट नमूद करण्यात आलेले आहे.

उपरोक्त सन २००४-०५ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालातील नोंदीनुसार, प्रत्यक्ष झालेल्या खर्चापर्यन्त म्हणजेच रुपये १६,३३,५७,५०७/- मात्र इतकी रक्कम व्यवस्थापन निधीमध्ये वर्ग करण्यांस शासनाची मान्यता मिळणेसाठी शासनाकडे प्रस्तावित करणे क्रमप्राप्त आहे.

यासाठी, अधिनियम कलम २२ (२) मधील तरतुदीनुसार सन २००४-०५ साठी व्यवस्थापन निधीत वर्ग करावयाची रक्कम, लगतपूर्व आर्थिक वर्षाच्या स्थूल उत्पन्नाच्या दहा टक्क्यांप्रमाणे रुपये ६,८७,७५,८७४/- ऐवजी त्या आर्थिक वर्षामध्ये प्रत्यक्ष झालेल्या खर्चापर्यन्त, म्हणजेच एकूण रुपये १६,३३,५७,५०७/- मात्र, म्हणजेच रुपये ९,४५,८१,६३३/- ने अधिक वर्ग करणेसाठीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणेसाठी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी )

**विषय नं.०८. संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या अधिनियम २००४ मधील ध्येय आणि उदिष्टांमध्ये शैक्षणिक, वैद्यकीय खर्च व अनुदान (Medical Aid ) यांचा समावेश करणेविषयी शासनाकडे प्रस्ताव पाठविणेबाबत.**

**निर्णय क्र. ४८४.** श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डीचे व्यवस्थापन, मा.सिटी सिव्हील कोर्ट, मुंबई यांचेकडील मंजूर व्यवस्थापकीय घटने अन्वये **(Management Scheme)** दिनांक ०१ ऑगष्ट, १९८४ पासून कोर्ट रिसीव्हरकडून, तत्कालीन मा.विश्वस्त मंडळाकडे सोपविण्यात आले होते. त्यानुसार दि.२२ ऑगष्ट, २००४ पर्यंत संस्थानवर विश्वस्त मंडळांचे व्यवस्थापन होते. महाराष्ट्र शासनाने विधी व न्याय विभागाकडील दि.२३ ऑगष्ट, २००४ रोजीच्या अधिसुचनेनुसार लागू केलेल्या "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम-२००४" या स्वतंत्र कायद्या अन्वये नूतन व्यवस्थापन समिती नियुक्त केली आहे.

पूर्वीच्या व्यवस्थापकीय घटनेमधील ध्येय आणि उद्दिष्टांमध्ये पुढीलप्रमाणे काही तरतुदी होत्या.

**Clause 03 (f)** To give alms to the poor and deserving at Shirdi provided donatinos are received specifically in that behalf (and for no other purposes) and also to give necessary assistance inclusive of financial help to the poor and deserving and institutes at Shirdi and elsewhere.

**(g)** To provide medical relief by starting Hospital Medical Centers or Sanatoriums at Shirdi and other places, and to render financial assistance to institutions of such nature with Charity Commissioner's sanction.

**(h)** To promote or help secular education of all types and starting of educational institutions at Shirdi or other places and to give scholarships and allied assistance to deserving students.."

उपरोक्त नमूद तरतुदींच्या ध्येय व उद्दीष्टांनुसार (g) शिर्डी परिसरातील ग्रामीण नागरिक, गरजू साईभक्त यांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सन १९६४ साली संस्थानमार्फत श्री साईनाथ रुग्णालय सुरु करण्यात आले आणि आवश्यकतेनुसार व तंत्रज्ञानातील सुधारणांनुसार येथील सेवा-सुविधांचा वेळोवेळी विस्तार करण्यात आला. तसेच उपरोक्त तरतुदींच्या (f) अधिन राहून संस्थान व्यवस्थापनाव्दारे साधारणतः १९८० पासून गरीब व गरजू रुग्णांना जीवनदायी शस्त्रक्रियेसाठी निश्चीत नियमावलीअंतर्गत वैद्यकीय अनुदान देण्याचा उपक्रमही राबविण्यात येत आहे. या योजनेस मिळणारा प्रतिसाद व लाभार्थींची संख्या वर्षानुवर्षे वाढत गेली आहे.परंतु अधिनियम - २००४ मध्ये, विषयांकीत उद्दिष्टे/योजनांबाबत काहीही तरतूद नसल्याने सदरील खर्च व अनुदान योजना पूर्वीप्रमाणेच यापुढेही सुरु ठेवणेसाठी व तशी तरतूद अधिनियमामध्ये करण्यात यावी, यासाठी जा.नं.एसएसएस /वशी /अनुदान/ ८०/०५ दि.०३ जानेवारी, २००५ अन्वये शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. त्यानंतर सदर योजना सुरु ठेवणे अत्यंत आवश्यक असल्याने, त्यास स्थायी मान्यता मिळणेकामी जा.नं. एसएसएस/वशी/एसएसएच/५८०८/०५ दि.०२ जून, २००५ अन्वये शासनाकडे पुनःश्च एकवार प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहेत.

दरम्यान मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१७ एप्रिल, २००५ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.१६७ अन्वये ही वैद्यकीय अनुदान योजना बंद न करता सुरुच ठेवण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच सन २००५-०६ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये या बाबीवर रु.७ कोटी मात्र एवढी तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु याबाबत सन २००४-०५ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालात संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक यांनी खालीलप्रमाणे मुद्दा उपस्थित केलेला आहे.

(20.) "We have gone through the Principle Act alongwith the amended ordinance and have come across ambiguity and inadequacy regarding some of the important provisions concerning, various objects presently in application. The new act does not contain all the earlier applications namely Educational objects, Medical objects and individual aid for medial purpose."

तरी उपरोक्त नमूद शैक्षणिक, वैद्यकीय सुविधा व वैद्यकीय उपचारार्थ आर्थिक अनुदान या सुविधा/योजना संस्थानचे ध्येय व उदिष्टांमध्ये समाविष्ट करण्यास व अधिनियम २००४ मध्ये तशी सुधारणा करणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी )

**विषय नं.०९. बी.पी.टी ॲक्ट, १९५० कलम ५८ पोट कलम ०५ अन्वये विश्वस्त व्यवस्था प्रशासन निधीस २ टक्के वार्षिक अंशदान आदा करणेविषयी शासनाकडून मार्गदर्शन मागविणेबाबत.**

**निर्णय क्र. ४८५.** श्री साईबाबा संस्थान, शिर्डीचा कारभार सन १९८४ पर्यंत मा. कोर्ट रिसीव्हर यांच्या अधिपत्याखाली चालत असे. सन १९८४ साली मा.सिटी सिव्हील कोर्ट, मुंबई यांचेकडील मंजूर योजने अन्वये **(Scheme)** दिनांक ०१ ऑगष्ट, १९८४ पासून संस्थानचा कारभार मा. धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी नियुक्त केलेल्या मा.विश्वस्त मंडळाकडे सोपविण्यात आला होता. त्यानंतर या योजनेचे जागी महाराष्ट्र शासनाने 'श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४' हा स्वतंत्र कायदा दि.२३ ऑगष्ट, २००४ रोजीच्या अधिसुचनेप्रमाणे लागू केला असून, त्याअन्वये संस्थानचे व्यवस्थापन मा. व्यवस्थापन समिती कडून करण्यात येत आहे.

बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट, १९५० मधील तरतुदींनुसार संस्थानची 'सार्वजनिक धर्मादाय संस्था' म्हणून नोंदणी झालेली असून, सदर ॲक्ट मधील विहीत तरतूदी संस्थानवर बंधनकारक आहेत. या ॲक्ट मधील कलम ५८ (५) मध्ये खालील प्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे.

Notwithstanding anything contained in the foregoing provisions in this section, on and after the commencement of the Bombay Public Trusts (Amendment) Act, १९८३ (Mah. Ord. IX of १९८३); every trustee of a public trust liable to pay contribution, shall, while filing a copy of the Balance Sheet and Income and Expenditure Account under sub section (IA) of section ३४, pay in advance the whole amount of the annual contribution of the public trust computed at the rate fixed under sub-section (१) of this section according to specified percentage of the gross annual income or of the gross annual collection or receipt, as the case may be, as shown in the Balance Sheet and Income and Expenditure Account, in such manner, and subject to such adjustments to be made after the contribution payable is assessed, as may be prescribed.

उपरोक्त तरतुदींन्वये द्यावयाचे अंशदान हे लेखापरिक्षण अहवालातील परिशीष्ट - IX C मध्ये वैधानिक लेखापरिक्षकांनी नमूद केलेल्या एकूण उत्पन्नाच्या २% दराने देणेबाबत राज्य शासनाच्या न्याय व विधी खात्याकडील परिपत्रक दिनांक २८ ऑक्टोबर, १९९१ रोजी प्रसिध्द झालेल्या राजपत्रात नमूद करण्यात आलेले आहे. आजतागायत हा दर लागू आहे.

संस्थानच्या सन २००३-०४ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालातील परिशीष्ट - IX C मध्ये वैधानिक लेखापरिक्षकांनी नमूद केलेले एकूण उत्पन्न रु. ४०,९२,३०,०४५/- इतके असून, त्याच्या २% दराने रक्कम रु. ८१,८४,६०१/- मात्र मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांचेकडे भरण्यात आलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी ) अधिनियम २००४, दिनांक २३ ऑगष्ट २००४ पासून लागू करण्यात आलेला आहे. सदर अधिनियमामध्ये उपरोक्त तपशीलाप्रमाणे विश्वस्तव्यवस्था प्रशासन निधीस (पी.टी.ए. फंड) द्यावयाच्या अंशदानाबाबत कोणतीही स्पष्ट तरतूद नाही. त्यामुळे सन २००४-०५ या आर्थिक वर्षाच्या अंशदानाची रक्कम आदा करावी किंवा कसे याबाबत राज्य शासनाकडून मार्गदर्शन घेणे उचित होईल, याकरीता राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी )

**विषय नं.१०. परकीय चलनातील नाणी देशी चलनात रुपांतरीत करुन घेणेबाबत.**

**निर्णय क्र. ४८६.** सर्वसाधारणपणे दर बुधवारी संस्थानमधील दक्षिणापेट्या उघडून त्यामध्ये मिळणारी देणगी रक्कम, सोने-चांदी अलंकार वस्तू, तांबे-पितळ वस्तू, कापड व इतर किरकोळ वस्तूंची मोजणी केली जाते. त्याचबरोबर परकीय चलनातील नोटा व नाणी देखील प्राप्त होत असतात. पैकी परकीय चलनातील नोटा प्रचलीत कार्य पध्दतीअन्वये लेखाशाखेतील संबंधित रजिस्टरमध्ये नोंद करून पुढील कार्यवाहीसाठी संस्थानने अधिकृत नियुक्त केलेल्या बँक ऑफ बडोदा, शाखा गोल्फ क्लब, नासिक येथील संस्थानखाती जमा केल्या जातात.

मात्र बँक ऑफ बडोदा, नासिक परकीय चलनातील नाणी स्विकारीत नाहीत. त्यामुळे सन १९९९ पासून आजतागायत एकूण पाच डबे परकीय चलनातील नाण्यांनी भरलेली आहेत. सदरची नाणी प्रत्येक

देशातील नाण्यांचे किंमती नुसार एकत्रित विगतवारी करून ठेवलेले आहेत. त्याबाबतची यादी परिशिष्ट "अ" म्हणून सोबत जोडलेली आहे.

सदर नाण्यांचे भारतीय चलनात रूपांतर करून मिळणेकामी संबंधित अनेक संस्थांशी संपर्क साधून सदर कामाचा निपटारा करणेकामी प्रयत्न करणेत आले आहेत. सदर संस्थांनी परिशिष्ट "अ" यादीची पाहणी केली. त्यात बरीचशी नाणी सध्या चलनात नसून अशी चलनात नसलेली नाणी स्विकारण्यास असमर्थता व्यक्त केली आहे. यामुळे सदरची परकीय चलनातील नाणी भारतीय चलनात रूपांतरीत करण्याचे काम आज अखेर प्रलंबित राहिलेले आहे.

बँक ऑफ बडोदा, गोल्फ क्लब, नासिक ही संस्थानची परकीय चलनातील व्यवहारासंबंधीची नोंदणीकृत बँक आहे. सदर बँकेबरोबर संस्थानचे असलेले संबंध विचारात घेऊन परकीय चलनातील नाण्यांची भारतीय चलनात रूपांतर करून देणेबाबत सदर बँकेस विनंती करण्यात आली होती. त्याप्रमाणे सदर बँकेने त्यांचे दि. ०४/०८/२००५ रोजीचे पत्रान्वये परकीय चलनातील नाणी स्विकारणेबाबत सहमती दर्शविलेली आहे. यासाठी त्यांनी संस्थानकडून परकीय चलनातील नाण्यांची संपूर्ण विगतवारी म्हणजेच देशाचे नाव, नाण्यांचे प्रकार, नाण्यांची किंमत, नाण्यांची संख्या इ. माहिती मागविली होती.

बँकेच्या विनंती नुसार संस्थानकडे उपलब्ध असलेल्या परकीय चलनातील नाण्यांची यादी (परिशिष्ट "अ") बँकेस पाठविण्यात आली होती. त्याप्रमाणे बँकेने Cox & Kings, Pune या कंपनीशी संपर्क साधून संस्थानकडे उपलब्ध असलेली परिशिष्ट "अ" यादीतील सर्व परकीय चलनातील नाणी स्विकारणेस सहमती दर्शविली असून त्यासाठी भारतीय चलनातील किंमत रू. १,९३,९७९/- मात्र संस्थानला देण्यास तयार असले बाबत कळविले आहे. सदरची बँक ऑफ बडोदा, शाखा-गोल्फ क्लब, नासिक यांचेकडील विनिमय दर दर्शविणारी यादी सोबत परिशिष्ट "ब" म्हणून जोडलेली आहे.

परिशिष्ट "अ" यादीमध्ये दर्शविलेली परकीय चलनातील नाणी बँक ऑफ बडोदा, शाखा-गोल्फ क्लब, नासिक यांचेकडे जमा करुन परिशिष्ट "ब" मध्ये दर्शविलेल्या विनिमय दराप्रमाणे भारतीय चलनात रुपांतर केलेल्या रक्कम रुपये १,९३,९७९/- मात्र संस्थानखाती जमा करुन घेणेसाठी सविनय सादर.

त्याचप्रमाणे येथूनपुढे वेळोवेळी होणा-या दक्षिणापेटी मोजणीमध्ये मिळणा-या परकीय चलनातील नाणी विगतवारी करुन बँक ऑफ बडोदा, शाखा-गोल्फ क्लब, नासिक यांचेकडे परकीय चलनातील विनिमय दराप्रमाणे वटवून मिळणारी रक्कम संस्थानचे अधिकृत परकीय व्यवहार संबंधीत खात्यामध्ये जमा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.११. अधिनियम २००४ मधील कलम २१ (२) अन्वये द्यावयाच्या आर्थिक अनुदानासंबंधीत तरतूदींमध्ये आवश्यक ते बदल करणेकामी शासनाकडे प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र. ४८७.** (अ) श्री साईबाबा संस्थान, शिर्डीचे व्यवस्थापन, मा.सिटी सिव्हील कोर्ट, मुंबई यांचेकडील मंजूर व्यवस्थापकीय योजनेअन्वये (Management Scheme) दिनांक ०१ ऑगष्ट, १९८४ पासून कोर्ट रिसीव्हरकडून, तत्कालीन मा.विश्वस्त मंडळाकडे सोपविण्यात आले होते. त्यानुसार दि.२२ ऑगष्ट, २००४ पर्यंत संस्थानवर विश्वस्त मंडळाचे व्यवस्थापन होते. महाराष्ट्र शासनाने विधी व न्याय विभागाकडील दि.२३ ऑगष्ट, २००४ रोजीच्या अधिसुचनेनुसार लागू केलेल्या "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम इ २००४" या स्वतंत्र कायद्यांन्वये नूतन व्यवस्थापन समिती नियुक्त केली आहे.

पूर्वीच्या व्यवस्थापकीय योजनेमध्ये आर्थिक अनुदाने देण्यासंबंधी ध्येय आणि उद्दिष्टांमध्ये पुढीलप्रमाणे तरतूद होती.

Clause 03

(f) To give alms to the poor and deserving at Shirdi provided donatinos are received specifically in that behalf (and for no other purposes) and also to give necessary assistance inclusive of financial help to the poor and deserving and institutes at Shirdi and elsewhere.

(g) To provide medical relief by starting Hospital Medical Centers or Sanatoriums at Shirdi and other places, and to render financial assistance to institutions of such nature with Charity Commissioner's sanction.

(i) To promote any other cause affecting human well being or to render help to human beings in calamities.

उपरोक्त तरतुदीनुसार विश्वस्तनिधीमधून पुढील योजना राबविण्यात येत होत्या.

०१. <u>वैद्यकिय अनुदान</u> - संस्थान व्यवस्थापनाव्दारे साधारणतः १९८० पासून गरीब व गरजू रुग्णांना जीवनदायी शस्त्रक्रियेसाठी निश्चीत नियमावलीअंतर्गत वैद्यकीय अनुदान देण्याचा उपक्रमही राबविण्यात येत आहे. या योजनेस मिळणारा प्रतिसाद व लाभार्थींची संख्या वर्षानुवर्षे वाढत गेली आहे. यासाठी चालू आर्थिक वर्ष सन २००५-०६ साठी साधारणतः रुपये ७ कोटी आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे.

०२. <u>नगरपंचायत हद्दीतील विकास कामे</u> - स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी साईभक्तांना पुरविण्यात येणा-या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगर

पंचायतीला नेहमीच सहाय्य करावे लागते. शिर्डी व शिर्डी परिसरात जी विकास कामे करण्यात येतात त्याचा फायदा शिर्डी गावातील ग्रामस्थांसाठी होतोच, त्याचबरोबर शिर्डी येथे येणा-या भक्तांना मोठया प्रमाणात होतो. त्यासाठी शिर्डी नगरपंचायतीचे एकप्रकारे पालकत्व घेऊनच नगरपंचायतीला मोठया प्रमाणावर आर्थिक सहाय्य करण्यात येते.

**०३. नैसर्गिक आपत्तीसाठी आर्थिक सहाय्य** - महाराष्ट्रात अथवा देशात कोठेही अचानक काही नैसर्गिक आपत्ती ओढवल्यास (उदा.त्सुनामी,भूकंप,अतिपर्जन्यवृष्टी,वादळ वगैरे) आपत्तीग्रस्तांसाठी संस्थानकडून मानवतेच्या दृष्टीकोनातून भरीव आर्थिक सहाय्य केले जाते.

**०४. शिरडी परिसरातील विकास कामे** - शिरडी तसेच शिरडी जवळील आसपासच्या परिसरात जनहिताच्यादृष्टीने काही विकास कामे (पाणी आडवा पाणी जिरवा या योजने अंतर्गत बांधण्यात आलेले गणेश बंधारे, पिण्याच्या पाण्याची सुविधा वगैरे) धार्मिक कार्यासाठी वस्तूरुपाने अथवा रोख मदत, यासाठी संस्थानकडून आर्थिक सहाय्य दिले जाते.

०५. मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने मेळावा, साहित्य संमेलने, चर्चासत्रे तसेच क्रिडास्पर्धा यासाठीही संस्थानकडून रोख अथवा वस्तूरुपाने मदत देण्यात येते.

सदर योजना अद्यापही पुर्वीच्या कार्यपध्दतीन्वये सुरु आहेत.

(ब) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम - २००४ मध्ये विश्वस्तव्यवस्थेच्या निधीच्या विनियोगाअंतर्गत देण्यात येणा-या अनुदानाबाबत कलम नं.२१ (२) मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे, "पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक असल्यास, अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्तेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीकडून पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात व खर्च करण्यात येईल :-

(एक) राज्य शासनाच्या पूर्व मंजूरीने, कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी किंवा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिकदृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय किंवा धार्मिक संस्था किंवा कला व साहित्य या क्षेत्राशी संबंधित असलेली कोणतीही अन्य बिगरवाणिज्यिक सांस्कृतिक संघटना अथवा सोसायटी यांची नोंदणीकृत विश्वस्त व्यवस्था किंवा नोंदणीकृत संस्था यांच्याकडून स्थापना करुन घेण्यासाठी आणि त्यांची देखभाल करण्यासाठी ; किंवा

(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगर पंचायतीला सहाय्य करणे."

उपरोक्त तरतूद अत्यंत ढोबळ व अनिश्चीत अशी आहे. त्यामुळे एका अर्थी आर्थिक अनुदानांसाठी काहीही रक्कम संभवत नाही. अशा काहीशा अस्पष्ट (Vague) तरतुदींमुळे आर्थिक अनुदानांसाठीची उपलब्ध रक्कम व त्याचे नियोजन या दोन्हीही बाबी निश्चीत करता येत नाहीत.

(क) सन २००४-०५ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालात संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक यांनी संस्थान लेख्यांवरील टिपणीमध्ये अधिनियम-२००४ व त्यातील तरतुदींबाबत पुढीलप्रमाणे मत प्रदर्शित केलेले आहे.

A. PREAMBLE

............................ 2] Sub Section 2 of Section 21 of the Act provides that a portion of the surplus not being more than 30% of the distributable income of the Trust may be utilized and expended for the purposes stated therein after obtaining the sanction of the State government based on the recommendations of the Scrutiny Committee.

However, no scrutiny committee has been constituted so far. Further, sub section 1 provides for utilization of the trust fund for certain purposes stipulated therein, which does not cover all the objects of the trust as stipulated under the erstwhile applicable Scheme. Also section 22 of the Act provides for the constitution of the Management Fund from which all payments of salaries, allowances, fees, of the members of the committee as well as their employees are to be made. It is not apparently clear

a) whether in determining the distributable income of the Trust, the expenses covered under Section 22 should be deducted or not.

b) Whether in determining the distributable income of the Trust, the definition under the Income Tax Act should be followed or should it be the surplus based on accepted accounting principles (capital income/expenditure to be excluded)

It has been presumed that

a) the expenses covered under Section 22 is also deductible in determining the distributable income of the trust.

b) the definition under Income Tax Act is followed, since section 21 refers to "subject to the provisions of Income Tax Act".

संस्थान लेखापरिक्षक यांनी उपरोक्त टिपणीत केलेल्या मतप्रदर्शनावरुन असे स्पष्ट होते की, अधिनियमातील तरतूदीप्रमाणे अनुदानासाठी किती रक्कम निश्चित करावी याबाबत संभ्रम निर्माण होत आहे. त्यामुळे सदरची तरतूद स्पष्ट असावी, असे नम्र मत आहे.

(ड) उपरोक्त परिच्छेद अ मध्ये उल्लेख केलेल्या, जीवनदायी शस्त्रक्रियांसाठी, स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थान भक्तांना/नागरिकांना पुरवित असलेल्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी, नैसर्गिक आपत्तीसाठी नेहमीच आर्थिक सहाय्य करावे लागत असल्याने, संदर्भीत तरतूद सुधारित व सुस्पष्ट होणे आवश्यक आहे असे नम्र मत आहे.

तरी सदरची तरतूद विश्वस्तव्यवस्थेच्या लगतपूर्व वर्षातील स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या ३०% अशी सुस्पष्ट करणेस व अधिनियम २००४ मध्ये, तशी सुधारणा करणेबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१२. नवीन नियोजित रुग्णालयासाठी लिनन खरेदीबाबत**

**निर्णय क्र. ४८८.** नवीन नियोजित रुग्णालयात कामकाज सुरू होणेसंबंधी शीघ्र गतीचे नियोजन चालू आहे. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूंमध्ये खिडकी, दारे, पार्टीशन इत्यांदीचे पडदे, रुग्णांचा पेहराव व चादरी, ब्लँकेट व शस्त्रक्रियागारामध्ये लागणारे कपडे यांचा समावेश होतो. या दृष्टिकोनातून खालील नियोजन चालू आहे.

१) रुग्णालयाच्या कन्सलटिंग रुम्स, स्पेशल रुम्स, आय.सी.सी.यू. व हृदयोपचार कक्षातील खिडक्यांसाठी अद्यावत अशा प्लॅस्टिक पट्टयांचे बनविलेले पडदे (Blinz) असावेत असे मत आहे.

२) इतर दारे व खिडक्या यासाठी उच्च प्रकारच्या कापडाचे पडदे असावेत.

३) आय.सी.सी.यू. मध्ये दोन रुग्णांतील पलंगामध्ये वापरल्या जाणा-या पडद्यासाठी उच्च श्रेणीचे प्लॅस्टिक कापड वापरले जावे.

४) पलंगांसाठी अंथरावयाची चादर,उशीचे अभ्रे व ब्लँकेट उत्तम प्रतीचे असावेत.

५) शस्त्रक्रियागारात वापरले जाणारे कापड निरनिराळया रंगाचे ठेवले जावे ज्यात हिरवा व निळा रंग प्राधान्याने वापरला जातो.

६) टॉवेल्स व नॅपकीनचाही दर्जा उत्तम असावा.

७) रुग्णांचा पेहराव आकर्षक स्वरूपाचा असावा व त्यासाठी चांगले कापड वापरले जावे. अशी भूमिका समोर ठेवून नियोजन करण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी थोडासा जास्तीचा खर्च येणे स्वाभाविक आहे. उत्तम श्रेणी सेवांच्या व सशुल्क सेवा देणा-या रुग्णांसाठी चांगल्या प्रतीच्या कापडाची निवड संयुक्तिक होणार आहे. सोबतच्या तक्त्यात सामान्य प्रतीच्या कापड खरेदीनुसार आढावा काढला आहे. वरील तत्वानुसार मान्यता मिळाल्यास तसे नियोजन करता येईल. तरी या संबंधीच्या एकूण खर्चास अंदाजे रु.१६,०८,८००/- (अक्षरी रु.सोळा लाख आठ हजार आठशे मात्र) चे खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. यासंबंधी मालाची पहाणी करुन वाटाघाटीद्वारे खरेदी करणेची जबाबदारी विश्वस्त मा.डॉ.पी.एल.तिवारी यांचेवर सोपविण्यात आली. त्यांनी थेट उत्कृष्ट उत्पादन करणाऱ्या कंपन्यांशी संपर्क साधून कार्यवाही करण्यात यावी, असें ठरलें.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**विषय नं.१३. प्रोजेक्ट रिपोर्ट अंतिम अहवाल तयार करणे बाबत.**

**निर्णय क्र. ४८९.** नवीन नियोजित रुग्णालयासाठी प्रारुप अहवाल (Project Report) तयार करण्याचे काम मुंबई येथील डॉ.विनय कोठारी यांना देण्यात आले होते. त्यांनी त्यांचा आराखडा दि.०९/०७/२००५ रोजीच्या विश्वस्त सभेसमोर सादर केला. यावर चर्चा होऊन हा आराखडा मंजूर करण्यात आला. या अहवालाला पूर्णत्व देण्यासंबंधी काही प्रश्न तसेच राहीले आहेत.

वरील आराखडयानुसार त्यांनी काही निर्णय दिले आहेत व काही पर्याय आपलेपुढे सादर केले आहेत. या पर्यायानुसार अंतिम निर्णय घेऊन प्रारुप पूर्ण स्वरुपात तयार करण्याचे काम बाकी आहे. असा अहवाल आपल्याला मार्गदर्शक होईल व शासकीय ऑडीटसाठीही तो आवश्यक असेल.

**त्यांनी केलेल्या शिफारशी खालील प्रमाणे-**

१) जुने रुग्णालय सध्या धर्मशाळेतच ठेवावे, त्या संबंधी आवश्यक असलेल्या सुधारणा कराव्यात व दोन्ही रुग्णालयाचा समन्वय साधावा.

२) नवीन नियोजित रुग्णालय इमारतीत प्रायोगिक तत्वावर सशुल्क व सुपर स्पेशालिटी रुग्णालय सध्या चालवावे व त्याला कसा प्रतिसाद मिळतो यावर पुढील नियोजन करावे.

३) पुढील नियोजनानुसार हे सुपर स्पेशालिटी रुग्णालय नवीन इमारतीत वैद्यकीय महाविद्यालय प्रारुप अशी निगडीत असावे व सध्याच्या नव्या इमारतीत जुने रुग्णालय प्रस्तापित करावे.

४) हे सुपर स्पेशालिटी रुग्णालय चालविण्यासाठी तीन पर्याय सुचविले गेले आहेत.

अ) हे रुग्णालय जुन्या रुग्णालयाप्रमाणे नाममात्र शुल्कावर धर्मादाय म्हणून चालविण्यात यावे.

ब) हे रुग्णालय ना नफा ना तोटा या तत्वावर चालविण्यात यावे, जे कालांतराने चांगला प्रतिसाद मिळाल्यास नुकसानीत जाणार नाही.

क) हे रुग्णालय इतर खाजगी रुग्णालयाप्रमाणे व्यावसायिक स्वरुपात चालवावे.

वरील पर्यायानुसार एक पर्यायाची निवड करुन संपूर्ण प्रारुप अहवाल तयार करण्यासाठी सांगावे लागेल.

**वरील पर्यायांचा विचार करता -**

**अ)** हा पर्याय मुद्दाम निवडण्यासारखा नाही. कुठल्याही पर्यायांना योग्य प्रतिसाद न मिळाल्यास हा पर्याय आपोआपच मिळू शकतो. या पर्यायानुसार जास्त काळ सेवा देता येणे शक्य नाही.

**ब)** श्री साईबाबा संस्थानचा आजवरचा अनुभव लक्षात घेता हा पर्याय निवडण्यायोग्य आहे. जेणे करुन गरीब व मध्यम वर्गीय सेवांचा लाभ घेऊ शकतील व ब-याच दूरवरचे रुग्ण उपलब्ध होऊ शकतील व नफा न झाला तरी तोटा नसेल तर या सेवा दीर्घकाळ चालू ठेवता येऊ शकतील.

**क)** या पर्यायानुसार रुग्णालयाला प्रतिसाद मिळण्यासाठी बराच उशीर लागेल व असा पर्याय जागोजागीच्या शहरात उपलब्ध असल्यामुळे रुग्णांची उपलब्धता कमी असेल.

वरील पैकी **(ब)** पर्याय निवडून त्यानुसार प्रारुप अहवाल सादर करण्याची विनंती डॉ.विनय कोठारी यांना करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.विनय कोठारी यांनी सादर केलेल्या प्रकल्प अहवालाच्या आराखड्यानंतर अंतिम अहवालाचे प्रारुप ठरविण्यासाठी मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.विश्वस्त कॅप्टन सुरेश वासुदेवा व डॉ.एकनाथ भा.गोंदकर या सर्वासमवेत लवकरच एक खास सभा बोलावून त्यात निर्णय घ्यावा असे ठरले. त्याच बैठकीत नवीन नियोजित रुग्णालयाच्या नावासंबंधीही चर्चा व्हावी, असे ठरले.

(कार्यवाही- वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**विषय नं.१४. सी.टी.स्कॅनसाठी लागणाऱ्या ए.सी. खरेदीसंबंधी कार्योत्तर मंजूरीबाबत.**

**निर्णय क्र. ४९०.** श्री साईनाथ रुग्णालयात नवीन मा.व्य.स.च्या मंजुरीने नवीन सी.टी.स्कॅन ६४ Slices चे मशिन खरेदीबाबत इकडील पत्र क्र.२८३३ दि.१५/०३/२००५ रोजी मे.सिमेन्स लि.,मुंबई यांना पुरवठा आदेश देण्यात आला होता. सदर मशिनची किंमत रु.३,९८,३७,८३३/-इतकी असून सदर मशीन रुग्णालयात दि.०६/०७/२००५ रोजी प्राप्त झाले होते. सदर मशिनचे Installation करणे कामी पूर्वी बसवलेले एअर कंडीशनरची क्षमता कमी पडत असल्याने कंपनीने दि.१४/०६/२००५ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे एअर कंडीशन बसवावी लागतील असे कळविले होते.

१) १.५ टन - २ नग

२) २ टन - २ नग

वरील मशीन (A/C) ची किंमत त्यांनी १,५२,५००/- अधिक वाहतुक भाडे रु.१२००/-अधिक बसविण्याचे चार्जेस रु.३२,५२०/- असे एकूण रु.१,८६,२२०/- (अक्षरी रु.एक लाख श्याऐंशी हजार दोनशे वीस मात्र) इतका खर्च कळविला होता. सी.टी.स्कॅन मशिन बसविणे व कार्यान्वित करावयाचे कामास वेळ लागू नये म्हणून मा.का.अ. यांचे दि.२५/०५/२००५ चे मंजुरी अन्वये कंपनीस वरील प्रमाणे एअर कंडीशनर आपण बसवून दयावे असे दि.१५/०६/२००५ चे पत्रान्वये कंपनीस कळविण्यात आले होते.

त्यानुसार कंपनीने एअर कंडीशनर बसविले असून मशिन कार्यान्वित करून दिलेले आहे. त्याचे बील क्र. ३०२७४७६९ दि.०३/०८/२००५ रु.१,६६,०२०/- (अक्षरी रु.एक लाख सहासष्ट हजार वीस मात्र) इतके पाठविले असून सदरचे खर्चास व खरेदीस कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**विषय नं.१५. नवीन नियोजित रुग्णालयासाठी रेफ्रिजरेटर खरेदीबाबत.**

**निर्णय क्र. ४९१** नवीन नियोजित रुग्णालय लवकरच २०० पलंगांसहित कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे. औषधी व इतर साहित्य ठराविक तापमानात ठेवण्यासाठी काही रेफ्रिजरेटर्सची आवश्यकता भासणार आहे. त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.नं. | तपशील | क्षमता | वापराचे ठिकाण | नग | दर प्रत्येकी रुपये | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | डबल डोअर रेफ्रिजरेटर | ३०० लि. | ऑपरेशन थियेटर ६<br>औषधी भांडार ३<br>हदयरोगकक्ष<br>अतिदक्षता कक्ष ३ | १२ | १५,०००/- | १,८०,०००/- |
| ०२. | डबल डोअर रेफ्रिजरेटर | २०० लि. | अपघात कक्ष १<br>वॉर्डस ५<br>कार्डियॅक ओपीडी २<br>वरिष्ठ प्रशासक १<br>वैद्यकिय प्रशासक १ | १० | रु.१०,०००/- | १,००,०००/- |
| ०३. | रेफ्रिजरेटर | १६५ लि. | स्पेशल रुम्स | ५ | ८,०००/- | ४०,०००/- |
| | | | एकूण | २७ | | ३,२०,०००/- |

यावर सविस्तर चर्चा होऊन,नियोजित रुग्णालयासाठी उपरोक्तप्रमाणे एकूण २७ रेफ्रिजरेटर्स निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३,२०,०००/- चे खर्चास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये/ अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.१६. औषध भांडारासाठी रॅक्स व कपाटे खरेदीबाबत.**

**निर्णय क्र. ४९२.** दि. ९ जुलै २००५ रोजी विश्वस्त सभेच्या बैठकीत औषधी खरेदीच्या संदर्भात मा.विश्वस्त आमदार श्री राधाकृष्णजी विखे पाटील यांनी प्रवरेच्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या भांडार पध्दतीची पाहणी करावी व त्यातून आपल्या येथील भांडारात काही सुधारणा कराव्यात असे सुचविले आहे. त्यानुसार दि.११ जुलै २००५ रोजी लोणी येथील वैद्यकीय महाविद्यालयातील भांडाराची पाहणी केली. त्यांच्या भांडाराची मांडणी व कार्यपध्दतीचा अभ्यास केला. त्यानुसार काही गोष्टी आपल्या संस्थेत अमलात आणता येउ शकतील.

१) त्यांच्याकडे निविदा न काढता माहितीच्या ठोक पुरवठा धारकाकडे मागणी केली जाते. ही पध्दत स्वीकारली जाऊ शकते.
२) औषधांची शिफारस डॉक्टरांच्या समितीकडून घेतली जाते. आपली अशीच पध्दत आहे.
३) दर महिन्याला लागेल त्याप्रमाणे पुरवठा आदेश दिला जातो. आपल्याकडे हा दर दोन महिन्यांसाठी देता येईल.
४) निवडलेल्या औषधांच्या दोन पुरवठा धारकांना पुरवठा यादीवर ठेवले जाते, त्यामुळे ऐनवेळी माल नसल्यास अडचण होत नाही. ही पध्दत आपल्याकडेही स्वीकारली जाऊ शकते.
५) या सर्व वस्तूंची मांडणी आकर्षक पध्दतीने निरनिराळया कप्प्याच्या सेल्फमध्ये व काही काचेच्या लोखंडी कपाटामध्ये केलेली आहे.

वरील प्रकारे साहित्याची प्रवरा येथे जाऊन पाहणी करण्यात आली आहे. त्यानुसार संस्थानचे रुग्णालयात किमान खालील वस्तू करणे आवश्यक असून त्यासाठी अंदाजे एकूण रुपये ५,३०,०००/- खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.न. | वस्तू | तपशील | आवश्यक नग | एका नगाची अंदाजे किंमत | एकूण अंदाजे किंमत |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | स्टोअरेज रॅक | १८ कप्पे साठवण | ३० | रु.११,०००/- | रु.३,३०,०००/- |
| ०२ | काचेचे लोखंडी कपाट | अल्विन /खिरा/ गोदरेज | २५ | रु ८,०००/- | रु.२,००,०००/- |
| | | (अक्षरी रुपये पाच लाख तीस हजार मात्र) | | एकूण | रु.५,३०,०००/- |

यावर सविस्तर चर्चा होऊन, रॅक्सच्या योग्य स्पेसिफीकेशन प्रमाणे दर मागविण्यात येऊन निम्नतम दराने खरेदी करण्यात यावी. तसेच गोदरेज, अल्वीन व खिरा या कंपनीची काचेची लोखंडी कपाटे खरेदीकामी कोटेशन्स मागवून निम्नतम दराने खरेदी करण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये/अधिक्षक, खरेदी विभाग )

**विषय नं.१७. गॅस्ट्रो आजाराच्या रुग्णांवरील वैद्यकीय सेवेबाबत.**

**निर्णय क्र. ४९३.** सध्याचे खराब वातावरण व दुषित पाण्यामुळे शिरडी व शिरडी परिसरातील अनेक रुग्णांना गॅस्ट्रोची लागण झाल्याने मोठ्या प्रमाणात गॅस्ट्रोचे रुग्ण श्री साईनाथ रुग्णालयात उपचारार्थ दाखल झाले होते. सदर आजार हा संसर्गजन्य असल्याने या आजाराचा रुग्णालयातील इतर रुग्णांना संसर्ग होऊ नये यासाठी सदरचे रुग्ण हे धर्मशाळा इमारतीमधील तळमजल्यामध्ये तातडीची गरज म्हणून स्थलांतरीत करुन या रुग्णांकरीता स्वतंत्र आयसोलेशन वॉर्डची सोय दिनांक २५.०७.२००५ पासून दिनांक १२.०८.२००५ पर्यन्त उपलब्ध करुन देण्यात आली होती.

याबाबत दिनांक २५.०७.२००५ रोजी मा.विश्वस्त श्री राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील, मा.कार्यकारी अधिकारी, वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये व वैद्यकीय अधिक्षीका यांनी रुग्णालयामध्ये समक्ष भेट देऊन रुग्णांची स्थिती व त्याबाबतची माहिती घेऊन गॅस्ट्रो या रुग्णांवर करण्यात येणारे वैद्यकीय उपचार हे पूर्णतः मोफत देणेबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. सदरची सेवा ही हा आजार आटोक्यात येईपर्यन्त सुरु ठेवण्यात आली होती. त्याचा शिरडी व शिरडी परिसरातील ७५ रुग्णांना फायदा मिळालेला असून या रुग्णांच्या वैद्यकीय उपचारापोटी रुपये ३२,४८८/- इतका खर्च झालेला असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही -वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय/वैद्यकीय प्रशासक, रुग्णालये )

**विषय नं.१८. मंदिरातील कार्यक्रम व देणगीबाबत माहितीसाठी फलक तयार करणेकामी आलेले कोटेशन्स उघडणेबाबत.**

**निर्णय क्र. ४९४.** श्री साईबाबांच्या दर्शनासाठी येणा-या साईभक्तांची गर्दी दिवसेंदिवस झपाट्याने वाढत आहे. साईभक्तांचे सोईसाठी संस्थान मार्फत आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. सदर सोयीसुविधांची माहिती शिर्डीत येणा-या साईभक्तांना व्हावी तसेच शिर्डीत आल्यानंतरही साईभक्तांची फसवणूक होवू नये, त्यांचा बहुमूल्य वेळ वाया जावू नये, याकरीता साईभक्तांच्या सोईसाठी मार्गदर्शक फलक लावणेबाबत मा. अध्यक्ष महोदय, यांनी सूचना केल्या आहेत. मंदीरातील 'श्री' च्या आरत्यांची वेळ, तसेच साईभक्तांना देणगी अथवा धार्मिक विधीसाठी कूपन घ्यावयाचे असल्यास त्यांचे दर व नियम

साईभक्तांना माहिती व्हावी याकरीता फलक तयार करुन घेण्याचे ठरले आहे. देणगी फलकाचे बोर्ड भक्तनिवासस्थान, मंदीर परिसर, स्वागत कक्ष, २०० रुम, (धर्मशाळा परिसर ) प्रसादालय, हॉस्पिटल इ. ठिकाणी तसेच मंदीर 'श्री' च्या आरतीचे फलक उपरोक्त ठिकाणी तसेच शिर्डी बस स्थानक, मनमाड, कोपरगांव व श्रीरामपूर रेल्वे स्थानकावर लावता येतील. याकामी येणारे अंदाजे रु.३,००,०००/- मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०८/२००५ रोजीचे सभेत मान्यता देण्यात आली आहे. अशाप्रकारचे काम करणा-या खालील एजन्सीजकडून कोटेशन मागविण्यात येत आहेत.

०१.पूजा डिजिटल सांताकृज, मुंबई
०२.साईन वर्ल्ड, विले पार्ले, मुंबई
०३.हेमंत आर्ट, शिर्डी
०४.सोमवंशी पेंटर, राहाता
०५.जाधव रबर स्टॅम्प, नाशिक
०६.पोतदार मार्बल्स, नाशिक

सिलबंद कोटेशन सादर करण्याची मूदत दि. ३१/०८/२००५ अखेर होती.
विहित मुदतीत खालील एजन्सीजकडून कोटेशन प्राप्त झाले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नांव |
|---|---|
| ०१ | पुजा डिजिटल, सांताक्रुझ, मुंबई |
| ०२ | जाधव रबर स्टॅम्प कं., नाशिक |
| ०३ | श्री. सोमवंशी एम.जी., राहाता |
| ०४ | पोतदार डिजिटल ग्राफीक्स, नाशिक |
| ०५ | साईन वर्ल्ड, विले पार्ले, मुंबई |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेपूढे समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना चर्चा /वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.
उपस्थित असलेल्या सर्व निविदासादरकर्त्यांना सभेचे समक्ष बोलावून त्यांना देऊ केलेल्यां दरात आणखी काही सूट देणार किंवा कसे याबाबत लेखी पत्र देणेबाबत सांगणेत आले.

त्यानुसार निविदासादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर दिले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नांव | कोटेशनमधील दर | सुधारित देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | पुजा डिजिटल, सांताक्रुझ, मुंबई | १,७०,०००.०० | १,६८,१५०.०० |
| ०२ | जाधव रबर स्टॅम्प कं., नाशिक | १,४०,२४०.०० | --- |
| ०३ | श्री. सोमवंशी एम.जी., राहाता | १,२२,८००.०० | १,००,६९६.०० |
| ०४ | पोतदार डिजिटल ग्राफीक्स, नाशिक | २,०६,९००.०० | --- |
| ०५ | साईन वर्ल्ड, विले पार्ले, मुंबई | १,६०,०००.०० | १,३९,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तपैकी निम्नतम दरधारक श्री सोमवंशी एम.जी.,राहता यांचेकडून प्रथम नमुनादाखल प्रत्येकी एक फलक तयार करुन घेण्यात यावा. नमुना मान्य करुन उर्वरित फलक तयार करणेत यावेत असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१९. स.नं.१०७ मध्ये कम्पाऊंड भिंत बांधकामासाठी आलेल्या निविदाबाबत.**

**निर्णय क्र. ४९५.** शिर्डी सर्व्हे क्र. १०७,१०८ व १०९ पै. मधिल जागेत भक्तनिवास इमारत, शैक्षणिक संकूल, क्वॉर्टर इत्यादी बांधण्यात आलेल्या आहेत. पूर्व बाजुची कम्पाउंड भिंत बांधणे बाकी आहे. भक्तनिवासस्थान इमारतीचे पूर्व बाजुकडील ३२०.१० मी. पैकी १९८.६० लांब अंतराची कंम्पाउंड भिंत बांधकाम करणे आवश्यक आहे.

याकामी येणारे रु. ४,५४,७९४.०० चे खर्चास मा. व्यवस्थापन समितीच्या दि. ०९/०७/२००५ चे सभेत मान्यता देण्यात आलेली आहे. याकामाचे तपशिलवार अंदाजपत्रक आर्कीटेक्ट मे. निकम पा. असो. श्रीरामपूर यांनी तयार केले असून त्यानुसार अपेक्षित खर्च रु. ४,८९,३४८.०० मात्र इतका आहे. याकामी गावकरी व सार्वमत या वर्तमान पत्रात निविदा सुचना प्रसिद्ध करुन निविदा मागविण्यात आल्या आहेत.

त्यानुसार सदर कामाची को-या निविदा फॉर्म विक्रीची मूदत दि. १८/०८/२००५ ते दि.२५/०८/२००५ अशी होती. सदर कालावधीत याकामासाठी खालील ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतलेले आहेत.

०१) मे. साहेबराव कोकाटे अँण्ड असो. नाशिक
०२) मे. बी.डी. शिंदे, अँण्ड कं., राहाता.
०३) श्री.पी.बी. जाधव, संगमनेर
०४) श्री. साईकुमार बी. माळवदे, साकुरी राहाता.

०५) मे. एम.अे. चंदवाणी, पंचवटी, नाशिक

सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत दि. ३१/०८/२००५ अखेर होती.

विहित मूदतीत खालील निविदासादरकर्त्यांनी सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

| अ.न | निविदासादरकर्त्यांचे नांव |
|---|---|
| ०१ | श्री बी.पी.जाधव, संगमनेर |
| ०२ | श्री. साहेबराव कोकाटे अॅण्ड असो.नाशिक |
| ०३ | श्री साईकुमार बी माळवदे, साकुरी, ता.राहाता. |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले निविदा आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नांव | निविदेतील दर रुपये | वाटाघाटीनंतरचे दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | श्री बी.पी.जाधव, संगमनेर | १० % अधिक | ६ % अधिक |
| ०२ | श्री. साहेबराव कोकाटे अॅण्ड असो.नाशिक | २.९ % कमी | ३.९ % कमी |
| ०३ | श्री साईकुमार बी माळवदे, साकुरी, ता.राहाता. | ५ % कमी | अपात्र |

यावर सविस्तर चर्चा होऊन, अ.नं.०२ चे निविदासादरकर्ते श्री. साहेबराव कोकाटे अॅण्ड असो., नाशिक यांची निम्नतम दराची निविदा स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२०. स.नं.१२४ मध्ये मध्यवर्ती भांडारकरीता अंतर्गत डांबरी रस्ता व सी.डी. वर्क बांधकामासाठी आलेल्या निविदाबाबत.**

**निर्णय क्र. ४९६.** संस्थानचे सर्व्हे नं. १२४/१ मध्ये संस्थानचे नविन मध्यवर्ती भांडार इमारतीचे काम पूर्ण होत आले आहे. याठिकाणी संस्थानच्या मालकीची १ हे. ०९ आर इतकी जागा आहे. सदर जागेलगत चारी नं. १२ लगतचा रस्ता आहे. हा रस्ता आलीकडेच संस्थानतर्फे डांबरीकरण करण्यात आला आहे. या रस्त्यापासून भांडार इमारतीपर्यंत जाण्यासाठी चारीवर सी.डी.वर्क व पक्का अंतर्गत रस्ता करण्याची आवश्यकता आहे.

याकामी येणा-या रु. ७,२०,०००.०० चे खर्चास मा. व्यवस्थापन समितीच्या दि. ०९/०७/२००५ चे सभेत मान्यता देण्यात आलेली आहे. याकामाचे तपशिलवार अंदाजपत्रक आर्कीटेक्ट मे. निकम पा.असो. श्रीरामपूर यांनी तयार केले असून त्यानुसार अपेक्षित खर्च रु. ७,६५,७७९.०० मात्र इतका आहे. याकामी गावकरी व सार्वमत या वर्तमान पत्रात निविदा सूचना प्रसिद्ध करुन निविदा मागविण्यात आल्या आहेत.

त्यानुसार सदर कामाचे को-या निविदा फॉर्म विक्रीची मूदत दि. १८/०८/२००५ ते दि.२५/०८/२००५ अशी होती. सदर कालावधीत याकामासाठी खालील ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतलेले आहेत.

१. मे. पॅसो इंजिनिअर्स अॅण्ड कॉन्ट्रक्टर्स , कोपरगांव
२. श्री.बी.एम. कु-हाडे, मु.पो. मढी खुर्द ता. कोपरगांव
३. मे.बी.डी.शिंदे अॅण्ड कं., राहाता
४. श्री. साईकुमार बी. माळवदे, साकुरी ता. राहाता.
५. मे.एस.ए. चंदवाणी, पंचवटी, नाशिक

सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत दि. ३१/०८/२००५ अखेर होती.

विहित मूदतीत खालील निविदासादरकर्त्यांनी सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

| अ.नं | निविदासादरकर्त्यांचे नांव |
|---|---|
| ०१ | मे. बी.डी. शिंदे अॅण्ड कं.,राहाता |
| ०२ | मे.पॅसो इंजि. अॅण्ड कॉन्ट्रक्टर्स , कोपरगांव |
| ०३ | श्री साईकुमार बी माळवदे, साकुरी, ता.राहाता. |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडणेत येऊन निविदासादरकर्त्यांना आजचे सभेत समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता निविदासादरकर्त्यांनी पुढीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं | निविदासादरकर्त्यांचे नांव | निवीदेतील दर | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | मे. बी.डी. शिंदे अॅण्ड कं.,राहाता | ५,४०% अधिक | पात्र |
| ०२ | मे.पॅसो इंजि. अॅण्ड कॉन्ट्रक्टर्स, कोपरगांव | ७.०७% कमी | अनामत रक्कम डी.डी. अथवा कॅशमध्ये नाही एफडी रिसिटमध्ये दिलेली आहे त्यामुळे अपात्र |
| ०३ | श्री साईकुमार बी माळवदे,साकुरी, ता.राहाता. | ---- | किमान पात्रतेच्या अटीनुसार काम केलेले नाही त्यामुळे अपात्र |

किमान पात्रता, निविदा अटी व शर्तीनुसार एकच ठेकेदार पात्र होत आहेत. यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त कामी फेर निविदा मागविण्यात याव्यात असें ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२१ गुरुस्थान मंदिर जिर्णोद्धार करणेबाबत.**

**निर्णय क्र. ४९७.** गुरुस्थान मंदिरातील पवित्र निंबवृक्षाच्या खोडालगत श्रींच्या फोटो करीता आर.सी.सी.मध्ये लहान आकाराचे मंदीर बांधण्यात आलेले आहे. निंबवृक्षाच्या नैसर्गिक वाढीमुळे या लहान आकाराचे मंदिराच्या एका खांबास तडा गेल्याचे आढळून आले आहे.तसेच गुरुस्थान मंदीराच्या छताच्या मधून फांद्या जाण्यासाठी छिद्र (मोकळी जागा) ठेवण्यात आले आहे. छताचे छिद्र लहान आकाराचे असल्यामुळे फांद्यांच्या वाढीस अडथळा निर्माण होत आहे.

याकरीता यापुर्वी व्यवस्थापन मंडळाचे सभेत दि. १२-१३/०७/२००३ रोजी गुरुस्थान मंदीराचे नूतनीकरण करणेबाबत ठरले होते. त्यामध्ये सध्याचे गुरुस्थान मंदीर व त्याच्या आतील लहान आकाराचे मंदीर काढून टाकणे, पवित्र निंबाचे वृक्षास हात लावता येणार नाही अशा अंतरावर ग्रील मध्ये झाडाच्या बाजुनी स्ट्रक्चर उभारणे. सध्या असलेला फोटो व मुर्ती नविन म्युझियम हॉलमध्ये ठेवण्यात यावेत असे ठरले होते. त्याचप्रमाणे सदर कामाचा समावेश मंदीर परिसरातील इतर वाढीव सोयी - सुविधा निर्माण करण्याचे कामात करण्यात आला होता. परंतू सदर कामाबाबत तत्कालीन अध्यक्ष यांनी त्यांनंतर समक्ष पहाणी केली असता या कामी फेर विचार करु असे ठरले होते.

याबाबत विद्यमान व्यवस्थापन समितीचे दि. १७/११/२००४ चे सभेत चर्चा झाली. त्यावेळी निर्णय क्र. ९९ अन्वये गुरुस्थान मंदीराचे प्रस्तावीत केलेले काम करण्यात येवु नये असे ठरले आहे. त्यामुळे सदरचे काम मंदीर परिसरातील इतर वाढीव सोयी- सुविधा निर्माण करण्याच्या कामातून वगळण्यात आले आहे.

गुरुस्थान मंदीराचे जिर्णोधाराकरिता यापूर्वी म्युझियमचे कामासाठी नेमणूक करण्यात आलेले सल्लागार डॉ.सदाशिवराव गोरक्षकर,मुंबई यांचे मार्गदर्शनानुसार आर्किटेक्ट श्री.बॉबी विजयकर, ठाणे यांचेकडून सुधारित आराखडा व खर्चाचा प्रस्ताव तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२२. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे शिर्डी बस स्थानक विकसीत करणेबाबत.**

**निर्णय क्र. ४९८.** विभाग नियंत्रक,राज्य परिवहन, अ.नगर यांनी दि. ०३/०८/२००५ चे पत्रान्वये कळविले आहे की, शिर्डी येथे श्री साईबाबा यांचे समाधीच्या दर्शनार्थ सर्व भारताच्या कानाकोप-यातून व जगभरातून 'साईभक्त' येतात . भक्तांसाठी आपल्या देवस्थानाने अतिशय अत्याधुनिक पध्दतीने सर्व सुखसोयी उपलब्ध केलेल्या आहेत. त्यामुळे देवस्थानचा सर्व दूर लौकीक आहे. या लौकिकात भर पडण्याच्या हेतूने भक्तांच्या सोईसाठी व येणा-या भक्तांचा ओघ विचारात घेता शिर्डी येथे परिपूर्ण असे अत्याधुनिक बस स्थानक होणे अत्यंत गरजेचे आहे.

तथापी रा.प. महामंडळ सध्या अर्थिक अडचणीतून जात असल्याने महामंडळाची इच्छा असूनही नजीकच्या भविष्यात अशा प्रकारचे सर्व सोयी युक्त व परिपूर्ण अत्याधुनिक असे बस स्थानक उभारु शकत नाही. असे विभाग नियंत्रक यांनी उपरोक्त पत्रात नमूद केले आहे. तसेच शिर्डी येथिल सर्व्हे क्र. १७० मध्ये ९८.६५ आर इतके क्षेत्र राज्य परिवहन महामंडळाचे असून त्यावर सध्याचे बसस्थानक आहे. सदर जागेत खालील सोयी सुविधा युक्त बसस्थानक संस्थान खर्चाने उभारुन द्यावे अशी विनंती केली आहे.

१. प्रशस्त असा प्रवेश मार्ग
२. भव्य प्रतिक्षालय
३. भव्य आरक्षण कक्ष
४. पार्सल रुम
५. भव्य नियंत्रण कक्ष
६. अद्यावत असे चालक / वाहक विश्रांतीगृह
७. बस स्थानकाच्या तळास मार्बल/ ग्रेनाईट फ्लोरींग
८. संपूर्ण वाहन तळास कॉंक्रीटीकरण
९. अत्याधुनिक व आकर्षक अशी कुंपन भिंत
१०. संपूर्ण परिसराचे अत्याधुनिक पध्दतीने विद्युतीकरण व सुशोभिकरण
११. येणा-या भक्त प्रवासी जनांचे सोईसाठी भव्य असे स्त्री व पुरुषांकरीता प्रसाधनगृह
१२. भव्य अतिथ्यालय इत्यादी बाबींनी परिपूर्ण व अत्याधुनिक स्वरुपाचे फलाट असलेले बस स्थानक

त्याचप्रमाणे उपाध्यक्ष - तथा- कार्यकारी संचालक, परिवहन महामंडळ, नाशिक येथिल बस स्थानकाचे धर्तीवर शिर्डी येथिल बस स्थानक विकसीत करण्याचा प्रस्ताव असल्याचे कळविले असून त्यासाठी रु. २.०० कोटी इतकी रक्कम संस्थानकडून मिळणेबाबत विनंती केली आहे.

श्री साईबाबांच्या दर्शनासाठी महाराष्ट्रातील काना कोप-यातून नव्हे तर देशातून / परदेशातूनही साईभक्त राज्य परिवहन मंडळाच्या बसेस मधून शिर्डी येथे येतात. सध्या शिर्डी येथिल बसस्थानकाची

परिस्थीती फारच वाईट आहे. प्रसाधन गृह, वेटींग हॉल इत्यादी सोयी-सुवीधा व स्वच्छतेचा अभाव तसेच वहानतळासाठी अपूर्ण जागा यामुळे येणा-या साईभक्तांची / प्रवाशांची फारच गैरसोय होते. करीता सर्व सोयी - सुविधा युक्त असे आधुनिक बसस्थानक शिर्डी येथे अत्यंत आवश्यक आहे. परंतू राज्य परिवहन महामंडळ ही मुख्यतः व्यापारी तत्वावर चालणारी संस्था आहे. त्यामुळे सदर बसस्थानकाचे काम त्यांनी स्वतः अथवा बी.ओ.टी. पद्धतीने करणे आवश्यक आहे. बसस्थानकाची जागा मोक्यावर असल्याने बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करणे किफायतशीर ठरु शकेल. संस्थानतर्फे निधी उपलब्ध करावयाचा झाल्यास तो कर्जाऊ ( Loan) म्हणून देता येईल.

संस्थानतर्फे याकामी अनुदान अथवा कर्जाउ स्वरुपात निधी उपलब्ध करुन देणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था ( शिर्डी ) अधिनियम २००४ मधिल कलम २१ पोट-कलम (२) नुसार राज्य शासनाची पूर्व मंजुरी घेणे आवश्यक आहे.

तरी शिर्डी बसस्थानक सर्व सोयी सुविधायुक्त विकसित करणेसाठी संस्थान तर्फे राज्य शासनाचे पूर्वमंजुरीने अनुदान अथवा कर्जाउ स्वरुपात अंशतः निधी उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, एस.टी महामंडळाचे अधिकाऱ्यांना समक्ष चर्चेसाठी व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे बोलविण्यात यावे असें ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२३. घनकचरा विल्हेवाट, सांडपाण्यावर प्रक्रिया करणेकामी प्रकल्प अहवाल तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र. ४९९.** संस्थान व शिर्डी शहरासाठी घनकचरा विल्हेवाट, सांडपाण्यावर प्रक्रीया करणे इत्यादी प्रकल्प हाती घेण्याचे प्रस्तावीत आहे. याकरीता इंजिनिअरींग क्षेत्रातील पर्यावरणा विषयी सल्ला, घनकचरा व्यवस्थापन, वेस्ट पासून उर्जा इत्यादीसाठी प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रकल्पाची व्यवहार्यता इत्यादी कामी सल्ला घेण्यासाठी व्यवस्थापन समितीचे दि. ६/८/२००५ रोजी झालेल्या सभेत चर्चा करणेत आली. त्यावेळी वर्तमानपत्रात जाहिरात देवून या क्षेत्रातील नामांकीत कंपन्याकडून अर्ज/माहिती मागविणे बाबत ठरले आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देवून दिनांक १/९/२००५ पर्यंत कार्यालयीन वेळेत अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार खालील कंपन्यांनी अर्ज सादर केले आहेत.

| अ.नं. | अर्जदारांचे नाव |
|---|---|
| ०१. | मिटकॉन कन्सलटंट सर्व्हिसेस लि. पुणे |
| ०२. | एम डब्लु एच इंडिया प्रा.लि.,मुंबई |
| ०३. | इंप्राटेक सोल्युशन, पुणे |
| ०४. | एक्सेल इंडस्ट्रीज लि., मुंबई |
| ०५. | महाबल ऐनव्हायरमेंट इंजिनिअरींग प्रा.लि., नाशिक |
| ०६. | अश्वमेध इंजि. ॲण्ड कंन्सलटंट को-ऑप लि.,नाशिक |
| ०७. | मॅकलीन कंन्सलटंट प्रा.लि., पुणे |
| ०८. | तेजश्री एंटर प्रायजेस, पुणे |
| ०९. | किर्लोस्कर कन्सलटन्सी, पुणे |
| १०. | अनंत टेक्नोक्रेट प्रा.लि., नाशिक |
| ११. | ब्रीटो इनर्जी इंजिनिअर्स , मुंबई |
| १२. | स्त्री मुक्ती संघटना, मुंबई |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले अर्ज आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आले.तसेच वरील अर्जासोबत उद्यान विकसित करण्याच्या अर्जाचे बंद पाकीटात एनर्जी टेक, पुणे यांचा अर्ज प्राप्त झाल्याने सदरचा अर्जही उघडण्यात आला.

वरीलप्रमाणे आलेल्या अर्जाची छाननी करुन कामाचा अनुभव इत्यादि माहितीसह यादी तयार करावी व व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे सादर करण्यात यावी, असें ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२४. शिरडी येथे उद्यान विकसित करणेबाबत.**

**निर्णय क्र. ५००.** श्री साईबाबा हे सर्वधर्म समभावाचे प्रतिक व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान म्हणून ओळखले जातात. त्यामुळे शिर्डी या महत्त्वाच्या धार्मिक स्थळाला भेट देण्यासाठी संपूर्ण देशातून त्याचप्रमाणे परदेशातून येणा-या भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. शिर्डी येथे साईभक्तांच्या सोयीसाठी आजपावेतो अनेक विकास प्रकल्प संस्थानतर्फे उभारण्यात आलेले आहेत. त्यामध्ये लेंडीबाग, धर्मशाळा, नवीन भक्तनिवासस्थान, धर्मशाळा या ठीकाणी बगिचा विकसीत करण्यात आलेला आहे. परंतू एकाच ठिकाणी सलग व विस्तिर्ण स्वरुपातील उद्यान सध्या शिर्डी परिसरात उपलब्ध नाही. त्यामुळे अशा प्रकारचे विस्तिर्ण स्वरुपातील उद्यान शिर्डी येथे निर्माण करणेसाठी दि. १३/३/२००५ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत उद्यानाचे नियोजीत कामासाठी प्रथम तपशिलवार डीझाईन, एस्टीमेटसह प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करणेसाठी लॅण्डस्केप आर्कीटेक्ट व हॉर्टीकल्चरीस्ट यांची संयुक्तरित्या नेमणूक करण्यास निर्णय क्र. १०५ अन्वये मान्यता देणेत आली.

दि.६/८/२००५ रोजी शिरडी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये मौजे निमगांव को-हाळे येथिल संस्थानचे शेती महामंडळाकडून संपादीत केलेल्या एकूण ८ हेक्टर २० आर (२०.५० एकर )

जागेवर उद्यान विकसीत करणेकामी आर्कीटेक्ट सुरेश घोरपडे असो., मुंबई यांनी तयार केलेला आराखडा सादर करण्यात आला. त्यावर सविस्तर चर्चा होउन लॅन्डस्कोपींग/ हॉर्टीक्लचर/गार्डनिंग कन्सल्टंटची वर्तमानपत्रात जाहिरात देउन अर्ज मागविणेबाबत निर्णय झाला होता. त्यानुसार वर्तमान पत्रात जाहिरात देवून दिनांक १/९/२००५ पर्यत कार्यालयनी वेळेत अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार खालील आर्कीटेक्ट / सल्लागार यांनी मुदतीत अर्ज सादर केले आहेत.

| अ.नं. | अर्जदारांचे नाव |
|---|---|
| ०१. | माढव कंन्सलटंट (इंडीया ) प्रा.लि.,मुंबई |
| ०२. | श्री. भवर एम.आर., पुणे |
| ०३. | डॉ. राजेंद्र देशमुख, मुंबई |
| ०४. | शोभा भोपटकर, पुणे |
| ०५. | मे.ग्रीन प्ले व्हीजन, मुंबई |
| ०६. | महाराष्ट्र स्टेट सीडस् , अकोला |
| ०७. | ग्रीन टेक, पुणे |
| ०८. | बी.व्ही.जी. इंडीया लि., पुणे |
| ०९. | अनंत टेक्नोक्रेट प्रा.लि., नाशिक |
| १०. | संदेरसन ग्रुप (इंडीया) प्रा.लि.मुंबई |

खालील दोन सिलबंद अर्ज मुदतीनंतर प्राप्त झालेले आहे.

| अ.नं. | अर्जदारांचे नाव |
|---|---|
| १. | दि डिझाईन, मुंबई |
| २. | संदिप गोवलकर डिझाईन असो., मुंबई |

वरीलप्रमाणे अर्जासोबत घनकचरा विल्हेवाट सल्लागारांचे अर्जाचे बंद पाकीटात किर्लोस्कर कन्सल्टंट प्रा.लि. पुणे , सालकर ॲण्ड देशमाने, पुणे यांचे अर्ज प्राप्त झाले. कृषी सेवा केंद्र, कर्जत यांचे पत्र दुसऱ्या विभागाकडून प्राप्त झालेले आहेत. व एम.बी.बोरकर,मुंबई यांचा उशिरा प्राप्त झालेला अर्जही आजचे सभेपुढे उघडण्यात आला.

वरिलप्रमाणे आलेल्या अर्जाची छाननी करुन कामाचा अनुभव इत्यादि माहितीसह यादी तयार करावी व व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे सादर करण्यात यावी, असें ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२५. स्टील टी जार खरेदीचे जादा खर्चास मंजूरी देणेबाबत.**

**निर्णय क्र. ५०१.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२९.१.२००५ निर्णय क्र.२३ नुसार संस्थानचे कॅन्टीन विभागामार्फत मुख्य कॅन्टीन, साईप्रसाद कॅन्टीन, भक्तनिवास कॅन्टीन, रुग्णालय कॅन्टीन, इत्यादी ठिकाणी साईभक्तांना चहा, कॉफी, दूध इ.चा पुरवठा करणेकामी आवश्यक असणारे टि जार हिंदूस्थान अथवा इतर नामांकित कंपन्यांचे कोटेशन मागवून खरेदीस व त्याकामी येणारे रु.२४,९००/-चे खर्चास मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार कोटेशन्स मागवून न्युनतम दरधारक मे.नवनितलाल ॲण्ड ब्रदर्स, नाशिक यांना जा.क्र.५५७७ दि.२८.५.२००५ अन्वये हिंदुस्थान कंपनीचे स्टेनलेस स्टील टी जार खरेदी करणेत आलेले आहेत. याकामी एकुण रु.३८,७१५/-अधिक १२.५ टक्के वॅट टॅक्स रु.४,८३९/- असा एकुण रु.४३,५५४/-खर्च आलेला असून मंजूरीपेक्षा रु.१८,६५४/-जादा खर्च आलेला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-खरेदी अधिकारी)

**विषय नं.२६. सन २००५-०६ तांदूळ खरेदीबाबत.**

**निर्णय क्र. ५०२.** सन २००५-०६ साठी प्रसादालयामध्ये आवश्यक ५००० क्विंटल तांदूळ खरेदीकामी बासमती तांदुळ द्यावा असा निर्णय मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०५.२००५ सभेत घेण्यात येऊन त्यानुसार निविदा मागणी करणेत आलेल्या होत्या. आलेल्या निविदा दि.०९.०७.२००५ चे मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये उघडणेत येऊन संबंधितांशी त्याच सभेत चर्चा/वाटाघाटी करणेत येऊन सुधारीत दर मागणी करणेत आलेले होते. त्याचवेळी सदर खरेदीबाबत निर्णय घेणेचे अधिकार विश्वस्त मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग, मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्री. शैलेश श्रीहरी कुटे, व मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांना देण्यात आलेले होते. त्यानुसार मा.विश्वस्त डॉ.गोंदकर यांनी दि.१५.०७.२००५ रोजी समक्ष नमुने तपासून मे.गणेश एजन्सी, वैजापूर यांचा फुटबॉल अखंड रु.२१०५/- प्र.क्विंटल व मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांना कोहीनुर दुबार ट्राफी रु.२०९१/-प्र.क्विंटल खरेदीबाबत सुचविलेले होते. त्यानंतर दि.१७.०७.२००५ रोजी मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे, मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग व मा.श्री. कैलास गोविंद कोते यांनी पुन्हा सर्व नमुने पाहून खात्री करुन खालील नमुन्यांच्या प्रत्येकी एक ट्रक म्हणजे अंदाजे १५० क्विंटल तांदूळ प्रायोगिक स्वरुपात खरेदी करणेच्या सुचना दिलेल्या होत्या.

| अ.नं | पुरवठाधारकाचे नांव | तांदुळ प्रकार | दर प्र.क्विंटल रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | मे.धनेश ट्रेडींग कंपनी, अहमदनगर | सुपर कोहीनुर बासमती दुबार | २५८०.०० |
| ०२. | मे.धनराज छगनलाल ॲण्ड कं,वाशी | बासमती पिकरीक दुबार | २४५०.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३. | मे.कोचर ब्रदर्स, अमृतसर | बासमती डबल बुल नं.१ | २२५०.०० |
| ०४. | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स,ना.रोड | सुपर कोहीनुर बासमती मिनीदुबार | २०२५.०० |
| ०५. | मे.गणेश एजन्सी, वैजापूर | कोहीनुर फुटबॉल | २०९९.५० |
| ०६. | श्री सप्तश्रृंगी सप्लायर्स, नाशिक | फ्लाईग हॉर्स नं.३ अखंड | २२८५.०० |

त्यानुसार संबंधितांना पुरवठा आदेश देणेत येवून खरेदी करणेत आलेली आहे. तसेच आलेला सर्व तांदूळ प्रसादालयामध्ये शिजवून,खात्री करुन आवश्यक उर्वरीत ४००० क्विंटल तांदूळ खालील निविदासादरकर्त्यांकडून प्रत्येकी १००० क्विंटल खरेदी करणेबाबत मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर,मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, व मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे यांनी शिफारस केलेली आहे. त्याप्रमाणे त्यांना अलाहिदा पुरवठा आदेश देण्यात आलेला असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

| अ.नं | पुरवठाधारकाचे नांव | तांदुळ प्रकार | दर प्र.क्विंटल रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | मे.धनेश ट्रेडींग कंपनी, अहमदनगर | श्री हॉर्स लॉंग ग्रेन अखंड | २०५०.०० |
| ०२. | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स,ना.रोड | सुपर कोहीनुर बासमती मिनीदुबार | २०२५.०० |
| ०३. | मे.गणेश एजन्सी, वैजापूर | कोहीनुर फुटबॉल | २०९९.५० |
| ०४. | श्री सप्तश्रृंगी सप्लायर्स, नाशिक | फ्लाईग हॉर्स नं.३ अखंड | २११०.०० |

(कार्यवाही-खरेदी अधिकारी)

**विषय नं.२७. विविध विभागातील एअर कंडिशनर्स खरेदीबाबत.**

**निर्णय क्र. ५०३.** श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालय, साईनिवास अतिथीगृह, ध्वनीक्षेपण व लेखाशाखा तसेच मुंबई कार्यालयासाठी आवश्यक असणारे स्प्लिट व विंडो एअर कंडीशनर्स खरेदीबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशील | वॉल माऊंटेड स्प्लिट | | विंडो | रक्कम | निर्णय क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २ टनी | १.५ टनी | | | |
| ०१. | रुग्णालय | २४ | ०२ | ०२ | ९,६८,०००.०० | ७१/२१.१०.२००४ |
| ०२. | साईनिवास/ध्वनीक्षेपण,लेखाशाखा | ०३ | ०१ | -- | १,९०,०००.०० | २०६/३.५.२००५ |
| ०३. | मुंबई कार्यालय | ०४ | ०२ | -- | २,२०,०००.०० | १४६/१७.४.२००५ |
| | एकूण- | ३१ | ०५ | ०२ | | |

वरील मान्यतेंनुसार कोटेशन्स मागणी करण्यात येऊन, संबंधितांना दि.०९.०७.२००५ चे व्यवस्थास्थापन समितीचे सभेत चर्चा/वाटाघाटीसाठी आमंत्रित करणेत आलेले होते.

| अ.नं. | कोटेशन्सधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | सितल एअर-कंडीशनर्स, राहुरी |
| ०२ | धुत एअरकंडीशनींग कंपनी, औरंगाबाद |
| ०३ | धुत कम्फोर्ट सिस्टम्स, औरंगाबाद |
| ०४ | आर.टी.कराचीवाला, अहमदनगर |
| ०५ | गोदरेज अ‍ॅप्लायन्सेस, पुणे |
| ०६ | गोदरेज अ‍ॅप्लायन्सेस, मुंबई |
| ०७ | जी.एस.ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद |
| ०८ | मोनार्क मार्केटींग, औरंगाबाद |
| ०९ | कॅरीअर एअरकॉन लिमीटेड,पुणे |
| १० | काशिको ट्रेडींग प्रा.लिमीटेड, कोपरगांव |
| ११ | लकी रेफ्रिजरेशन, नाशिक |
| १२ | व्होल्टास लिमीटेड, पुणे |

उपरोक्तपैकी अ.क्र.१ ते ५ चे निविदासादरकर्ते सभेस उपस्थित होते. सदरील निविदासादरकर्त्यांनी दिलेल्या मुळ दरावर काही सुट देणेबाबत बंद पाकिटात लेखी देण्यास सांगणेत आलेले होते. निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेली सूट विचारात घेऊन पुढील निर्णय घेणेकामी मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग, मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे व मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे यांची समिती नेमणेत आलेली होती. त्यानुसार निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेले सुटचे बंद पाकिटे दि.१४.०७.२००५ रोजी मा.कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर, यांचे समोर उघडणेत येवून ए.सी. खरेदीकामी पुढील मेन्टेनन्सचे दृष्टीने इलेक्ट्रिसिटी कमी लागेल याबाबत विद्युत् विभाग प्रमुख यांचा अभिप्राय घ्यावा असा निर्णय झाला होता. त्यानुसार विद्युत् विभाग प्रमुखांनी व्होल्टास कंपनीचे ए.सी.चा परफॉर्मन्स इतरांपेक्षा चांगला आहे. या ए.सी.चा मेन्टेनन्स अत्यंत कमी असून, बिघाडाचे प्रमाण कमी आहे व सर्व्हिस चांगली आहे, असा अभिप्राय दिलेला आहे.

प्राप्त कोटेशनमध्ये व्होल्टास मेकसाठी खालीलप्रमाणे सुट वजा दर आलेले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नाव | तपशील | | |
|---|---|---|---|---|
| | | स्प्लिट १.५टन | स्प्लिट २.०टन | विंडो १.५टन |
| ०१ | आर.टी.कराचीवाला,अ.नगर इन्स्टॉलेशन | २३७५०/-<br>+ १,५००/-<br>२५,२५०/- | २९४५०/-<br>+ १,५००/-<br>३०,९५०/- | दर आलेले नाहीत. |
| ०२ | लकी रेफ्रिजरेशन, नाशिक | २५५००/-<br>(इन्स्टॉलेशन सह) | २९५००/-<br>(इन्स्टॉलेशन सह) | दर आलेले नाहीत. |
| ०३ | व्होल्टास,लि., पुणे | २६५००/-<br>(इन्स्टॉलेशन सह) | २९५००/-<br>(इन्स्टॉलेशन सह) | दर आलेले नाहीत. |

उपरोक्त दरानुसार स्प्लिट १.५ टन एसीसाठी मे.आर.टी.कराचीवाला, अहमदनगर यांचे रु.२५,२५०/-प्र.नग तर स्प्लिट २.० टन एसी साठी मे.लकी रेफ्रिजरेशन, नाशिक यांचे रु.२९,५००/-प्र.नग दर न्युनतम आहेत. तसेच विंडो १.५ टन एसी साठी व्होल्टास कंपनीचे दर आलेले नाहीत. दरम्यानचे काळात दोन साईभक्त श्री.गिरीष रनदिवे, बावा क्लिअरिंग हाऊस,मुंबई यांनी ०२ व श्री.अल्पेशभाई पटेल, सुरत यांनी ०३ असे एकूण ०५ ए.सी. देणगी देण्याची इच्छा प्रदर्शित केली आहे. तरी त्यांचेकडून ए.सी. आल्यास उर्वरित ए.सी. मे.लकी रेफ्रिजरेशन, नाशिक यांचेकडून त्यांचे न्युनतम दराने खरेदी करण्यात येतील. याबाबत मे.व्होल्टास लि.,पुणे यांचेशी संपर्क साधुन आणखी सुट मिळविण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

तरी व्होल्टास ए.सी. खरेदी करणेस व याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग/विद्युत विभाग प्रमुख)

**विषय नं.२८. कार्यालयीन स्टेशनरी छपाईबाबत निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.५०४.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.०७.२००५ चे निर्णयानुसार संस्थानचे विविध विभागासाठी आवश्यक असणारी जनरल व प्रि-प्रिंटेड स्टेशनरी छपाईकामी वर्तमानपत्रात जाहिरात देवून दोन लिफाफा पदधतीने निविदा मागविणेत आलेल्या आहेत. पैकी क्र.१ चे लिफाफयात मुळनिविदा व क्र.२ चे लिफाफयात बयाणा रकमेचा डीडी अथवा रोखीची पावती तसेच इतर कागदपत्राची मागणी केलेली आहे. त्यानुसार मुदतीअंती खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

**(अ) कार्यालयीन व जनरल स्टेशनरी**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | सावता प्रिंटर्स्, राहाता |
| ०२ | गोपाल प्रिंटींग प्रेस, श्रीरामपूर |
| ०३ | श्री साई समर्थ प्रिंटर्स, साकुरी ता.राहाता |
| ०४ | मयुर ऑफसेट, श्रीरामपूर |
| ०५ | भारत प्रिंटर्स, श्रीरामपूर |
| ०६ | उंडे ऑफसेट, बेलापूर ता.श्रीरामपूर |
| ०७ | अनमोल आर्टस, नाशिक |
| ०८ | विकास प्रिंटींग प्रेस, कोपरगांव |
| ०९ | स्वस्तिक ऑफसेट, अहमदनगर |
| १० | संदिप स्क्रिन्स, अहमदनगर |
| ११ | संजय ऑफसेट, संगमनेर |
| १२ | अविराज पॅकवेल, कोपरगांव |
| १३ | अष्टविनायक, पुणे |
| १४ | एस.व्ही प्रिंटर्स, मुंबई |
| १५ | एस.भागवत प्रिंटर्स, अहमदनगर |
| १६ | प्रिंटलाईन्स, नाशिक |
| १७ | कॅप्रिकॉन प्रिंटर्स, पुणे |

**(ब) संगणक प्रि-प्रिंटेड स्टेशनरी-**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | सखी इंडस्ट्रीज लिमीटेड, पुणे |
| ०२ | स्पॅन कॉम्प्युटर स्टेशनरी, अहमदनगर |
| ०३ | बालाजी ऑफसेट, अहमदनगर |
| ०४ | महाराष्ट्र स्टेशनर्स, मुंबई |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी आमंत्रित करण्यात आले होते.

सभेने उपस्थित सर्व निविदासादरकर्त्यांना सभेपुढे बोलावुन त्यांनी देऊ केलेल्या निविदेतील दरावर किती टक्के सुट देणार हे बंद पाकिटात द्यावेत असें सांगण्यात आले.

त्यानुसार निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेले सुधारित दर खालीलप्रमाणे-

**(अ) कार्यालयीन व जनरल स्टेशनरी**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | देऊ केलेली सुट |
|---|---|---|
| ०१ | सावता प्रिंटर्स, राहाता | २% |
| ०२ | गोपाल प्रिंटींग प्रेस, श्रीरामपूर | ५ % व आयटेमवाईज सूट |
| ०३ | श्री साई समर्थ प्रिंटर्स, साकुरी ता.राहाता | २% |
| ०४ | मयुर ऑफसेट, श्रीरामपूर | ५ % व आयटेमवाईज सूट |
| ०५ | भारत प्रिंटर्स, श्रीरामपूर | ३ % व आयटेमवाईज सूट |
| ०६ | उंडे ऑफसेट, बेलापूर ता.श्रीरामपूर | --- |
| ०७ | अनमोल आर्टस, नाशिक | ३% |
| ०८ | विकास प्रिंटींग प्रेस, कोपरगांव | ५% |
| ०९ | स्वस्तिक ऑफसेट, अहमदनगर | अनुपस्थित |
| १० | संदिप स्क्रिन्स, अहमदनगर | ४% |
| ११ | संजय ऑफसेट, संगमनेर | ५% |
| १२ | अविराज पॅकवेल, कोपरगांव | ५% |
| १३ | अष्टविनायक, पुणे | ७% |
| १४ | एस.व्ही प्रिंटर्स, मुंबई | ५% |
| १५ | एस.भागवत प्रिंटर्स, अहमदनगर | अनुपस्थित |
| १६ | प्रिंटलाईन्स, नाशिक | ५% |
| १७ | कॅप्रिकॉन प्रिंटर्स, पुणे | सुट नाही |

**(ब) संगणक प्रि-प्रिंटेड स्टेशनरी-**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | देऊ केलेली सुट |
|---|---|---|
| ०१ | सखी इंडस्ट्रीज लिमीटेड, पुणे | अनुपस्थित |
| ०२ | स्पॅन कॉम्प्युटर स्टेशनरी, अहमदनगर | ३% |
| ०३ | बालाजी ऑफसेट, अहमदनगर | अनुपस्थित |
| ०४ | महाराष्ट्र स्टेशनर्स, मुंबई | २% |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त निविदाधारकांनी देऊ केलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता तयार करुन, निम्नतम दराच्या निविदा स्वीकारुन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा असें ठरलें. याचवेळी मा.विश्वस्त श्री.शैलेश श्री.कुटे, यांनी श्री.विश्वजित भटनागर लॅविश प्रिंट,मुंबई यांची सभेस ओळख करुन दिली. श्री.भटनागर संगणक स्टेशनरी पुरवितात. त्यांचा कामाचा दर्जा चांगला आहे. संगणक प्रि-प्रिन्टेड स्टेशनरी पैकी देणगी पावत्या त्यांचेकडून प्रायोगिक तत्वावर न्यूनतम दराने छपाई करुन घ्याव्यात, असें ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग )

**विषय नं.२९. जिल्हा परिषद स्कुल बिल्डींग साईटवरील मेन एल.टी.लाईन व एच.टी.लाईन शिफ्ट करणेबाबत.**

**निर्णय क्र. ५०५.** मे.नितीन बी.औताडे , कॉन्ट्रॅक्टर यांनी पत्रान्वये संस्थानकडे कळविले होते की, जि.प.स्कुल बिल्डींग साईटवर स्कुल बिल्डींगचे काम सुरू केले आहे व या बिल्डिंगच्या कामामध्ये मेन एच.टी.लाईन व एल.टी.लाईनचा अडथळा येत आहे. ही मेन एच.टी.लाईन व एल.टी.लाईन त्वरीत शिफ्ट करून देण्याविषयी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला संस्थानमार्फत वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आले होते. तसेच मा.सहाय्यक अभियंता व मा.कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी , शिर्डी यांचेशी वारंवार समक्ष व दुरध्वनीवरून चर्चा करण्यात आली होती.

आता दिनांक १२-०८-२००५ रोजी मा.कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, शिरडी यांनी पत्र पाठविले असून यात त्यांनी खालीलप्रमाणे कळविले आहे.

(१) येणाऱ्या रू.९९,०००.०० इतक्या खर्चाच्या कामाच्या रकमेच्या १५ टक्के रक्कम ओआरसी (आऊट राईट कॉन्ट्रीब्युशन ) सुपरव्हिजन चार्जेसपोटी संस्थान महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे भरावयास तयार असल्याचे संस्थानचे संमतीपत्र .

(२) शिरडी नगरपंचायत यांचे या कामासाठी ना हरकत प्रमाणपत्र

उपरोक्त जि.प.स्कुल बिल्डींग साईटवरील एल.टी.लाईन व एच.टी.लाईन शिफ्ट करण्यासाठी मा.कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी , शिरडी यांनी दिलेल्या टेक्नीकल इस्टिमेट्नुसार रु,९९,०००.०० इतका अंदाजे शिफ्टींग खर्च व सुपरव्हिजन चार्जेसपोटी १५ टक्के रक्कम रु. १४,८५०.०० मिळून रू. १,१३,८५०.०० ( राऊंड अप रू. १,१४,०००.०० ) इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही - विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.३०. कनकुरी साठवण तलाव ते भक्तनिवासस्थान इमारतीपर्यन्तचे पाईपलाईन सुपरविझनचे कामास मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र. ५०६.** कनकुरी साठवण तलाव ते संस्थान परीसर व पुढे नविन भक्तनिवास (५०० रुम) पर्यंत एकूण ०५ किलो मीटर ३००mm व्यासाची पाईप लाईन टाकणे प्रस्तावित असून याकामी सदर पाईप लाईनचा सर्व्हे करण्याचे काम पूर्ण झाले आहे व निविदा फॉर्मही तयार आहे. यानंतर पुढील कामे-

१) वर्तमान पत्रात जाहिरात देणे. (जाहिरात खर्च संस्थानचा)
२) निविदा मागविणे.
३) आलेल्या निविदांची पडताळणी करणे.
४) पाईप लाईन टाकणेसाठी योग्य त्या एजन्सीजची निवड करणे.
५) नविन पाईप लाईनचे काम पूर्ण होई पर्यंत (साधारणत: १२० दिवस) दैनंदिन पर्यवेक्षण करणे.

इत्यादी कामे करणेसाठी मे सिंडीकेट सर्व्हीसेस नाशिक यांनी सदर कामासाठी सुपरव्हीजन चार्जेस म्हणून रुपये १,२०,०००/- व अधिक नियमाप्रमाणे होणारा सर्व्हीस टॅक्सची मागणी केलेली होती. त्यानुसार त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांना सादर केलेला होता. त्यानुसार त्यांनी दिनांक १३/०३/२००५ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत समक्ष उपस्थितीत राहून सदरच्या विषयाबाबत माहिती दिलेली होती. त्यानुसार यावर सविस्तर चर्चा होवून मा.व्यवस्थापन समितीने उपरोक्त कामासाठी आणखी व्यवसायिकांकडून दर मागविण्यात यावेत असे ठरले आहे. त्याप्रमाणे खालील ०८ एजन्सीज कडून आपण कोटेशन्स मागविली होती.

१) हिरे अतुल नारायण अॅन्ड असोसिएटस् नाशिक
२) वसंत शंकरराव राजभोज,नाशिक
३) मे.अजिक्यंतारा कन्सल्टन्सी नाशिक
४) मे.अविनाश एस.पाटील, धुळे
५) सर विश्वेश्वैरय्या कन्सोंशियम,नाशिक
६) मे.अभय खानदेशे, अहमदनगर
७) समर्थ इंजिनिअर्स, पुणे.
८) कार्यकारी अभियंता जीवन प्राधिकरण, संगमनेर

त्यापैकी खालील एजन्सीने आपली कोटेशन्स सादर केलेली आहेत.

१) मे.वसंत शंकरराव राजभोज,नाशिक.
२) मे.अजिक्यंतारा कन्सल्टन्सी नाशिक.
३) मे.अविनाश एस.पाटील, धुळे.
४) मे.अभय खानदेशे, अहमदनगर.
५) मे.कार्यकारी अभियंता जीवन प्राधिकरण, संगमनेर
६) मे.सिंडीकेट सर्व्हीसेस,नाशिक

उपरोक्त प्राप्त झालेले कोटेशन्स उघडणेत आले असता कोटेशन्सधारकांनी पुढीलप्रमाणे दर दिलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशन्सधारकाचे नांव | निविदेतील रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१. | वसंत शंकरराव राजभोज,नाशिक. | ०२,०२,०४२.०० |
| ०२. | मे.अजिक्यंतारा कन्सल्टन्सी नाशिक. | ४,०९,१३६.०० |
| ०३. | मे.अविनाश एस.पाटील, धुळे. | ०६,४१,२३४.०० |
| ०४. | मे.अभय खानदेशे, अहमदनगर. | ०६,६६,७४०.०० |
| ०५ | मे.कार्यकारी अभियंता जीवन प्राधिकरण, संगमनेर | ३५,३५,७४१.०० |
| ०६ | मे.सिंडीकेट सर्व्हीसेस,नाशिक | ०१,२०,०००.०० |

उपरोक्त दरांचा विचार करता मे.सिंडीकेट सर्व्हीसेस, नाशिक यांचे दर निम्नतम असल्याने त्यांचे दर स्विकारणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**विषय नं.३१. श्रीमती बबाबाई पांडुरंग पांगारकर व त्यांचे कुटुंबीय, पांगरी यांनी बक्षीसपत्र दिलेल्या जमिनीस चेनलिंक जाळीचे कंम्पाऊंड करणेबाबत.**

**निर्णय क्र. ५०७.** साईभक्त- श्रीमती बबाबाई पांडूरंग पांगारकर रा.पांगरी ता.सिन्नर जि.नाशिक यांनी शिर्डी नाशिक रोडवर पांगरी गावाजवळ एकूण २० गुंठे जमीन बक्षिस म्हणून दिलेली आहे. त्याचा बक्षिस पत्र स्विकारणेचा व बक्षिस पत्र तयार करुन देणेचा कार्यक्रम दिनांक १६/०८/२००५ रोजी रजिस्टर कचेरीत झाला आहे. बक्षिस पत्र तयार करुन कागद पत्र व जमिनीचा ताबा प्रत्यक्ष मोजुन ताबा घेतला आहे. जागेचा फ्रन्ट ८० फूट असून लांबी २७२ फूट इतकी आहे. दिनांक १८/०८/२००५ रोजी जमिन देणगी बक्षिस पत्राने दिले बाबत बोर्ड लावणेत आलेला आहे. तसेच सदर जमीनीचे संस्थानचे नांवे करणेसाठी गांव कामगार तलाठी कार्यालयाकडे वशी-२ कडून कार्यवाही चालू आहे.

सदर मिळकतीवर कुणी अतिक्रमण करु नये तसेच वहीवाट करुनये याकामी संस्थान मार्फत चेनलिंग जाळीचे कायमस्वरुपी कंपाऊंड करणे गरजेचे आहे. सदर जागेची लांबी २७२ फूट व रोड फ्रन्ट ८० फूटांचा आहे. त्यास एक गेट ठेवावे लागेल. तसेच रोडच्या कडेला मोठा खड्डा असल्याने सदर जागेत जाणेसाठी खड्डयात नळया

टाकून त्यावर पुलाचे काम करावे लागेल किंवा खड्डयात मुरुम टाकून रस्ता तयार करावा लागेल. कंपाऊंड तयार करणेसाठी अंदाजे खर्चाचे बजेट डी.एस.आर नुसार खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | नग | युनिट | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | खोदाई- १'x १'x २' | १३० नग | $M^3$ | ४३/ $M^3$ | ३०१.८६ |
| ०२ | काँक्रिट- १:३:० | १३० नग | ७.०२/ $M^3$ | १११६/ $M^3$ | ७८३४.३२ |
| ०३ | अँगल- ५०mmx५०mmx५mm | १६५० किलो | किलो | ३०/- | ४९,५००/- |
| ०४ | चेनलिंग जाळी- १.१/२"x१.१/२"x ४mm | २२० मिटर | रनिंग मिटर | ६८२/- | १,५०,०४०/- |
| ०५ | सपोर्ट गज- ४mm | ४० किलो | किलो | ३०/- | १,२००/- |
| ०६ | हुक | ७१० नग | नग | ०२/- | १,४२०/- |
| ०७ | कलर- सिल्व्हर | १० लिटर | लिटर | १९०/- | १,९००/- |
| | | | | एकुण रक्कम- | २१२१९६.१८ |
| | | | | फेब्रिकेशन मजुरी- ३०% एकुण रकमेवर- | ६३६५८.८५ |
| | | | | एकुण खर्च- | २७५८५५.०३ |
| | | | | पुर्णांकित- | २,७५,८५५/- |

सदरचे काम बांधकाम विभागामार्फत पुर्ण करता येईल. तसेच खड्डा बुजविणेकामी संस्थानचा जे.सी.बी मशिन व ट्रॅक्टरचा पाठवून खड्डा बुजविणेची व्यवस्था करता येईल. तरी सदर जागेत चेनलिंग जाळीचे कंपाऊंड करणेस व येणारे अंदाजे रूपये **२,७५,८५५/-** मात्रचे खर्चास मान्यता मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख/बांधकाम विभागप्रमुख/वाहन विभागप्रमुख)

**विषय नं.३२. श्रीसाईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका-२००६ छपाईकामाचे कोटेशन उघडून निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.५०८.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०८.२००५चे सभेतील निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका २००६ छपाई करणेस मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार खालील दर्शविल्याप्रमाणे श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका २००६ छपाई करून घेण्याचे ठरले आहे

| अ.नं. | तपशिल | छपाई संख्या |
|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा दैनंदिनी २००६ | ५०,००० नग |
| ०२ | श्री साईबाबा दिनदर्शिका २००६ ६ सीट तारखेसह व नावासह (प्रत्येक सीटवर दोन महिने) | ७५,००० नग |
| ०३ | श्री साईबाबा दिनदर्शिका २००६ सिंगल सीट | २०,००० नग |

वरील प्रमाणे श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका २००६ छपाई कामाचे कोटेशन मा.व्यवस्थापन मंडळाचे दि. २९-३१.३.२००४ चे सभेतील विषय नं.२६ निर्णय क्र.१३८ नुसार निवडक प्रेसधारकांना जा.नं. एसएसएस/वशी/प्रकाशने/८४५६/२००५.दि.११.०८.२००५अन्वये पाठविण्यात येवून, ते पूर्णपणे भरून दि.३०.०८.२००५ अखेर पाठविण्याची अंतिम मुदत खालील संबंधीत प्रेसधारकांना कळविण्यात आली आहे.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | मे.युनायटेड प्रिंटर्स,पुणे |
| ०२ | मे.अमल ऑफसेट प्रा.प्रा.लि.दादर, मुंबई |
| ०३ | मे.रविक आर्टस् अॅन्ड प्रिंटर्स प्रा.लि.वडाळा, मुंबई |
| ०४ | मे.ब्ल्यु बर्ड (इंडिया) प्रा.लि.पुणे. |
| ०५ | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर |
| ०६ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई |
| ०७ | मे.सुमंगल आरटेक, मुंबई |
| ०८ | मे मॅग्ना ग्रॉफिक्स (इंडिया) प्रा.लि.मुंबई. |
| ०९ | मे.बळवंत प्रिंटर्स, पुणे |
| १० | मे.प्रिंटोग्राफी फोर्ट, मुंबई |
| ११ | प्रिंटमन, मुंबई |
| १२ | मे.विकास इले.(सकाळ पेपर्स) सातपूर, नाशिक |
| १३ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे |
| १४ | मे.प्रिंट पॅक बिजनेस फॉमर्स प्रा.लि. लातुर |
| १५ | मे.माणिकचंद नंदादिप पेपर प्रॉ.प्रा.लि., पुणे |
| १६ | मे.मौज प्रिंटींग ब्युरो, मुंबई |
| १७ | मे.चिराग प्रिंटर्स, मुंबई |

| | |
|---|---|
| १८ | चेरी ऑफसेट प्रिंटींग अ‍ॅण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर |
| १९ | दि प्रिमियर को-ऑपरेटिव्ह प्रिंटर्स लि.चे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे (मा.उपाध्यक्ष यांनी सुचित केले नुसार) |
| २० | निर्मल ऑफसेट प्रा.लि.नाशिक रोड. (मा.उपाध्यक्ष यांनी सुचित केले नुसार) |

वरील एकूण २० प्रेसधारकांपैकी दि.३०.०८.२००५ अखेर मुदतीत दाखल झालेली कोटेशन्स मा.व्यवस्थापन समितीचे आजचे सभेत उघडणेत येऊन कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव | श्रीसाईबाबा दैनंदिनी-२००६ मागणी- ५०,०००० | | श्रीसाईबाबा दिनदर्शिका-२००६ (६शिटर्स) मागणी- ७५,०००० | | श्रीसाईबाबा दिनदर्शिका-२००६ सिगल शिट मागणी- २०,०००० | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कोटशनमधील दर रुपये | वाटाघाटीनंतरचे दर रुपये | कोटशनमधील दर रुपये | वाटाघाटीनंतरचे दर रुपये | कोटशनमधील दर रुपये | वाटाघाटीनंतरचे दररु पये |
| ०१. | मे.युनायटेड प्रिंटर्स,पुणे | ६०.६४ | ५८.०० | ११.१८ | १०.५० | ३.५९ | ३.०० |
| ०२. | मे.ब्ल्यु बर्ड (इंडिया) प्रा.लि.पुणे. | ६३.०० | ४१.०० | १५.०० | ९.०० | ८.५० | ५.५० |
| ०३. | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर | ४३.५६ | ४२.०० | १२.८८ | १२.८८ | --- | --- |
| ०४. | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई | ६१.७५ | अनुपस्थित | --- | अनुपस्थित | --- | अनुपस्थित |
| ०५. | मे.बळवंत प्रिंटर्स, पुणे | ४३.८० | ४६.४० | १०.८० | १०.४० | ३.४० | ३.२० |
| ०६. | मे.माणिकचंद नंदादिप पेपर प्रॉ.प्रा.लि., पुणे | ४५.८६ | ४२.५० | ११.०० | --- | ३.८५ | ३.२५ |
| ०७. | मे.महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे | ५९.६० | ४१.०० | १२.८५ | --- | ३.७५ | ३.०० |
| ०८. | निर्मल ऑफसेट प्रा.लि.नाशिक रोड. | ६८.२० | ६८.२० | ७.१५ | ७.१५ | १७.६० | १७.६० |
| ०९. | चेरी ऑफसेट प्रिंटींग अ‍ॅण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर | ४५.२७ | ४४.५० | ११.७५ | ११.५० | ३.५६ | ३.४० |
| १०. | मे मॅग्ना ग्रॉफिक्स (इंडिया) प्रा.लि.मुंबई. | ४७.५० | ४१.०० | ९.०० | ८.५० | ३.५१ | ३.०० |

सभेत कोटेशनसादरकर्त्यांनी तयार केलेल्या दैनंदिनी व दिनदर्शिकांचे नमुन्यांची मा.सदस्यांनी समक्ष पहाणी करुन, श्रीसाईबाबा दैनंदिनी-२००६ व श्रीसाईबाबा दिनदर्शिका-२००६ (सिंगल शिट) करिता मे.महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय,पुणे व मे.मेग्ना ग्राफीक्स इं.लि.,मुंबई यांचे दर मान्य करण्यात येऊन, मे.मेग्ना ग्राफीक्स इं.लि.,मुंबई यांना एकूण पुरवठ्याच्या ६० % व मे.महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांना४०% पुरवठा आदेश देण्यात यावा. तत्पुर्वी व्यवस्थापन समितीने ठरविलेल्या ६०% व ४०% या प्रमाणात छपाई करुन देणेबाबत त्यांची लेखी संमती घेऊन नंतरच छपाई आदेश देण्यात यावेत.

तसेच श्रीसाईबाबा दिनदर्शिका-२००६ (६ शिटर्स) करिता मे.मेग्ना ग्राफीक्स इं.लि.,मुंबई यांचे दर मान्य करण्यात येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रकाशने विभाग प्रमुख)

**विषय नं.३३. श्रीसाईसच्चरित सार (हिन्दी दोहावली) पुस्तक छपाईकामाचे कोटेशन उघडून निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र. ५०९.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.०७.२००५चे सभेतील निर्णयानुसार श्री शिवनारायण टुवानी, इन्दौर लिखीत "श्री साई सच्चरित्र सार (हिन्दी दोहावली)"पुस्तक प्रकाशित करणेस मान्यता देणेत आली आहे. प्रकाशने विभागाकडील दि.०४.०८.२००५ चे मान्यताप्राप्त प्रस्तावानुसार "श्री साई सच्चरित्र सार (हिन्दी दोहावली)" पुस्तकाचे प्रथम प्रकाशन असल्याने ५,००० प्रतींची छपाई ही श्री शिवनारायण टुवानी, इन्दौर यांचे मार्गदर्शनाखाली इन्दौर येथील नामांकित प्रेसधारकांकडून करून घेण्यात यावी,असे ठरले आहे. याबाबत उपरोक्त पुस्तकाची संपूर्ण छपाई करून घेण्याची सर्वस्वी जबाबदारी स्वीकारण्याची श्री शिवनारायण टुवानी, यांनी तयारी दर्शविली आहे. त्यासाठी श्री.शिवनारायण टुवानी, यांनी साईसच्चरित्र सार (हिन्दी दोहावली) पुस्तक छपाईकामी इन्दौर येथील खालील नामांकित प्रेसधारकांची संपूर्ण पत्त्यासह नावे फॅक्स पत्राद्वारे कळविली आहेत. त्यानुसार खालील संबंधीत प्रेसधारकांना उपरोक्त पुस्तकाचे छपाई कामाचे कोटेशन जा. नं. एसएसएस /वशी/प्रकाशने/८४११/२००५.दि.०९.०८.२००५ अन्वये पाठविण्यात येवून ते दि.२५.०८.२००५ अखेर जमा करणेविषयी कळविण्यात आले होते. त्यानुसार खालीलप्रमाणे कोटेशन्स प्राप्त झालेले आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | श्रीरंग ऑफसेट, इन्दौर. |
| ०२ | पीयुष ऑफसेट प्रिंटर्स, इन्दौर. |
| ०३ | वर्धमान कम्प्युटर्स, इन्दौर. |
| ०४ | रविजित प्रिंटर्स, इन्दौर. |
| ०५ | वर्धमान प्रिंटर्स, इन्दौर. |
| ०६ | श्री. ऑफसेट प्रिंटर्स, भोपाल. |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले. त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन निविदासादरकर्त्यांना व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही-प्रकाशने विभाग प्रमुख)

**विषय नं.३४. दिनदर्शिकेवर श्रीसाईबाबांचे छायाचित्र छपाई करणेस परवानगी देणेबाबत.**

**निर्णय क्र. ५१०.** श्री.के.डी.घोलप,राष्ट्रीय केमिकल्स एण्ड फर्टिलाइजर्स लि.,अहमदनगर यांचे दि.०९.०८.२००५ रोजीचे पत्राअन्वये त्यांचे कंपनीद्वारा खतांची निर्मिती करून त्याचे भारतातील शेतक-यांना वितरण करीत असल्याचे कळवून प्रती वर्षी त्यांचे कंपनीद्वारा शेतक-यांना दिनदर्शिकेचे वाटप करण्यात येते.

राष्ट्रीय केमिकल्स एण्ड फर्टिलाइजर्स लि.,अहमदनगर या कंपनीद्वारा निर्मित दिनदर्शिका २००४ वर पंढरपूरचे विठोबाचे छायाचित्र आणि २००५ चे दिनदर्शिकेवर तुळजापुरची कुलस्वामीनी तुळजाभवानी यांचे छायाचित्रांची छपाई करण्यात आली होती.

प्रतीवर्षाप्रमाणे राष्ट्रीय केमिकल्स एण्ड फर्टिलाइजर्स लि.,अहमदनगर यांनी सन २००६ चे दिनदर्शिकेवर श्री साईबाबांचे छायाचित्राची छपाई करून सदरची दिनदर्शिका शेतक-यांना वाटप करण्याची इच्छा दर्शविली आहे.त्यासाठी त्यांनी उपरोक्त संदर्भिय पत्राअन्वये दिनदर्शिका २००६ वर श्री साईबाबांचे छायाचित्र छपाई करणेस परवानगी मागितली आहे. त्यांचे द्वारा निर्मित दिनदर्शिकेचे शेतकऱ्यांना मोफत वाटप करण्यात येते असे कळविले आहे.

तरी श्री साईबाबांचा कार्याचा प्रचार व प्रसार व्हावा या तत्वावर राष्ट्रीय केमिकल्स एण्ड फर्टिलाइजर्स लि.,अहमदनगर यांना दिनदर्शिका २००६ वर श्री साईबाबांचे छायाचित्र छपाई करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-प्रकाशने विभाग प्रमुख)

**विषय नं.३५. तेलगू व गुजराथी भाषेतून साईलिला प्रकाशित करणेबाबत.**

**निर्णय क्र. ५११.** अ) श्री.कृष्णकुमार ॲडव्होकेट,सिकंदराबाद यांनी दि.१८.०४.२००५ चे पत्राने श्री साईलीला द्वीमासिक तेलगू भाषेत संस्थानने प्रसिध्द करणेसंबंधी प्रस्ताव दिलेला आहे.

श्री साईबाबांचे भक्त आंध्रप्रदेशात मोठया संख्येने आहेत. त्यांच्यासाठी तेलगू भाषेतून श्री साईलीला द्वीमासिकाचे संस्थानने प्रकाशन करावे. यासाठी मासिकाचे संपादन, छपाई, प्रुफ रिडींग,सभासद नोंदणी, अंकाचे वितरण अशा कामासाठी मार्गदर्शन व मदत करणेस ते तयार असल्याचे त्यांनी नमुद केले आहे.

ब) श्री.जयसिंह ब.निबांळकर बडोदे हे जुने साईभक्त असून त्यांनीही गुजराथी भाषिक भक्तांकरीता श्री साईलीला द्वीमासिकाची गुजराथी आवृत्ती संस्थानने प्रसिध्द करावी अशी सुचना केली आहे. अंकाचे संपादन, छपाई,सभासद नोंदणी, वितरण यासंबंधी मार्गदर्शन व मदत करणेस ते तयार असल्याचे त्यांनी तोंडी सांगितले आहे. सध्या श्री साईलीला द्वीमासिकाच्या मराठी व हिंदी-इंग्रजी आवृत्ती प्रसिध्द होतात. त्यांचे वर्गणीदार अंदाजे ६ हजार व ८ हजार असें आहेत.

श्री साईलीला द्वीमासिक हे इतर भाषेतूनही प्रसिध्द होणे आवश्यक आहे. त्यांत उपरोक्त "अ" व "ब" प्रस्तावाचा विचार व्हावा असे वाटते .

तेलगू व गुजराथी भाषेत श्री साईलीला द्वीमासिक प्रसिध्द करणे असलेस खालील प्रमाणे कर्मचारी वर्ग अपेक्षित आहे.

| | | मानधन/वेतन |
|---|---|---|
| संपादक - | तेलगू - | १ मानधन दर महा रूपये ७०००X१२ एकूण रूपये ८४,०००/- |
| | गुजराथी - | १ मानधन दर महा रूपये ७०००X१२ एकूण रूपये ८४,०००/- |
| उपसंपादक - | तेलगू - | १ वेतन- प्रती महा रूपये ५५००-१७५-९०००/- |
| | गुजराथी - | १ वेतन- प्रती महा रूपये ५५००-१७५-९०००/- |
| कॉम्प्युटर ऑपरेटर- | तेलगू - | १ वेतन- प्रती महा रूपये ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| | गुजराथी - | १ वेतन- प्रती महा रूपये ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| कार्यालयीन - | शिपाई - | १ वेतन-प्रती महा रूपये २६१०-६०-२९१०-६५-३३००-७०-४०००/- |

तरी श्री.कृष्णकुमार ॲडव्होकेट,सिकंदराबाद व श्री.जयसिंह ब.निबांळकर बडोदे यांचे मदतीने हे काम सुरू करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-प्रकाशने विभाग प्रमुख)

**विषय नं.३६. श्रीसाईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार V.C.D.तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र. ५१२.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७.०४.२००५ चे सभेतील विषय नं.१३ व निर्णय क्रमांक १५४ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार व्ही.सी.डी.१०,००० संच (दोन सीडीचा १ संच) तयार करुन साईभक्तांसाठी विक्रीस उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार व्ही.सी.डी.चे प्रथम प्रकाशन असल्याने मुंबई येथील नामांकित सी.डी निर्माते मे.सॅन व्हॅन एंटरप्राईझेस, मुंबई या निम्नतम दराचे सी.डी. निर्मात्याकडून १०,००० संच प्रती संच दर रुपये २३.८७ पैसे प्रमाणे तयार करणे कामाचा पुरवठा आदेश देवून काम पूर्ण करुन घेण्यात आले आहे. सदर

व्ही.सी.डी.स भक्तांचा चांगलाच प्रतीसाद मिळत असून सरासरी ४,००० संच प्रती महिना विक्री होत असल्याचे दिसून येत आहे.

सध्या मध्यवर्ती भांडार विभागात व्ही.सी.डी.चा स्टॉक पूर्णपणे संपला असून,प्रकाशने विभागाकडील सबस्टोअरमध्ये फक्त ६,००० संच एवढाच साठा उपलब्ध आहे.सदरचा साठा फक्त दिड महिना (४५ दिवस) पुरेल इतकाच शिल्लक आहे.विक्रीचा मासिक खप हिशोबात घेता प्रती महिन्यास ४,००० संच X १२ महिने करीता ४८,००० संच पुर्णांकित ५०,००० संच पुढील काळासाठी तयार करुन घेणे गरजेचे आहे.त्यासाठी ५०,००० संच तयार करणेकामी प्रती संचास अंदाजे दर रुपये २५.०० प्रमाणे येणारा एकूण रुपये १२,५०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार व्ही.सी.डी. ५०,००० संच तयार करुन घेणेसाठी मुंबई येथील नामांकित सी.डी निर्मात्यांकडून कोटेशन बोलावून तत्संबंधीत कार्यवाही करुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रुपये १२,५०,०००/-(रुपये बारा लाख पन्नास हजार) मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता आली.

(कार्यवाही -प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.३७. श्रीसाईबाबांचे टपाल तिकीट काढणेबाबत.**

**निर्णय क्र. ५१३.** सदरहू विषय स्थगीत ठेवण्यात यावा असें ठरले.

**विषय नं.३८. संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या परताव्याचे निर्णयात बदल करणेबाबत.**

**निर्णय क्र. ५१४.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत येऊन दरम्यान याबाबत विश्वस्त मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा व मा.श्रीमती रिम्पल लोहिया यांचे मार्गदर्शनानुसार प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे पुनश्च सादर करावा असें ठरलें. (कार्यवाही-प्रशासन शाखा-वशी-०६)

**विषय नं.३९. मौजे पांगरी बु ता. सिन्नर येथील जमीन सर्व्हे नं.५१९/अ १ पैकी हेक्टर ००-२० आर जमीन बक्षिस पत्राने मिळालेबाबत.**

**निर्णय क्र. ५१५.** श्रीमती बबाबाई पांडुरंग पांगारकर, रा पांगरी बुद्रुक ता सिन्नर जिल्हा नाशिक यांनी त्यांची जमीन गट नं ५१९/अ/१ या पैकी क्षेत्र ०-२० आर जमीन बक्षिस पत्राने देणेबाबत दिनांक २६/०२/२००५रोजी अर्ज केलेला होता. याबाबतचा विषय दिनांक १३/०३/२००५ रोजीच्या सभेत निर्णय १२० खालील प्रमाणे झालेला आहे

" श्रीमती बबाबाई पांडुरंग पांगारकर यांचे मालकीचे सर्व्हे नं ५१९ अ -१ मौजे पांगरी ता. सिन्नर येथील हेक्टर ०-२० आर क्षेत्र त्यामध्ये असलेल्या आब्यांच्या २० नग झाडासह देणगी स्विकारण्यास व देणगी दस्तऐवजाचा येणा-या खर्चास मान्यता देणबाबतचा प्रस्ताव मा कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. त्यास मान्यता देण्यात आली.

श्रीमती बबाबाई पांडुरंग पांगारकर यांनी मध्यतंरी वाटपाने श्री.सोपान पांडुरंग पांगारकर यांचे नांवे गट नं ५१९/अ/१ करून दिला असल्याचे फेरफारवर ७/१२च्या उता-यावरून दिसून आले मात्र श्री सोपान पांडूरंग पागांरकर यांनी त्यांच्या नावांवर वाटपाने आलेली प्रस्तुतची जमीन गट नं ५१९/अ/१ पैकी हेक्टर ०.२० आर जमिन संस्थानला बक्षिस पत्राने दयावयाची अशी इच्छा व्यक्त केली व त्याप्रमाणे अर्ज देखील दिला त्यानंतर त्यांचे अर्जाप्रमाणे श्री सोपान पांडुरंग पांगारकर यांनी दुय्यम निबंधक, सिन्नर यांचेसमोर दिनांक १६/०८/२००५ रोजी मौजे पांगरी बुद्रुक येथील गट नं ५१९/अ/१ पै.क्षेत्र हेक्टर ०.२० आर जमीनीचे बक्षिस पत्र सौ. बबाबाई पांडुरंग पांगारकर व पांडुरंग बाबुराव पागांरकर यांचे संमतीने रजिस्टर नं ३६१३/२००५ करून दिलेले आहे दस्तनोंदणीसाठी स्टॅम्पडयुटी, रजिस्ट्रेशन चार्जेस असा आवश्यक तो खर्च संस्थानने केला आहे. त्याच दिवशी जागेचा ताबा घेण्यात आलेला आहे, त्यांची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही- विधी अधिकारी)

**विषय नं.४०. पुरग्रस्तांना शिधा वाटप करणेबाबत.**

**निर्णय क्र. ५१६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.४१. देण्यात आलेल्या शिधा सामुग्रीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र. ५१७.** खालील संस्थांनी संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केले होते. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.भ.दा डांगे, सरपंच, दहेगांव को-हाळे, ता.राहाता, जि.अहमदनगर | अखंड हरिनाम सप्ताह -दि.२४/८ ते ३१/८/०५ | रवा, साखर, तुप, तांदुळ, डाळ, गोडतेल डबा इ. रु.२५,०००/- पर्यंत |
| ०२. | श्री तुरकणे, अध्यक्ष, हरिनाम सप्ताह कमिटी व समस्त गांवकरी मंडळ, पिंपळवाडी, | अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा दि.२०/८/०५ ते २७/८/०५ अखेर | साखर, ह.डाळ, तूप, तांदुळ, तुरडाळ, मठ, गोडतेल इ. रु. २५,०००/- पर्यंत |
| ०३. | श्री अर्जुनराव विष्णु पा. चोधरी, मु.पो.नांदुर्खी बु. व सप्ताह कमिटी नांदुर्खी बु. यांचे २ पत्र | श्री गोपालकृष्ण जन्मउत्सव सप्ताह दि.२०/८ ते २७/८/०५ | साखर, तूप, तांदुळ, तूरडाळ, पत्रावळी इ. रु.२५,०००/- पर्यंत |

| | | | |
|---|---|---|---|
| | पैकी १ अध्यक्ष व २ मा.राधाकृष्ण विखे पाटील यांचे नांवे आहेत. | अखेर | |
| ०४. | श्री बाळासाहेब सुकदेव पा. लबडे., अध्यक्ष, श्री महादेव मंदिर देवस्थान ट्रस्ट, गोंधवणी , ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर | अखंड हरिनाम सप्ताह व श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा दि.२४/८ ते ३१/८/२००५ अखेर | शिधा मिळणेबाबत रु.२५,०००/-पर्यंत |
| ०५. | श्री.उध्दवराव आप्पाजी तुपे, अध्यक्ष, श्री संत सेना महाराज मंडळ, राहाता | श्री संत सेना पुण्यतिथी निमित्त दि.३१/८/२००५ रोजी महाप्रसाद कार्यक्रम | साखर, रवा, तांदुळ, तुप, मुगडाळ, गोडतेल, पत्रावळी इ..रु.६,७१७/- |

प्रस्तावित प्रकरणे ही " ग्रॅट इन एड " स्वरुपाची आहेत. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे **कलम २१(२)(एक)(अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये शैक्षणिक/धार्मिक/सामाजिक संस्थेस छाननी समितीच्या शिफारसीनुसार राज्य शासनाच्या मान्यतेने अनुदान देण्याची तरतुद आहे.**

**तथापि दि.१३/०३/२००५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.३७, निर्णय क्र.१२९ अन्वये यापुर्वी देण्यात आलेल्या अनुदानास शासनाची मान्यता घ्यावी, ही मान्यता मिळालेनंतरच यापुढे अनुदान मागणीकामी आलेले अर्ज मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी सादर करणेत यावे असे ठरले.**

**तसे प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी पाठविणेत आले असून त्यांना अद्याप मान्यता आली नाही. तसेच शासन जा.क्र.CHC1005/C.R.NO.(151)D.XVII, दिनांक १३/०५/२००५ अन्वये कार्योत्तर मान्यतेची प्रकरणे यापूढे शासनाकडे मंजूरीसाठी पाठवू नये असे कळविलेले आहे.**
**त्याचप्रमाणे शिधा स्वरुपातील मदत देणेबाबतची नियमावली संस्थानने तयार केलेली असून मा.प्रधान सचिव, न्याय व विधी विभाग, मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी पाठविणेत येणार आहे. त्यावर निर्णय होणे बाकी आहे.**

**कार्यक्रम काळात व्यवस्थापन समितीची सभा नसल्याने मा.अध्यक्ष महोदय यांचे संमतीने शिधा देणेत आला असून, त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.** **(कार्यवाही- प्रशासन शाखा-०५)**

**विषय नं.४२. सीसीटीव्ही सिक्यूरिटी सिस्टमचे निविदांबाबत.**

**निर्णय क्र. ५१८.** समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी व गुरुस्थान या मंदिरातील सुरक्षिततेच्या दृष्टीने अद्यावत सी.सी.टी.व्ही सिक्युरिटी सिस्टम खरेदी करणेबाबत अंदाजे रक्कम रुपये ११ लाख चे खर्चास व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६.०८.२००५ चे सभेत मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. जाहिरातीनुसार मुंबई व शिर्डी कार्यालयातून एकूण २२ निविदांची विक्री होऊन मुदतीअंती खालीलप्रमाणे चार निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.डि.राम एंटरप्रायजेस, मुंबई |
| ०२ | मे.पॅसिफिक एक्सपोर्ट, मुंबई |
| ०३ | मे.ग्रुप सिक्युरिटीज सिस्टिम्स प्रा.लि.मुंबई |
| ०४. | मे.थर्ड आय सिक्युरिटी सिस्टीम ( अल्फा इंटर ) मुंबई |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो निर्णयासाठी व्यवस्थापन समितीचे पुढील सभेत सादर करण्यात यावा व निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीने निर्णय घ्यावा, असे ठरले.

(कार्यवाही- ध्वनीक्षेपन विभागप्रमुख)

**विषय नं.४३. साईच्छा केबल नेटवर्क,शिर्डी मार्फत लाईव्ह प्रक्षेपण गावकऱ्यांना दाखविणेबाबत.**

**निर्णय क्र. ५१९.** सदरहू विषय नामंजूर करण्यात आला.

**विषय नं.४४. भ्रमणध्वनीव्दारे (मोबाईल) साईभक्तांना माहिती व सुविधा पुरविणेबाबत.**

**निर्णय क्र. ५२०.** ई-टेम्पल प्रकल्पांतर्गत भक्तांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा-सुविधांतर्गत संस्थानची इंग्रजी भाषेतील पहिली वेबसाईट नोव्हेंबर, १९९९ मध्ये विकसीत करण्यात आली. तद्नंतर ऑक्टोबर, २००३ मध्ये या वेबसाईटचे नुतनिकरण करुन Boardband Website तयार करुन प्रक्षेपीत करण्यात आलेली आहे. या वेबसाईटवर भक्तांना संस्थानविषयीची संपूर्ण व परिपूर्ण माहिती देण्यात आलेली आहे. नुतणीकरण करण्यात आलेली ही वेबसाईट विविध दृकश्राव्य (Audio Visual) माहिती व Online Services साठी युक्त अशी बनविण्यात आलेली आहे. या वेबसाईटवर जगभरातील साईभक्तांना- श्री साईबाबा, शिरडी तिर्थक्षेत्र, व्यवस्थापन समिती व प्रशासन, संस्थानची विविध प्रकाशने, आवश्यक माहितीसह श्री साईबाबांच्या शिकवणूकीतील विविध घटना चित्ररुपाने तसेच श्री साईबाबांची व मंदिर परिसरातील विविध छायाचित्रे पाहण्यासाठी-तथा-Download करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

सध्या या इंग्रजी आवृत्तीमध्ये सुमारे ४०० पृष्ठांची माहिती व १०० छायाचित्रे उपलब्ध आहेत. या कालखंडात लाखो साईभक्तांनी ही वेबसाईट पाहून आपली पसंती दर्शविली आहे. त्याचबरोबर या वेबसाईटच्या मराठी आवृत्तीची मागणी साईभक्तांकडून येवू लागली, त्यानुसार भक्तांच्या मागणीचा विचार करुन संस्थानने

विभागांतर्गतच वेबसाईटच्या मराठी आवृत्तीची निर्मिती करुन, तिचे दिनांक १८ एप्रिल, २००५ रोजी रामनवमीच्या शुभमुहुर्तावर मा. उपाध्यक्षसो. यांचे हस्ते उद्घाटन करण्यात आले. या मराठी आवृत्तीमध्ये सध्या सुमारे २५० पृष्ठे व २०० छायाचित्रे यांसह मंदिरात गायल्या जाणाऱ्या सर्व आरत्या, श्री साईबाबांची अकरा वचने, गुरुपाठ व साईनाम जप आदि ध्वनीमुद्रणे श्री साईभक्तांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

तसेच जिज्ञासु व अभ्यासु अशा मराठी भाषिक साईभक्तांची ज्ञान-तृष्णा तृप्त व्हावी अशा गुणवत्तेची उद्बोधक आणि परिपूर्ण अशी विपुल माहिती व अनेक छायाचित्रे या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. तसेच शिर्डीत येणाऱ्या साईभक्तांना शिर्डीत येण्याऱ्या बसेसचे वेळापत्रक, रेल्वे गाड्यांचे वेळापत्रक येण्याचे मार्ग याबाबत मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. या सर्व सुविधा फक्त संगणकावरच उपलब्ध होत असल्याने, ज्या साईभक्तांना संगणकाचे ज्ञान आहे, अथवा संगणक क्षेत्रात कार्यरत आहे, अशा व्यक्तिंनाच या सुविधेचा शक्यतो लाभ घेता येतो.

सध्याच्या काळात संपर्कासाठी भ्रमणदूरध्वनींचा वापर सर्व स्थरामधील जनतेत मोठ्या प्रमाणावर होत आहे. श्री साईंच्या दर्शनास येणारे बहुसंख्य साईभक्त सुशिक्षित असल्याने ते संपर्कासाठी भ्रमणदूरध्वनींचा वापर करतात. शिर्डीत येणाऱ्या साई भक्तांना योग्य मार्गदर्शन होण्यासाठी व त्यांना आवश्यक ती मदत त्वरीत मिळणेसाठी त्यांच्या भ्रमणदूरध्वनींवर मंदिरातील सर्व आरत्या, त्यांचे वेळापत्रक, भक्तांना दिल्या जाणाऱ्या सुचना, आवश्यक सेवा-सुविधा आदि. तसेच या व्यतिरिक्त आणखी काही मदत हवी असल्यास, मदत दुरभाष क्रमांक (हेल्पलाईन नंबर) त्यांना संदेशाव्दारे कळविण्यात येईल. याव्यतिरिक्त त्यांच्या भ्रमणदूरध्वनीवर श्री साईबाबांचे विविध प्रकारचे छायाचित्रे, रिंगटोन, छोट्या स्वरुपातील व्हिडीओ क्लिप्स, इ. सुविधा उपलब्ध करुन देता येतील. या अनुषंगाने खालील कंपन्यांनी प्राथमिक प्रस्ताव सादर केलेले आहे.

01) Blow U' r mind production 02) Airtel 03) mauj.com

उपरोक्त कंपन्यांनी सादर केलेल्या प्राथमिक प्रस्तावांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**अ) <u>SMS</u>-** श्री साईभक्तांचे शिर्डीत आगमन होताक्षणीच त्यांचे भ्रमणदूरध्वनीवर "Wel-Come to Holly Place Of SHIRDI" अशी संक्षिप्त स्वरुपाचा संदेश देवून, संस्थानच्या उपलब्ध असणाऱ्या सेवा सुविधा अथवा Services ची यादी सदर भक्तांस प्राप्त उपलब्ध करुन देता येईल. गरजेप्रमाणे भक्तांना त्यामधून आवश्यक ती माहिती घेता येईल. उदा. एखाद्या भक्तास देणगी विषयाची माहिती हवी असल्यास, सदर व्यक्तीने त्याच्या भ्रमणदूरध्वनीवर Donation शब्द टाईप केल्यास, संस्थानकडील देणगी विषयीची सर्व माहिती त्यास संदेशाव्दारे प्राप्त होऊ शकेल.

यांव्यतिरिक्त सदर योजनेव्दारे भक्तांच्या सोयीसाठी भ्रमणदूरध्वनीवर खालील माहिती उपलब्ध करुन देता येईल- ०१. देणगीविषयी माहिती ०२. खोली आरक्षण ०३. रेल्वे / बस वेळापत्रक ०४. मंदिरातील दैनंदिन कार्यक्रम ०५. शिर्डी परिसरातील बाबांशी सलग्न असलेल्या इतर मंदिरांची अथवा समाधींची माहिती ०६. प्रसादालय व कॅन्टीन सुविधा ०७. साईभक्तांना सुचना ०८. संस्थानने प्रकाशीत केलेल्या पुस्तके व सीडींची माहिती ०९. तातडीची सेवा- रुग्णालय सेवा आदि. सेवा व सुविधा सदर योजनेव्दारे साईभक्तांचे भ्रमणदूरध्वनींवर उपलब्ध करुन देता येतील.

**ब) <u>Facilitation</u>-** सदरच्या प्रकारामध्ये भक्तांना त्यांचे आवडीनुसार स्वतःच्या भ्रमणदूरध्वनींवर उपलब्ध करुन घेता येणाऱ्या सुविधांचा (Facilitation) तपशील पुढीलप्रमाणे-

01. **Wall papers(photo)-** भक्तांना त्यांचे आवडीनुसार श्री साईबाबांचे विविध फोटो त्यांचे भ्रमणदूरध्वनींवर अपलोड करुन घेता येईल.

02. **Audio Clips-** यामध्ये श्री बाबांच्या आरत्या, गुरुपाठाचे अभंग, भजन तसेच अकरा वचने आदि. सुविधा साईभक्तांना त्यांचे भ्रमणदूरध्वनींवर ऐकता येईल.

03. **Video clips** - यात श्री बाबांच्या आरत्या, भजन तसेच मंदिर परिसरातील साजरे होणारे विविध कार्यक्रमांच्या छोट-छोट्या क्लिप्स भ्रमणदूरध्वनींवर ऑनलाईन बघता येतील.

04. **Ring Tone** - साईबाबांच्या संबंधीत असलेल्या घोषवाक्यांची, भजनातील विविध पदांच्या (ओव्या) आदि. रिंग टोन साईभक्तांना भ्रमणदूरध्वनींवर उपलब्ध करुन घेता येईल.

उपरोक्त प्रमाणे शिर्डीत येणाऱ्या साई भक्तांना योग्य मार्गदर्शन होण्यासाठी व त्यांना आवश्यक ती माहिती त्वरीत मिळणेसाठी त्यांच्या भ्रमणदूरध्वनींवर सेवा व सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावे, असे नम्र मत आहे.

**क)** वरीलप्रमाणे सेवा व सुविधा पुरविणाऱ्या उपरोक्त कंपन्यांनी दिलेल्या प्रस्तावाप्रमाणे प्रथमतः संस्थानकडे काही एक रकमी रक्कम जमा करुन, सदर योजनेतून नंतर जमा होणाऱ्या उत्पन्नापैकी ५०% रक्कम संस्थानला आदा करण्याची सहमती दर्शविलेली आहे. परंतु, भक्तांच्या हितांचा विचार करता, या सेवा सुविधांचा लाभ जास्तीत जास्त सामान्य भक्तांनाही भ्रमणदूरध्वनींद्वारे घेता यावा, या दृष्टीने संस्थानने या योजनेतून जमा होणाऱ्या उत्पन्नातील ५०% रक्कम न स्विकारता सदर कंपन्यांमार्फत या योजनेतून पुरविल्या जाणाऱ्या सेवा सुविधांसाठीचा आकार किमान ठेवून भ्रमणदूरध्वनींव्दारे (mobile) ही सुविधा साईभक्तांना उपलब्ध करुन द्यावी, असे नम्र मत आहे.

तरी, उपरोक्त परिच्छेद **'अ' व 'ब'** प्रमाणे सेवा सुविधा साईभक्तांचे भ्रमणदूरध्वनींवर उपलब्ध करुन देणेसाठी सदरील फेर प्रस्ताव मागविणेस तसेच परिच्छेद **'क'** नुसार या योजनेतून मिळणारे उत्पन्नातील ५०% रक्कम न स्विकारता सदर कंपन्यांमार्फत या योजनेतून पुरविल्या जाणाऱ्या सेवा सुविधांसाठीचा आकार कमीत

कमी ठेवून या सुविधा भ्रमणदूरध्वनींव्दारे (mobile) साईभक्तांना उपलब्ध करुन देणेस, मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. भ्रमणध्वनीव्दारे सेवा देणाऱ्या कंपन्यांना व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपूढे समक्ष चर्चेसाठी बोलविण्यात यावे असे ठरले.

(कार्यवाही- आय.टी. विभागप्रमुख)

**विषय नं.४५. वार्षिक कन्झ्युमेबल मटेरिअल खरेदी बाबत.**

**निर्णय क्र. ५२१** औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नवीन शैक्षणिक वर्ष (१ ऑगस्ट २००५ ते ३१ जुलै,२००६) सुरु होणार आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सर्व व्यवसायाच्या प्रशिक्षणार्थ्यांचे प्रात्यक्षिकासाठी लागणारे हार्डवेअर मटेरिअल, कटिंग टूल्स, जनरल मटेरिअल, ग्राईंडींग व्हील, वेल्डींग मटेरिअल, रेफ्रिजरेशन व इलेक्ट्रीक मटेरिअल इत्यादी कन्झ्युमेबल मटेरिअल खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,५०,०००/- एवढ्या अपेक्षित खर्चाचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी मान्यतेसाठी सादर केला होता. त्याची प्रत सर्व सदस्यांना पुरविणेत येऊन तो सोबत **परिशिष्ट "ए" म्हणून** ठेवण्यात आला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी आवश्यक असणारे कन्झ्युमेबल मटेरिअल पुरवठाधारकांकडून कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,५०,०००.०० चे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्र.प्राचार्य,आयटीआय/खरेदी अधिकारी)

**विषय नं.४६. अ) श्री कैलास खैरनार व सौ.यास्मीन सिकंदर शेख, सहाय्यक शिक्षक यांना संस्थान सेवेत कायम करणेबाबत.**

**ब) श्री.रविंद्र गोरख गायके वगैरे आठ वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी देऊन संस्थान सेवेत कायम करणेबाबत**

**निर्णय क्र. ५२२. अ)** श्री.सुभाष निंबा खैरनार यांची श्रीसाईबाबा कन्या विद्यामंदीराकडे सहाय्यक शिक्षक (गणित)या पदावर व सौ.यास्मीन सिकंदर शेख, यांची श्रीसाईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडे सहाय्यक शिक्षक (इंग्रजी) या पदावर रुपये ५५००-९००० या वेतनश्रेणीत दोन वर्षाचे परिवीक्षाधीन कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यांचेबाबत सर्वसाधारण तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | नांव हुद्दा व शैक्षणिक पात्रता | नेमणूक तारीख | देण्यात आलेला परिवीक्षाधीन कालावधी संपण्याची तारीख |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.सुभाष निंबा खैरनार सहाय्यक शिक्षक (गणित) एम.एस्सी.,बी.एड्. | १.११.२००३ | ३१.१०.२००५ |
| ०२. | सौ.यास्मीन सिकंदर शेख, सहाय्यक शिक्षक (इंग्रजी) एम.ए.,बी,एड् | १.११.२००३ | ३१.१०.२००५ |

उपरोक्त सहाय्यक शिक्षक/शिक्षिका यांचा दोन वर्षाचे परिवीक्षाधीन कालावधीची मुदत त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या तारखे अखेर संपुष्ठात येत आहे.

वरिल सहाय्यक शिक्षक/शिक्षिका यांचे काम व वर्तणूक चांगली असून ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने काम करीत आहेत. त्यांना संस्थान सेवेत कायम करण्यास हरकत नाही. असे अभिप्राय मुख्याध्यापिका, श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदिर व इंग्लिश मिडीयम स्कुल,शिर्डी यांनी दिलेले आहेत.

दि महाराष्ट्र एम्मालाईज ऑफ प्रायव्हेट स्कूल्स, कंडीशन्स ऑफ सर्व्हीस रेग्युलेशन अॅक्ट,१९७७ व रुल्स १९८१ मधील कलम नं.५ मध्ये कायम करणेबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

CERTAIN OBLIGATIONS OF MANAGEMENT OF PRIVATE SCHOOL-

(2) Every person appointed to fill a permanent vacancy shall be on probation for a period fo two years. Subject to the provisions of sub sectinon (4) & (5) he shall on completion of this probation periond of two years, he deemend to have been confirmed.

(3) if in the opinion of the Management, the work or behaviour of any probationers during the period of his probation, is not satisfactory, the Managment may terminate his services at any time during the said period after giving him one month's notice (or salary of one month in lieu of notice).

उपरोक्त नियमातील तरतुद व मुख्याध्यापीका, श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदिर व श्रीसाईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल शिर्डी तसेच प्रशासकीय अधिकारी (शैक्षणिक संकुल) यांचे अभिप्राय विचारात घेता, उपरोक्त सहाय्यक शिक्षक/शिक्षीका यांना त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या तारखेपासुन (रु.५५००-९००० या वेतनश्रेणीत) संस्थान सेवेत कायम करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. त्यास मान्यता देणेत आली.

**ब)** खालील वर्ग ४ चे कर्मचाऱ्यांचे काम व वर्तणूक समाधनकारक असून, ते हुकूमाप्रमाणे काम करतात. त्यांना वेतनश्रेणी देऊन, संस्थान सेवेत कायम करणेबाबत, संबंधित विभाग प्रमुख व प्रशासकीय अधिकारी यांनी अभिप्राय दिला असल्याने (परिवीक्षाधीन कालावधी संपलेच्या तारखेअखेर) रुपये

२५५०-५५-२६६०-६०-३२०० या वेतनश्रेणीत संस्थान सेवेत कायम करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. त्यास मान्यता देणेत आली.

| अ.नं. | कर्मचाऱ्याचे नाव व हुद्दा | परिवीक्षाधीन कालावधी संपण्याची तारीख | संस्थान सेवेत कायम करण्याची तारीख |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.रविंद्र गोरख गायके | ३१.८.२००५ | १.९.२००५ |
| ०२. | श्री.गणेश रत्नाकर कोराटे | ३१.८.२००५ | १.९.२००५ |
| ०३. | श्री.प्रशांत वसंत सुर्यवंशी | ३१.८.२००५ | १.९.२००५ |
| ०४. | श्री.नारायण उत्तम चव्हाण | ३१.८.२००५ | १.९.२००५ |
| ०५. | श्री.किशार नाथा चव्हाण | ३१.८.२००५ | १.९.२००५ |
| ०६. | श्री.आसाराम संपत वाणी | ३१.८.२००५ | १.९.२००५ |
| ०७. | श्रीमती सुरेखा सुरेश ठाकुर | ३१.८.२००५ | १.९.२००५ |
| ०८. | श्रीमती सुनिता पुंजा सोनवणे | १९.९.२००५ | २०.९.२००५ |

(कार्यवाही-आस्थापना प्रमुख)

**विषय नं.४७. डॉ.कोद्रे, वैद्यकीय अधिकारी (नेत्ररोगतज्ञ) यांचे कंत्राटी पध्दतीचे सेवेची मुदतवाढ करणेबाबत.**

**निर्णय क्र. ५२३.** संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयाचे आस्थापनेवर कायम सेवेतील डॉ.बोधले एम.एस.(नेत्ररोग) यांचे काम समाधानकारक नसल्यामूळे दिनांक ०२.०४.२००४ पासून त्यांची संस्थान सेवा संपुष्टात आणण्यात आली.

संस्थान रुग्णालयात येणाऱ्या नेत्ररुग्णांना योग्य त्या सेवा देण्याच्या दृष्टीने नेत्ररोग तज्ञांची आवश्यकता असल्याने मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २१.१०.२००४ चे सभेतील निर्णय क्र. ८१ नुसार जा.नं. एसएसएस-वशी-१-१०७०२-२००४ दिनांक १६.१०.२००४ अन्वये डॉ.रोहीत कोद्रे यांची कंत्राटी पध्दतीने प्रतिमहा रुपये ११,०००/- एकत्रित मानधनावर दिनांक ५.१०.२००४ पासून पुढे सहा महिन्यांकरीता नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यांचे कंत्राटी पध्दतीचे नेमणूकीची मुदत दिनांक ०४.०४.२००५ अखेर संपुष्ठात आल्याने मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार त्यांची मुदत दिनांक ०५.०४.२००५ पासुन पुढे सहा महिन्यांकरीता वाढविण्यात आलेली असून सदरची मुदत दिनांक ०४.१०.२००५ अखेर संपुष्ठात येत आहे.

डॉ.रोहीत कोद्रे यांनी दिनांक २८.०८.२००५ रोजी अर्ज सादर करुन त्यात "I am working here on contract basis as consultant in ophthalmology since last one year. I request you to Extend my contract further with due respect I want to bring you notice that despite my one year satisfactory work and my application for permanent post I am working here on contract basis so Kindly consider increment in my salary if possible" अशी विनंती केलेली असून त्यावर वैद्यकीय अधिक्षीका, रुग्णालय यांनी डॉ.रोहीत कोद्रे, वैद्यकीय अधिकारी नेत्ररोग यांच्या सेवेचा अनेक रुग्णांनी लाभ घेतलेला असून त्यांनी माहे ऑक्टोबर,२००४ ते जुलै,२००५ अखेर मेजर २०० व मायनर ६५ अशा एकूण २६५ डोळयांच्या यशस्वी शस्त्रक्रीया विनातक्रार केलेल्या आहेत.

तरी डॉ.रोहीत कोद्रे, वैद्यकीय अधिकारी नेत्ररोग यांची सेवा पुढे चालू ठेऊन त्यांना सहा महिनेकरीता मुदतवाढ मिळावी असे अभिप्राय दिलेले आहे.

तसेच वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये यांनी वरील तारखेपर्यन्त मुलाखतीव्दारे नेमणूक होऊ शकतील व न झाल्यास अशी नेमणूक देण्यात यावी, असे अभिप्राय दिलेले आहेत.

तरी वैद्यकीय अधिक्षीका, रुग्णालय व वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये यांचे अभिप्राय व नेत्ररोग रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून डॉ.रोहीत कोद्रे यांची कंत्राटी पध्दतीची सेवा पूर्वीच्याच अटी-शर्तीवर प्रतिमहा रुपये ११,०००/- या एकत्रित मानधनावर दिनांक ५.१०.२००५ पासून पुढे सहा महिने किंवा सदर पदावर वैद्यकीय अधिकाऱ्याची नेमणूक होऊन ते हजर होईपर्यन्त या दोन्हीपैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरीता मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनीसादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना)

**विषय नं.४८. श्री राहूल वैद्य, वैद्यकीय अधिकारी (स्पीच ऑडीओलॉजी ) यांचे मानद सेवा मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र. ५२४.** मा.व्यवस्थापन मंडळाचे दिनांक ३१/७ व१/८/२००४चे सभेतील निर्णय क्र.४००अन्वये जा.नं. एसएसएस-वशी१-८४२८-२००४ दिनांक २५.०८.२००४ अन्वये डॉ. राहूल वैद्य यांची दिनांक ०१.०८.२००४ पासून मानद स्पीच ॲण्ड ऑडिओमेट्रीस्ट म्हणून महिन्यातून एक व्हीजीट व एका व्हीजीटसाठी रुपये १५००/- मात्र एकत्रित मानधनावर पुढील आदेश होईपावेतो नेमणूक करण्यात आलेली असून सदरचे नेमणूकीस दिनांक ३१.०८.२००५ अखेर एक वर्ष पुर्ण होत आहे.

डॉ.राहूल वैद्य यानी संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयात दिनांक १८.०९.२००४ ते दिनांक २०.०८.२००४ अखेर १२ व्हीजीट दिलेल्या असून आतापर्यन्त त्याच्या सेवेचा ४०० रुग्णांनी लाभ घेतलेला आहे. व डॉ.आर.के.कुलकर्णी वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी, नाक कान घसा यांनी डॉ.राहूल वैद्य यांची पुढील एक वर्षासाठी नेमणूक करणेबाबत शिफारस केलेली असून त्यानुसार डॉ.राहूल वैद्य यांना मुदतवाढ देणेबाबत वैद्यकीय अधिक्षीका व वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये यांनी शिफारस केलेली आहे.

डॉ.आर.के.कुलकर्णी , अधिक्षीका व वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये यांचा अभिप्राय विचारात घेऊन डॉ.राहूल वैद्य, स्पीच अॅण्ड ऑडिओमेट्रीस्ट यांना यापूर्वी दिलेल्या नेमणूक पत्रातील अटी-शर्ती कायम ठेवून महिन्यातून एक व्हीजीट व एका व्हीजीटसाठी रुपये १५००.०० मात्र एकत्रित मानधनावर दिनांक ०१.०९.२००५ पासून पुढे एक वर्षासाठी मानद स्पीच अॅण्ड ऑडीओमेट्रीस्ट म्हणून मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना)

**विषय नं.४९. श्री विद्याधर ताठे, कार्यकारी संपादक, साईलीला यांचे सेवेबद्दल**

**निर्णय क्र. ५२५.** श्री विद्याधर ताठे, पत्रकार, पुणे यांची दिनांक ०४.०६.१९९५ पासून श्री साईलीला व्दैमासिकाचे कार्यकारी संपादक या पदावर कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर मानधन तत्वावर पुणे मुंबई जाणे-येणेसाठी रेल्वेच्या प्रथम वर्गाच्या पास खर्चासह आणि आठवड्यातून किमान तीन दिवस मुंबई कार्यालयात काम करण्याचे अटीवर दिनांक ३०.०९.१९९६ पर्यन्तचे कालावधीसाठी प्रथमतः नेमणूक करण्यात आली होती. त्यापुढे त्यांचे कंत्राटी सेवेची वेळोवेळी मुदतवाढ करण्यात आलेली आहे. श्री ताठे, कार्यकारी संपादक यांना पुणे मुंबई येणे-जाण्यासाठी रेल्वे त्रैमासिक प्रथम श्रेणीच्या पासासह सध्या रुपये ७००० दरमहा मानधन देण्यात येत आहे. त्यांच्या नेमणूकीचा कालावधी दिनांक ३०.०९.२००५ अखेर संपुष्ठात येत आहे.

श्री साईलीला व्दैमासिकाचे छपाई, प्रकाशन व वितरण इत्यादी काम आजपर्यन्त मुंबई कार्यालयातून चालू आहेत. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ३.०५.२००५ चे सभेतील निर्णय क्र.२०३ नुसार श्री साईलीला संपादकीय कार्यालय मुंबई येथून शिर्डी येथे स्थलांतरीत करणेबाबत निर्णय झालेला आहे. माहे जुलै/ऑगस्ट २००५ च्या अंकाच्या छपाईचे काम मुंबई येथील मौज प्रिंटींग ब्युरो यांचेकडे देण्यात आले असल्याने कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने सदर अंकाचे काम संस्थानचे मुंबई कार्यालयातून करण्यात येत आहे. त्यामूळे श्री साईलील संपादकीय कार्यालय अद्याप शिर्डी येथ स्थलांतरीत करण्यात आलेले नाही.

आता दिनांक २६.०८.२००५ रोजी श्री ताठे, कार्यकारी संपादक यांनी अर्ज सादर करुन त्यात त्यांनी त्यांच्या भावना व्यक्त करुन सर्वाच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केलेली आहे.
दिनांक ३० सप्टेबर,२००५ रोजी माझ्या ऑर्डरची मुदत संपत आहे. त्यापुढील काळात मला शिरडी येथे राहून कार्यकारी संपादक म्हणून कार्य करणे माझ्या पुण्यातील कौटुंबीक कारणामूळे शक्य नाही. पूणे विद्यापीठात मी पी.एचडी करत असल्याने त्या संदर्भात मला वेळोवेळी विद्यापीठात जावे लागते. पुण्यात मी काही संस्थांच्या कार्यकारणीवर आहे. संस्थानमधील गेल्या अकरा वर्षाच्या सेवेने मी संतुष्ट आहे. कार्यकारी संपादक नसलो तरीही बाबांचा व संस्थांचा मनाने सेवकच राहील. आपण बोलवाल तेव्हा मी माझ्या लायक कार्यासाठी तत्परतेने येईल. ती सेवा मी विनामोबदला सेवाभावाने करील असे नमूद केले आहे.

त्यावर प्रशासकीय अधिकारी, मुंबई कार्यालय यांनी श्री विद्याधर ताठे, कार्यकारी संपादक मुंबई कार्यालय यांनी दिलेल्या अर्जानुसार त्यांनी दिनांक ३०.०९.२००५ नंतर शिरडी येथे काम करणे शक्य होणार नाही असे कळविले असल्याने हे त्यांचे त्यागपत्र समजून दिनांक ३०.०९.२००५ अखेर त्यांची मानद सेवा संपुष्ठात आणता येईल. व दिनांक ०१.१०.२००५ पासून संपादकाच्या पदासाठी नेमणूकीबाबत तजवीज करावी लागेल असे अभिप्राय दिलेले आहे.
उपरोक्त सर्व बाबी विचारात घेऊन श्री ताठे, कार्यकारी संपादक श्री साईलीला यांची सेवा दिनांक ३०.०९.२००५ अखेर संपुष्ठात आणून सदरच्या पदावर पात्र व्यक्तीची नेमणूक जाहीरात देऊन मुलाखत पध्दतीने करावी असे मत आहे.

कार्यकारी संपादक या पदासाठी कोणत्याही शाखेची पदवी, भाषा विषयातील पदव्युत्तर उत्तीर्ण उमेदवारास प्राधान्य, पत्रकारीता क्षेत्रातील पदविका/ पदवी , धार्मिक / अध्यात्मीक क्षेत्रातील मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील लिखानाचा / संपादनाचा किमान दहा वर्ष अनुभव ही शैक्षणिक अर्हता ठेवावी असे मत आहे.

श्री साईबाबा विश्वस्त व्यवस्था शिर्डी अधिनियम -२००४ चे कलम नं.१३(४) मध्ये संस्थानचे कायम आस्थापनेवर दरमहा रुपये २०००/- हून अधिक वेतनावरील कर्मचाऱ्याची नेमणूक करणेसाठी कायद्यात खालीलप्रमाणे तरतूद आहे.

ज्या अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला दरमहा रुपये २०००/-हून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची नेमणूक समितीकडून असे पद शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यन्त केली जाणार नाही. अशी तरतूद आहे. त्यामूळे जाहिरातीव्दारे सदरचे पदावर कॉन्ट्रक्ट बेसीसवर मानधन तत्वावर उमेदवाराची नेमणूक करावी लागेल.

कार्यकारी संपादक या पदावर अन्य उमेदवाराची नियुक्ती होणेस काहीसा विलंब लागणार असल्याने सदरची कार्यवाही होईपर्यन्त सध्या सहा. संपादक, श्री साईलीला म्हणून काम पहात असलेले श्री सुनिल दत्तात्रय राणे यांचेकडे कार्यकारी संपादक श्री साईलीला या पदाचा कार्यभार सोपविता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत मा. कार्यकारी अधिकारी यांनी सभेस असे माहिती दिली की श्री ताठे यांचेशी समक्ष चर्चा झाली असून ते त्यांनी दिलेला कार्यकारी संपादक, पदाचा राजीनामा मागे घेत असल्याचे सांगीतले त्याची त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना)

**विषय नं.५०. श्रीरामपूर भू-संपादन कक्षाकडील कर्मचारी यांचे मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र. ५२६.** संस्थानसाठी भूसंपादन करणेकामी मा.व्यवस्थापन मंडळाच्या दि.१५/१६/१७ जूलै,२००० रोजीच्या सभेतील निर्णय क्र.२३८ अन्वये मा.उपविभागीय अधिकारी , (महसूल) यांचे पर्यवेक्षणाखाली दि.०२/०८/२००० पासून खालील कर्मचाऱ्यांचा एक कक्ष नियुक्त केलेला आहे.

| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे नांव. | पदांची संख्या. | दरमहा देण्यात येणारे मानधन रुपये. |
|---|---|---|---|
| १) | नायब तहसिलदार संवर्गातील पद. | ०१. | ७,०००-०० |
| २) | अव्वल कारकून संवर्गातील पद. | ०१. | ४,५००-०० |
| ३) | लिपीक संवर्गातील पद (मराठी, इंग्रजी टंकलेखन ज्ञान असलेला कर्मचारी) | ०२. | ४,०००-०० |
| ४) | शिपाई संवर्गातील पद. | ०१. | किमान वेतन दरानुसार |
| | एकूण. | ०५. | |

सदर कक्षाकडे भूसंपादनविषयक एकूण ६ प्रकरणे कार्यवाहीसाठी दिलेली असून,आतापर्यंत या कक्षाला मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णयानुसार वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर कक्षाची मुदत आता दि.३१/८/२००५ अखेर संपुष्टात येत आहे.

संस्थानचे शिरडी कार्यालयातील विधी अधिकारी यांचेकडील कामे वाढल्यामुळे त्यांचे मदतीला श्री.रणशूर,सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांची सल्लागार म्हणून कंत्राटी पध्दतीने एक वर्षे कालावधीसाठी मानधन तत्वावर नेमणूक केलेली आहे. तसेच विधी अधिकारी यांचे मदतीला नुकतीच श्री.चित्रे,विभागप्रमुख यांची नेमणुक केलेली आहे. त्याशिवाय या विभागासाठी आणखी दोन सेवानिवृत्त कर्मचारी सर्वश्री.रायपल्ली व वाखुरे यांची कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर तात्पुरते कालावधीसाठी नेमणुक करण्यासाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०८/२००५ रोजीचे सभेत मान्यता मिळालेली आहे.

मा.उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर यांचे पर्यवेक्षणाखाली कार्यरत असलेल्या कक्षाची मुदत दि.३१/०८/२००५ अखेर संपुष्टात येत आहे. दि.३१/०८/२००५ अखेर सदरचा कक्ष संपुष्टात आणून या कक्षाकडील कामकाज फर्निचर व इतर साहित्यांसह शिरडी कार्यालयाकडे वर्ग करण्यात यावे असे मत आहे.

दि.३१/०८/२००६ अखेर सदर कक्षास मुदतवाढ मिळावी असे मा.उपविभागीय अधिकारी, (महसूल),श्रीरामपूर यांनी त्यांचे दि.१२/०८/२००५ चे पत्राने मागणी केलेली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,भू-संपादन करणेकामी मा.उपविभागीय अधिकारी (महसूल), श्रीरामपूर यांनी केलेल्या कामाचा अहवाल व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे सादर करावा व त्यानंतर अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना)

**विषय नं.५१. डोअर फ्रेम व हॅण्ड हेल्ड मेटल डिटेक्टर कोटेशन्स उघडणे बाबत.**

**निर्णय क्र. ५२७.** मा. व्यवस्थापन मंडाचे दिनांक १८.०७.२००५ चे सभेतील निर्णय क्र.३५२ अन्वये सुरक्षा विभागाकरीता लागणारे डोअर फ्रेम व हॅण्ड हेल्ड मेटल डिटेक्टर खरेदीकामी इकडील जा.नं.एसएसएस/वशि/ संरक्षण/ ८४७८/२००५,दिनांक ११.०८.२००५ चे पत्रान्वये खरेदीकामी खालील पुरवठाधारकांकडुन दिनांक १९.०८.२००५ पर्यंतचे मुदतीत सिलबंद पाकीटातुन दरपत्रके (कोटेशन) पाठविणेबाबत कळविण्यात आले होते.

०१. रिलायन्स इंडस्ट्रीज, अंबड, नाशिक
०२. युनिवर्सल इलेक्ट्रॉनिक्स, चेन्नई
०३. मॉडर्न सिक्युरीटी अँड सिकरेट सर्विसेस प्रा.लि. कोलकाता
०४. ब्राम्हा सेल्स अँड सर्व्हीसेस, सांगली
०५. मगनुम इलेक्ट्रॉनिक्स, बंगलोर
०६. सिव्हीटेक इंडीया एम.आय.डी.सी., सिन्नर, जि. नाशिक
०७. अॅपेक्स अटोमेशन अँड सिक्युरीटी सिस्टीम धरमपेठ, नागपुर

त्यानुसार पुरवठादारांनी सादर केलेली खालील कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडणेत आली.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव |
|---|---|
| ०१ | रिलायंस इलेक्ट्रॉनिक्स, एम.आय.डी.सी. अंबड, नाशिक |
| ०२ | युनिव्हर्सल इलेक्ट्रॉनिक्स, पुनामल्ली हायरोड अमिनीजीकराई, चेन्नई |
| ०३ | सिव्हीटेक इंडीया देवळाली कॅम्प, नाशिक |
| ०४ | मगनुम इलेक्ट्रॉनिक्स वसंतनगर, बंगलोर |
| ०५ | मॉडर्न सिक्युरीटी अँड सिक्रेट सर्व्हीसेस प्रा. ली. कोलकत्ता |

उपरोक्त कोटेशनसादरकर्त्यांनी देऊ केलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले. (कार्यवाही-संरक्षण विभाग प्रमुख)

**विषय नं.५२. स्कॅनर मशिनचे कोटेशन्स उघडणे बाबत.**

**निर्णय क्र. ५२८.** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.०७.२००५ चे सभेतील विषय क्र.२० नुसार इकडील जा.नं. एसएसएस-वशी-संरक्षण-८४७८-२००५ दिनांक ११.०८.२००५ चे पत्रान्वये संस्थानचे सुरक्षा विभागाकरीता लागणारे भारतीय बनावटीचे मोठे मॉडेलचे स्कॅनर मशिन खरेदीकामी खालीलप्रमाणे पुरवठाधारकांकडून दिनांक १९.०८.२००५ पर्यतचे मुदतीत सिलबंद पाकीटातून दरपत्रके (कोटेशन) पाठविणेबाबत कळविण्यात आले होते.

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१. | रिलायन्स इंडस्ट्रीज, अंबड, नाशिक |
| ०२ | युनिव्हर्सल इलेक्ट्रॉनिक्स,चेन्नई |
| ०३ | मॉडर्न सिक्युरिटी ॲण्ड सिकरेट सर्व्हीसेस प्रा.लि.कोलकत्ता |
| ०४ | ब्राम्हा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, सांगली |
| ०५ | मगनूम इलेक्ट्रॉनिक्स,बंगलोर |
| ०६ | सिव्हीटेक इंडीया एम.आय.डी.सी.सिन्नर, नाशिक |
| ०७ | ॲपेक्स अटोमशन ॲण्ड सिक्युरिटी सिस्टीम धरमपेठ, नागपूर |

त्यानुसार पुरवठादारांनी सादर केलेली खालील कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आली.

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१. | रिलायन्स इंडस्ट्रीज, अंबड, नाशिक |
| ०२ | युनिव्हर्सल इलेक्ट्रॉनिक्स,चेन्नई |
| ०३ | मॉडर्न सिक्युरिटी ॲण्ड सिकरेट सर्व्हीसेस प्रा.लि.कोलकत्ता |
| ०४ | मगनूम इलेक्ट्रॉनिक्स,बंगलोर |
| ०५ | सिव्हीटेक इंडीया एम.आय.डी.सी.सिन्नर, नाशिक |

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय तहकुब ठेवण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही -संरक्षण विभागप्रमुख)

**विषय नं.५३. श्रीसाईबाबा मंदीर शिर्डीची सुरक्षा व स्वतंत्र सुरक्षा यंत्रणा निर्मितीबाबत.**

**निर्णय क्र. ५२९.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.५४. दुर्बिण खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र. ५३०.** दिनांक ०३.०८.२००५ रोजी मा. जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली व मा. पोलिस अधिक्षक अहमदनगर यांचे उपस्थितीत श्री साईबाबा मंदिर व परिसराचे सुरक्षिततेबाबत साईनिवास अतिथीगृहात बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये मंदिर परिसरात टेहळणी टॉवर्स उभारणे व दुर्बिण खरेदी करणेबाबत जिल्हा पोलिस अधिक्षक यांनी सुचना केली आहे.

मा. जिल्हा पोलिस अधिक्षक अहमदनगर यांचेकडुन मंदिर व परिसराचे सुरक्षा व्यवस्थेबाबत करावयाचे उपाय योजने संदर्भात वारंवार लेखी पत्र सुचना देण्यात येत आहे. त्यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे कार्यवाही करणेत येत आहे. टेहेळणी टॉवर्सबाबत शनि मंदिर गेटजवळ २० फुट उंचीचे निरीक्षण टॉवर लोखंडी ॲंगलमध्ये तयार करुन बसविणेबाबत विद्युत विभागामार्फत कारवाई करण्यात येत आहे. मंदिर परिसरातील पुर्व-पश्चिम व दक्षिण बाजुस असलेल्या महाद्वारांचा टेहेळणी टॉवर्स म्हणुन उपयोग करता येईल. या टॉवर्सवरुन टेहेळणी करणेसाठी खालीलप्रमाणे दुर्बिण खरेदी करणे आवश्यक आहे.

| अ. नं | तपशील | मागणी | अंदाजे दर | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१ | दुर्बिण | ०४ सेट | १,२०,०००/- प्रतिसेट | ४,८०,०००/- |

वरिलप्रमाणे ४ सेट खरेदीकामी रुपये ४,८०,०००/- इतका खर्च अपेक्षीत असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त प्रस्तावास तत्वतः मान्यता देणेत आली. याकामी मा. पोलिस अधिक्षक कार्यालय अहमदनगर व मिलीटरी कॅम्प अहमदनगर येथील कार्यालयाकडून दुर्बिणींचे संपुर्ण स्पेसिफीकेशनची सविस्तर माहिती घेऊन अधिकृत कंपन्यांकडून कोटेशन्स मागविण्यात यावीत, असें ठरलें. (कार्यवाही-संरक्षण विभाग प्रमुख)

**विषय नं.५५. मोबाईल जामर खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र. ५३१.** सध्याच्या काळात संपर्कासाठी भ्रमणदूरध्वनींचा वापर सर्व स्तरामधील जनतेत मोठ्या प्रमाणावर होत आहे. श्रीसाईच्या दर्शनासाठी येणारे बहुसंख्य साईभक्त सुशिक्षित असल्याने ते संपर्कासाठी भ्रमणदूरध्वनींचा वापर करतात. मध्यंतरीच्या काळात काही विघ्नसंतोषी लोकांनी भ्रमणदूरध्वनींमध्ये बॉम्बचा वापर करुन शिर्डीत बॉम्बस्फोट घडवून आणणार असल्याची अफवा पसरविण्यात आलेली होती. याच कालावधीत अयोध्येतील श्रीराम मंदिरात काही अतिरेकी संघटनांनी बॉम्बस्फोट घडवून आणले. अशा अतिरेकी संघटनांचे हल्ल्यांपासून साई मंदिर व परिसरात होणारा संभाव्य धोका टाळण्यासाठी मा.पोलिस अधिक्षक,

अहमदनगर यांनी सुरक्षा यंत्रणेबाबत दिनांक १५ जुलै २००५ रोजीचे पत्रान्वये काही उपाय योजना सुचविलेल्या होत्या.

यास अनुसरुन दिनांक २५ जूलै, २००५ रोजी मा.कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली संस्थानचे प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यामध्ये सुरक्षाविषयक कामकाजाबाबत चर्चा/ विनीमय करण्यासाठी सभा घेण्यात आलेली होती. सदर सभेत समाधी मंदिर, व्दारकामाई, दर्शनलाईन इत्यादी ठिकाणी येणाऱ्या सर्व साईभक्तांचे भ्रमणदूरध्वनी (Mobile) लॉक करणेसाठी समाधी मंदिरात Remote Jammer खरेदी करुन लावण्यात यावे असे ठरलेले आहे.

त्यानुसार समाधी मंदीर, द्वारकामाई, दर्शन लाईन या ठिकाणची पहाणी करुन मोबाईल जामरची चाचणी घेतली असता नऊ नग Mobile Jammer ची आवश्यकता असल्याने याकामी कोटेशन्स मागविण्यात आले होते. त्यानुसार खालीलप्रमाणे कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत.

| अ.नं. | कोटेशनसादकर्त्याचे नाव |
|---|---|
| ०१. | मे.पृथ्वी टेलीकॉम,हैद्राबाद |
| ०२ | मे.एस.एस.कम्यूनिकेशन सोलूशन्स, हैद्राबाद |
| ०३ | मे.प्रोफेशनल टेलीकॉम सर्व्हिसेस, हैद्राबाद |
| ०४ | मे.समटेल टेक्नॉलॉजी, सिकंदराबाद |
| ०५ | मे.क्लिक सॉफ्ट,कोल्हापूर |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडणेत आले असता कोटेशनसादरकर्त्यांनी प्रती नग खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशनसादकर्त्याचे नाव | कोटेशनमधील दर रुपये |
|---|---|---|
| ०१. | मे.पृथ्वी टेलीकॉम,हैद्राबाद | ४५,०००.०० |
| ०२ | मे.एस.एस.कम्यूनिकेशन सोलूशन्स, हैद्राबाद | ४५,०००.०० |
| ०३ | मे.प्रोफेशनल टेलीकॉम सर्व्हिसेस, हैद्राबाद | ४७,९००.०० |
| ०४ | मे.समटेल टेक्नॉलॉजी, सिकंदराबाद | ४६,५००.०० |
| ०५ | मे.क्लिक सॉफ्ट,कोल्हापूर<br>वजा ६ % सूट | २५,७२६.००<br>- १,५४३.५६<br>= २४,१८२.४४ |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.क्लिक सॉफ्ट,कोल्हापूर यांचे प्रती मोबाईल जामर रुपये २४,१८२.४४ प्रमाणे ९ मोबाईल जामरसाठी एकूण ( २४१८२.४४ x ९ =२,१७,६४१.९६) पूर्णांकित रुपये २,१७,६४२/- मात्रचे निम्नतम दराचे कोटेशन स्वीकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, असें ठरलें. (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

**विषय नं.५६. श्रीसाईचरित्रावर आधारित कीर्तन प्रवचन ऑडीओ व्हीडीओ सी.डी. बनविणेबाबत.**

**निर्णय क्र. ५३२.** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात समितीची कर्तव्य व अधिकार या शिर्षकाखाली अधिनियम नंबर १७ (२) मधील (ठ) मध्ये श्रीसाईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्रीसाई साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील तसेच (ड) मध्ये श्रीसाईबाबांच्या भक्तांमध्ये बंधुभाव, एकता,श्रद्धा, आणि समता या भावना वाढीस लावणारे उपक्रम अथवा कार्यक्रम आयोजित करील किंवा हाती घेईल, अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने श्रीसाईसतचरित्रावर आधारित कीर्तन,प्रवचनाच्या ऑडिओ व्हिडिओ कॅसेट व सी.डी. राष्ट्रीय कीर्तनकार चारुदत्त आफळे, पुणे यांचेकडून तयार करुन घेणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन मंडळाचे दिनांक २७.१२.२००४ रोजीचे सभेत विचारार्थ ठेवण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन झालेल्या निर्णय क्र.१८० नुसार श्री चारुदत्त आफळे, पुणे यांना जा.नं.एसएसएस-वशी-पीआरओ-२९११-२००५,दिनांक १९.३.२००५ अन्वये लेखी पत्र देण्यात आले होते. सदर पत्रात श्रींच्या सत्‌चरित्राचा आवाका पाहता एक एक तासाच्या चार सी.डी.ज्‌ बनवाव्या लागतील. आपण दिनांक २४ फेब्रुवारी रोजी शिर्डी येथे आला होता तेंव्हा आपणासोबत या विषयावर चर्चा झाली होती. या सी.डी.ज्‌ तयार करणेकामी येणारा सर्व खर्चाचा भार (रेकॉर्डिंग स्टुडिओ, कॅमेरा, कॅमेरामन, सेटलाईटस्‌ व इतर युनीट) संस्थन उचलणार आहे. तरी चार भाग तयार करणेसाठी आपण मानधन किती घेणार, तसेच संस्थानकडून कोणत्या गोष्टींची माहिती लागणार या बाबतची सविस्तर माहिती उलट टपाली कळवावी म्हणजे पुढील कार्यवाही सोईचे होईल, असे कळविलेले होते.

त्यानुसार श्री.आफळे यांनी त्यांचे दिनांक २३.५.२००५ रोजीचे पत्राने चित्रीकरण खर्च आपण करणार आहोत. वादक,कलाकार, संहितालेखन व सादरीकरण या सर्वांचा विचार करता, मराठीतील चार भागातील कीर्तनांसाठी रुपये ६०,०००/-प्रत्येकी असे धरता रुपये २,४०,०००/- व हिंदी ४ भागातील कीर्तनासाठी २,४०,०००/- असे मानधन होईल. तरी त्याची संमती व ॲडव्हान्स पाठवताच काम सुरु करता येईल. संहिता लेखन व पाठांतर जून,२००५ चे १ ते २० मध्ये होऊन २१ ते २५ मध्ये चित्रीकरण करणे सोईचे होईल. कारण पुढे माझा परदेश दौरा आहे. ॲडव्हान्स किमान १/३ (एक तृतीयांश) असावा

ही विनंती, असे कळविलेले आहे. म्हणजेच श्री.आफळे यांनी त्यांचे पत्रात नमूद केलेप्रमाणे ४-४ भागाच्या मराठी व हिंदी भाषेतील प्रवचनाच्या कॅसेटस् तयार करणेकामी रुपये ४,८०,०००/- (अक्षरी रुपये चार लाख ऐंशी हजार मात्र) इतका खर्च येणार असल्याचे दिसून येत होते.

तद्नंतर सदरचा खर्च हा जास्त होत असलेबाबत श्री.आफळे यांना दूरध्वनीवरुन कळविले असता त्यांनी २,००,०००/-रुपयात हे काम पूर्ण करणेबाबत कळविलेले आहे. सर्व भाविकांना दोन तासात म्हणजे एक एक तासाच्या दोन कॅसेट मधून पूर्ण चरित श्रवणाचा आनंद निश्चित मिळेल. त्यासाठी तशा तऱ्हेचे संहिता लेखन करणे, प्रसंगांना योग्य गीत करुन घेणे, त्यांना संगीत देणे व प्रत्यक्ष सादर करतांना वादक, लेखक व संगीतकार यांना काहीना काही मानधन देणे या साऱ्यांचा विचार व आढावा घेता सर्व मिळून मराठी २ कॅसेट व हिंदी २ कॅसेट यांना दोन लाखपर्यंत खर्च येतो. अर्थात या सादरीकरणानंतर आपणाला २ मराठी ऑडिओ, २ मराठी व्हिडीओ व २ हिंदी ऑडिओ, २ व्हिडीओ अशा एकूण ८ कॅसेट मिळतील. म्हणजे प्रत्येक कॅसेटला रुपये २५,०००/- एवढे मानधन घेऊन काम होते आहे, असे लेखी पत्राने कळविलेले आहे. कॅसेट तयार करणेबाबत आपणाकडील आदेश प्राप्त झालेनंतर मी प्रथम संहिता आपले अवलोनार्थ सादर करील असे त्यांनी दूरध्वनीवरुन सांगितलेले आहे.

तरी श्री.आफळे यांनी त्यांचे पत्रात नमूद केलेप्रमाणे मराठी व हिंदी भाषेतील प्रवचनाच्या ऑडिओ व व्हिडीओ कॅसेटस तयार करणेकामी रुपये २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख मात्र) एवढा खर्च अपेक्षित असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

**यानंतर आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **व्यवस्थापन समितीचे दि.१४.८.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र. ५३३.** व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.०८.२००५ रोजी शिरडी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व विश्वस्तांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२.** **दिनांक १०.०९.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या वैद्यकीय निवड समिती सभेचे इतिवृत्त**

**निर्णय क्र.५३४.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३.** **बासमती तांदूळ खरेदीबाबत.**

**निर्णय क्र. ५३५.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०८.०५.२००५ चे मध्ये श्री साईभक्तांना प्रसाद भोजनात बासमती सुगंधी तांदूळाचा भात दयावा असा निर्णय झाल्याने दि.२०-२२.०५.२००५चे दरम्यान वर्तमानपत्रात जाहिरात देवून रजिष्टर्ड ब्रॅण्डेड कंपन्यांचा आख्खा/तुकडा बासमती तांदूळ ५००० क्विंटल पुरविणेकामी निविदा मागणी करणेत आलेली होती. मुदतीअंती प्राप्त झालेल्या निविदा मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०९.०७.२००५ मध्ये उघडणेत येवून संबंधितांना सदरील सभेत बोलावून सूट देणेबाबत स्वतंत्र पत्र देण्यास सांगणेत आलेले होते. त्यानुसार प्राप्त पत्र मा.स्थानिक विश्वस्त सभा दि.१४.०७.२००५ मध्ये उघडणेत येवून तसेच दि.१५ व १७.०५.२००५ रोजी काही निवडक नमुने निवडणेत आलेले होते.

प्राप्त नमुन्यापैकी मे.धनराज छगनलाल ॲण्ड कंपनी, नवी मुंबई व इतर पाच पुरवठाधारकांचे नमुने निवडणेत येवून त्यांना प्रायोगिक तत्वावर प्रत्येकी १ गाडी अंदाजे १५० क्विंटलचा पुरवठा आदेश देणेत यावा तसेच श्रीगुरुपोर्णिमा उत्सवापासून बासमती तांदूळाचा भात देणेत यावा असे मा.अध्यक्ष यांनी समक्ष सुचीत केलेले होते. तसेच तसे वर्तमानपत्रातही प्रसिदध झालेले होते. प्रायोगिक तत्वावर खरेदी केलेला सर्व तांदूळ अमतसर पंजाब/हरीयाना येथून येणार असल्याने, व श्री गुरुपोर्णिमा उत्सवापूर्वी पोहोचणे शक्य नसल्याने मे.धनराज छगनलाल ॲण्ड कंपनी, मुंबई यांना दूरध्वनीवरुन तातडीने ५० क्विंटल बासमती तांदूळ रु.२४५०/-प्र.क्विंटल दराने मुंबई-वाशी येथून स्वतंत्रपणे तातडीने पाठविणेस सांगणेत आलेले होते. त्यानुसार त्यांनी ५० क्विंटल तांदूळाचा पुरवठा केलेला आहे व श्री गुरुपोर्णिमा उत्सवात सर्व साईभक्तांना बासमती तांदूळाचा भात, मा.अध्यक्ष सो. यांनी जाहिर केल्याप्रमाणे देणेत आलेला आहे.

तरी तातडीची गरज म्हणून मे.धनराज छगनलाल ॲण्ड कंपनी, मुंबई यांचेकडून खरेदी केलेला ५० क्विंटल तांदूळ खरेदीस कार्योत्तर मान्यता मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

याचवेळी काही सदस्यांनी तांदूळामध्ये अळया असल्याचे निदर्शनास आणून दिले. याबाबत सभेने प्रशासनास विचारणा केली असता, सदरच्या तांदूळातील अळया निवडून नंतरच तो वापरण्यात आलेला असल्याचे सांगितले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, पुरवठा झालेल्या तांदूळामध्ये अळयाबाबत चौकशी करण्यात यावी व सविस्तर अहवाल द्यावा, असें ठरले. (कार्यवाही-खरेदी अधिकारी)

आयत्या वेळेचा

**विषय नं.०४. मंदीर परिसरात विविध ठिकाणी स्टेनलेस स्टील रेलिंग व स्लाइडिंग गेट बसविणेबाबत.**

**निर्णय क्र. ५३६.** श्री साईबाबा हे सर्वधर्मसमभावाचे प्रतिक आणि लाखो भाविकांचे श्रध्दास्थान म्हणून ओळखले जातात. श्री साईबाबांचे समाधी मंदिर हे सर्व जाती-धर्मातील, पंथ-संप्रदायातील लोकांना मुक्त दालन असलेले एकमेव ठिकाण आहे. त्यामुळे शिर्डी येथे दर्शनासाठी येणा-या भक्तांची गर्दी प्रचंड असते. श्रीसाईबाबांनी दिलेल्या सर्वधर्मसमभावाच्या संदेशास विद्यमान कालावधीत अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होऊन शिर्डी हे ख-या अर्थाने राष्ट्रीय तिर्थस्थळ म्हणून उदयास आलेले आहे. त्यामुळे देशभरातून लाखो भक्त शिर्डी येथे श्री साईबाबांचे दर्शनार्थ नेहमीच येत असतात.

साईभक्तांचे गर्दीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून या भक्तांना दर्शन सुलभ व जलद व्हावे तसेच कन्ट्रोलींगसाठी ठिकठिकाणी रेलींग लावण्यात आलेले आहेत. काही ठिकाणी सध्या टेम्पररी लोखंडी रेलींग व रस्सी लावण्यात आलेल्या आहेत . याऐवजी जर स्टेनलेस स्टीलचे रेलींग लावले तर ते दिसावयास छान दिसून साफसफाईस सुलभ राहील, व परिसराचा सुशोभितपणा वाढू शकेल.

तसेच या रेलींगमध्ये कन्ट्रोलींगसाठी व मार्ग बंद-चालू करण्यास छोटे-छोटे गेटस तयार करण्यात आलेले आहेत. हे गेट उघडझाप करणारे असल्याने हे गेट उघडल्यानंतर दुस-या बाजुस या गेटचा अडथळा होतो. तसेच काही ठिकाणी रेलींग व गेट नसल्याने रस्सीचा वापर करण्यात आलेला आहे. या रस्सीचा जास्त उपयोग होत नाही , कारण भक्तांचा रेटा आला तर रस्सी ताणली जाते व याचा फायदा घेऊन काही भक्त मध्येच घुसण्याचा प्रयत्न करतातव त्यामुळे वादविवाद होतात. गर्दीच्या वेळी रस्सीचे बॅरेकेटींग कुचकामी ठरते. यासाठी जर स्टेनलेस स्टीलचे स्लाईडिंग गेट बसविले तर गेट उघडण्यासाठी जागा कमी लागून कन्ट्रोलींगच्या कामात सुटसुटीतपणा सुशोभितपणा येऊ शकेल.

यासाठी या कामाचे खालीलप्रमाणे भाग करता येतील.

(१) श्री समाधी मंदिरातून श्रींच्या समाधीचे व मूर्तीचे दर्शन घेऊन भक्त बाहेर पडतात, तेथे श्रींच्या समाधीचे पाठीमागील परंतू उत्तर बाजूस (नारळी गेट बाजू ) स्टेनलेस स्टील स्लाईडिंग गेट व स्टेनलेस रेलींग तयार करणे. खर्च :- रू. ६४,४२०.००

(२) श्री समाधी मंदिरात श्रींच्या समाधीचे व मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी पाठीमागील गुरूस्थान गेटने व्ही.आय.पी.आत जातात, तेथे (श्री समाधी मंदिराच्या पश्चिम बाजूस - गुरूस्थान मंदिराच्या पूर्व बाजूस व श्री समाधी मंदिराचे वायव्य कोप-यात ) स्टेनलेस स्टील रेलींग तयार करणे.खर्च :- रू. २३,०९०.००

(३) श्री समाधी मंदिरातून श्रींच्या समाधीचे व मूर्तीचे दर्शन घेऊन पाठीमागील गुरूस्थान गेटने बाहेर पडतात. तेथे (श्री समाधी मंदिराच्या पश्चिम बाजूस - गुरूस्थान मंदिराच्या आग्नेय बाजूस व श्री समाधी मंदिराचे नैऋत्य कोप-यात) स्टेनलेस स्टील रेलींग तयार करणे. खर्च:- रू. २८,८००.००

(४) श्री समाधी मंदिर मुख्य प्रवेशव्दाराच्या पश्चिम बाजूस मंदिर महाव्दारात भिंतीला लगत आरतीसाठी लागणा-या व्हीआयपी पासधारकांचे लाईनसाठी (व्ही.आय.पी.गेट पास) महाव्दाराची भिंत जेथून सुरू होते तेथून कॅश काऊंटींग हॉलच्या गेटपर्यंत स्टेनलेस स्टील रेलींग तयार करणे. खर्च :- रू. ४८,७२०.००

(५) अभिषेक - गावकरी गेट पासून तेथील बाहेरील हुंडीपर्यंत स्टेनलेस स्टील रेलींग तयार करणे. खर्च :- रू. ३२,६३०.००

(६) श्री साई मंदिरात दर्शन घेऊन नारळी - गेटमधून बाहेर पडणा-या भक्तांसाठी श्री समाधी मंदिराच्या वायव्य कोप-यापर्यंत स्टेनलेस स्टील रेलींग तसेच समाधी मंदिराचे उत्तर बाजूकडील नारळी गेटमधील जुन्या लोखंडी रेलींगऐवजी स्टेनलेस स्टील रेलींग तसेच समाधी मंदिराचे उत्तर बाजूकडील नारळी गेटच्या पुर्व बाजुकडील जुन्या लोखंडी रेलींगऐवजी स्टेनलेस स्टील रेलींग तयार करणे. खर्च रू. ८५,५३०.००

(७) उदी - काऊन्टरचे समोर व नारळ फोडण्याचे काऊन्टरचे समोर भक्तांचे लाईनसाठी कायमस्वरूपी स्टेनलेस स्टील रेलींग तयार करणे. खर्च :- रू. ५०,३९०.००

(८) श्री व्दारकामाई मंदिरात आतमध्ये सध्या असलेल्या उघडझाप करणारे साध्या गेटऐवजी तेथे स्टेनलेस स्टील स्लाईडिंग गेट व स्टेनलेस स्टील रेलींग तयार करणे. खर्च :- रू. ४४,१३०.००

(९) चावडीचे मागील बाजूस असलेल्या ( शामसुंदर हॉलसमोरील ) खोलीचे बाहेरील ओट्याला स्टेनलेस स्टील रेलींग तयार करणे. खर्च :- रू. ३०,४२०.००

(१०) श्री व्दारकामाई मंदिरात दर्शन घेण्यासाठी भक्त लाईन लावतात, त्या ठिकाणी मंदिराच्या दक्षिण बाजूस असलेल्या भिंतीला बाहेरील बाजूस पुर्व - पश्चिम स्टेनलेस स्टील रेलींग तयार करणे. खर्च :- रू. ५२,१२०.००

(११) श्री साई समाधी मंदिराचे उत्तर बाजूकडील ऑफीस गेट ते मोठा टि.व्ही. पर्यत जुन्या लोखंडी रेलींगऐवजी स्टेनलेस स्टील रेलींग तयार करणे. खर्च :- रू. १७,०४०.००

(१२) जनसंपर्क कार्यालयाचे पश्चिमेकडील भिंतीच्या कडेने भक्तांना दर्शन व आरती पास घेणेसाठी रांग लावणेसाठी स्टेनलेस स्टीलचे रेलींग तयार करणे. खर्च :-रु.३१,४००.००

वरीलप्रमाणे स्टेनलेस स्टील गेट रेलींग्ज व स्टेनलेस स्टील स्लाईडिंग गेट प्रस्तावित केलेले आहेत. वरील सर्व कामांचा एकत्रित खर्च रक्कम रूपये ५,०८,६९०.०० + ५ % कॉन्टिजेन्सी रू. २५,४३४.५० = रू. ५,३४,१२४.५० राऊंड अप रू. ५,३५,०००.०० इतका होणार आहे. उपरोक्त कामाचे ड्रॉईंग्ज व इस्टिमेट्स हे तज्ज्ञ अभिप्रायासाठी संस्थान कन्सल्टंट मे. निकम पाटील असोशिएट्स,

श्रीरामपूर यांचेकडे पाठविण्यात आले होते. त्यांनी उपरोक्त कामाचे ड्रॉईंग्ज व इस्टिमेट्स हे योग्य असल्याचे लेखी कळविले आहे. हे काम स्टेनलेस स्टीलचे काम करणा-या निष्णात वर्कशॉप धारकांकडून /संस्थांकडून करुन घ्यावे लागेल. या कामासाठी येणारे खर्चास व या कामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५. नविन सुपर स्पेशालिटी रुग्णालयाच्या नव्या कॅथलॅबसाठी केबल व पॅनेल बाबत.**

**निर्णय क्र. ५३७.** नविन सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचे काम प्रगतीपथावर असून यातील नव्या कॅथलॅबसाठी कॅथलॅब पुरविणेबाबत सिमेन्स कंपनीला कार्यादेश रुग्णालय विभागामार्फत देण्यात आलेला आहे. सिमेन्स कंपनीचे कॅथलॅबसाठी लागणाऱ्या पुर्वतयारीसाठी व मटेरीअलसाठी सिमेन्स कंपनीचे मागणीपत्रक वरीष्ठ प्रशासक, रुग्णालये विभाग यांनी त्यांचे दिनांक :- ०१-०९-२००५ चे पत्रान्वये सोबत जोडून कळविले आहे. या मागणीपत्रात सिमेन्स कंपनीने खालील गोष्टींची मागणी केली आहे.

| अ.नं. | मागणी |
|---|---|
| ०१ | इलेक्ट्रीकल पॉवरसाठी १५० के.व्ही.ए.सप्लाय व तो पुरविणेसाठी सबस्टेशन - जनरेटररूमपासून लागणारी स्वतंत्र केबल |
| ०२ | ड्रॉईंगमध्ये दर्शविलेला मेन पॅनेल |
| ०३ | कॅथलॅबमध्ये अंतर्गत डिस्ट्रिब्युशनसाठी लागणारी केबल |
| ०४ | इन्स्ट्रुमेंटसाठी अर्थिंग |
| ०५ | इमर्जन्सी ऑन- ऑफ स्विचेस |
| ०६ | केबलसाठी केबलट्रे |
| ०७ | सर्व्हिस पॉईंट ०५/१५ ॲम्प |
| ०८ | स्पॉटलाईट |
| ०९ | मशिनसाठी एअर कंडिशनर |
| १० | डिजिटल थर्मोमीटर |

उपरोक्त यादीतील एअर कंडिशनरबाबत वरीष्ठ प्रशासक, रुग्णालये विभाग यांनी खरेदी विभागामार्फत रुग्णालयासाठी खरेदी करण्यात येणाऱ्या एअर कंडिशनरमधून या ठिकाणी तीन एअर कंडिशनर्स बसवता येऊ शकेल , ते नव्याने जादा खरेदी करण्याची आवश्यकता नाही असे सांगितले आहे. उपरोक्त बाब वगळता इतर बाबीसाठी खालील प्रमाणे रुपये ३,१२,०००/- चे खर्चास तसेच याकामी कोटेशन मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

| अ.क्र. | मागणी | परिमाण | दर | होणारी किंमत |
|---|---|---|---|---|
| ०१) | इलेक्ट्रीकल पॉवरसाठी १५० के.व्ही.ए.सप्लाय व तो पुरविणेसाठी सबस्टेशन - जनरेटररूमपासून लागणारी केबलपॉलीकॅब / ॲव्होकॅब / फिनोलेक्स मेक आर्मरड् ॲल्युमिनीअम कंडक्टर केबल साईज - ३.५ X १५० स्क्वेअरएम ग्रेड - ११०० व्होल्ट, आय.एस.आय ॲप्रुव्हड | ३२५ मीटर | ४००.०० | १,३०,०००.०० |
| ०२) | ड्रॉईंगमध्ये दर्शविलेला मेन पॅनेल व्होल्टेज स्टॅबिलायझरसह | ०१ नग | १,५०,०००.०० | १,५०,०००.०० |
| ०३) | कॅथलॅबमध्ये अंतर्गत डिस्ट्रिब्युशनसाठी लागणारी केबल | | | |
| | अ) पॉलीकॅब/ॲव्होकॅब/फिनोलेक्स मेक पी.व्ही.सी. आरमर्ड् ॲल्युमिनीअम कंडक्टर केबल साईज - ३.५ X १६ स्क्वेअरएम ग्रेड - ११०० व्होल्ट, आय.एस.आय ॲप्रुव्हड | २० मीटर | ७५.०० | १,५००.०० |
| | ब) पॉलीकॅब / ॲव्होकॅब / फिनोलेक्स मेक पी.व्ही.सी. आरमर्ड् ॲल्युमिनीअम कंडक्टर केबल साईज - ३.५ X १० स्क्वेअरएम ग्रेड - ११०० व्होल्ट, आय.एस.आय ॲप्रुव्हड | २० मीटर | ५०.०० | १,०००.०० |
| | क) पॉलीकॅब/ॲव्होकॅब/फिनोलेक्स मेक पी.व्ही.सी.आरमर्ड् ॲल्युमिनीअम कंडक्टर केबल साईज - ३.५ X ५० स्क्वेअरएम ग्रेड - ११०० व्होल्ट, आय.एस.आय ॲप्रुव्हड | ३५ मीटर | १५०.०० | ५,२५०.०० |
| ०४) | इन्स्ट्रुमेंटसाठी अर्थिंग - मटेरीअल सेट | ०१ नग | ३,०००.०० | ३,०००.०० |
| ०५ | इमरजन्सी ऑन- ऑफ स्विचेस | ०४ नग | ६५०.०० | २,६००.०० |
| ०६) | केबलसाठी केबलट्रे | १० मीटर | २५०.०० | २,५००.०० |
| ०७) | सर्व्हिस पॉईंट ०५/१५ ॲम्प साठी | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | अ) अँकर / हरीसन/ रोमा मेक हेवी ड्युटी युनिव्हर्सल सॉकेट विथ एमसीबी - २५ॲम्प - बॉक्ससह - कोड ३०५३३ व्हाईट कलर | १४ नग | ४००.०० | ०५,६००.०० |
| | ब) अँकर / हरीसन/ रोमा मेक हेवी ड्युटी युनिव्हर्सल सॉकेट विथ स्विच - ०६ॲम्प - बॉक्ससह - कोड ४०३३ व्हाईट कलर | १४ नग | ०७५.०० | ०१,०५०.०० |
| | क) मोदी मेक केसींग कॅपींग पट्टी. साईज- ३२ एम.एम.- व्हाईट कलर | १०० मीटर | ०१०.०० | ०१,०००.०० |
| | ड) फिनोलेक्स / पॉलीकॅब मेक कॉपर वायर २.५ स्क्वेअर एम.एम. दोन कलरमध्ये ( ब्लॅक व ब्लू ) | ०४ बंडल | ४००.०० | ०१,६००.०० |
| | ई) फिनोलेक्स / पॉलीकॅब मेक कॉपर वायर ४.० स्क्वेअर एम.एम. | ३ बंडल | ६००.०० | ०१,८००.०० |
| ०८) | स्पॉटलाईट फिलिप्स / क्रॉम्प्टन मेक सिलींग माऊंटेड स्पॉटलाईट - शेडसह व ६० वॅट स्पॉटलाईटसह | ००२ नग | ४००.०० | ८००.०० |
| ०९) | मेको / एलजी/मेक डिजिटल थर्मोमीटर | ०२ नग | ०२,५००.०० | ०५,०००.०० |
| | एकुण खर्च :- | | | ३,१२,७००.०० |

(कार्यवाही - विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६. अपारंपारिक ऊर्जेअंतर्गत पवनचक्की प्रकल्प उभारणेबाबत.**

**निर्णय क्र. ५३८.** केंद्र शासनाच्या अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत मंत्रालयातर्फे अपारंपारिक ऊर्जा निर्मितीस प्राधान्य देण्याचे धोरण आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनानेही अपारंपारिक ऊर्जा निर्मितीस प्राधान्य देण्याचे धोरण अवलंबिले आहे.

मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक:- ०३-०५-२००५ च्या सभेत यावर चर्चा होऊन मेडा ,पुणे यांचेकडुन पवनऊर्जेविषयी सविस्तर माहिती व प्रोजेक्ट रिपोर्ट मागवावा असे ठरले. यानुसार मेडा यांचेकडून पवनऊर्जेविषयी सविस्तर माहिती व प्रोजेक्ट रिपोर्टचा अहवाल मिळणेसाठी संदर्भीय पत्र क्र. (०१)जा.क्र.एसएसएस- विद्युत-४७५५- २००५ दि. ०६-०५-२००५(०२)संस्थान जा.क्र. एसएसएस- विद्युत- ५७३२-२००५ दिनांक:-०१-०६-२००५ (०३)संस्थान जा.क्र. एसएसएस- विद्युत-६०८०-२००५ दिनांक:-१०-०६-२००५ अन्वये मेडा, पुणे यांचेशी संपर्क साधण्यात आला होता.

दिनांक ०२-०६-२००५ रोजी नामदार मा.श्री.विलास मुत्तेमवारसाहेब, केन्द्रीय उर्जा राज्यमंत्री, भारत सरकार हे शिर्डी येथे आले असता त्यावेळी नामदार मा.श्री.विलास मुत्तेमवारसाहेब, व मेडाचे श्री. यु.एम.पांडे , मॅनेजर यांचेशी संस्थानचे मा.कार्यकारी अधिकारी यांनी याबाबतीत सविस्तर चर्चा केली होती.

आता मेडा.पुणे यांनी संदर्भीय पत्र क्र. आयडीडी-०९१ /शिर्डी साईबाबा संस्थान/०५-०६/३३४७/ दिनांक ०७ -०७-२००५ पाठविले असून यात त्यांनी खालीलप्रमाणे कळविले आहे.

शासनाच्या धोरणाप्रमाणे सन २००७ पर्यंत पवनऊर्जा प्रकल्पाच्या विकासासाठी धुळे जिल्हयातील ब्राम्हणवेल, रायपूर, टकारमौली या ठिकाणांचा बृहत आराखडा करण्यात आलेला आहे. या कालावधीत गुंतवणूकदार या ठिकाणांवर पवनऊर्जा प्रकल्प उभारू शकतात. प्रकल्पापासून निर्माण होणारी वीज गुंतवणूकदार स्वत:च्या निजीवापरासाठी, तिस-या घटकास विक्री करण्यासाठी अथवा म. रा.वि.मंडळाला विक्री करण्यासाठी वापरू शकतो. या धर्तीवर साईबाबा संस्थान, शिरडी हे सद्यस्थितीत वापरत असलेल्या वीजेचे समायोजन पवनऊर्जा प्रकल्प टाकून करू शकतात.

संस्थानची सध्याची वीजेची गरज ४० लाख युनिटस् आहे. त्या आधारे संस्थानने २ ते ३ मे.वॅ.पर्यंतचा पवनऊर्जा प्रकल्प उभारल्यास त्यांच्या वीजेची पूर्ण गरज भागू शकेल. हे प्रकल्प उभारण्यासाठी प्रकल्पाच्या किंमतीच्या २.० टक्के ( दोन टक्के ) इतके महाऊर्जाचे सल्लागार शुल्क असेल. सदरचे दराप्रमाणे महाऊर्जेला कामाचे आदेश देण्यात यावेत, ही विनंती.

श्री साईबाबा संस्थानचा सध्याचा वीजवापर तसेच भविष्यातील श्री साईभक्तांचा वाढता ओघ लक्षात घेता साधारणत: वार्षिक ३० लाख युनिट ते ४० लाख युनिट वीजनिर्मिती करू शकेल या प्रकारचा अपारंपारिक ऊर्जेअंतर्गत २ ते ३ मे.वॅ.पर्यंतचा पवनचक्की प्रकल्प ऊभारणे गरजेचे राहील असे उपरोक्त पत्रान्वये मेडा यांनी कळविले आहे.

मेडा, पुणे यांनी पत्र क्र. आयडीडी-०९१ / शिर्डी साईबाबा संस्थान /०५-०६ /३३४७ /दिनांक :- ०७ -०७-२००५ पाठविले होते. व त्या पत्रातील मुद्द्यांच्या आधारे चर्चा करण्यासाठी यासंबंधी दिनांक ०९-०९-२००५ रोजी मेडा, पुणे यांचे प्रोजेक्ट एक्झीक्युटीव्ह श्री. मनोज पिसे व श्री. हरिष पाटील हे शिर्डी

येथे आले होते. त्यांची यावेळी मा. कार्यकारी अधिकारी यांचेशी सविस्तर चर्चा झाली. या चर्चेत मेडा, पुणे यांचे प्रोजेक्ट एक्झीक्युटीव्ह श्री. मनोज पिसे व श्री. हरिष पाटील यांनी खालीलप्रमाणे माहिती दिली .

या प्रकल्पाअंतर्गत ४०,००,००० युनिटची दरवर्षी वीजनिर्मिती होऊ शकते. सध्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या प्रती युनीटला सर्व चार्जेस मिळून सरासरी रु. ४.५० इतका दर पडतो. दरवर्षी सरासरी रुपये १,४४,००,०००=०० इतके वीज बील संस्थानला येते. हा पवन चक्कीचा प्रकल्प राबविल्यास प्रती युनिट वीज निर्मिती खर्च ०.८० पैसे येतो. म्हणजेच रू. ३२,००,०००.०० इतका खर्च होऊ शकतो व व ही निर्माण झालेली वीज महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने विकत घेतल्यास रु. ३.५० या प्रमाणे रु. १,४०,००,०००.०० इतके उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. खर्च वजा जाता रू.१,०८,००,०००.००एवढ्या रकमेची सूट बीलातून मिळू शकते. ही रक्कम संस्थानच्या प्रत्यक्ष झालेल्या वीज वापराच्या बीलातून वजा होऊन मिळेल. साधारणत: ८- ९ व्या वर्षी पवन चक्कीतील गुंतवणूकीची परत फेड म्हणजेच पवन चक्कीतील निव्वळ गुंतवणूकीमुळे पवनचक्की संस्थानचा मालकीची होईल. पवन चक्कीचे अंदाजे आयुष्य २० वर्षे आणि २० वर्षातील निव्वळ उत्पन्न, सर्व खर्च वजा जाता २० कोटी इतके अपेक्षित आहे. म्हणजेच पवनचक्की संपुर्ण संस्थानची मालकीची राहून आपल्या गुंतवणूकीवर पहिली काही वर्षे ( ८- ९ वर्ष) वगळता पुढील ११-१२ वर्षे निव्वळ उत्पन्न मिळू शकते.

अपारंपारिक ऊर्जे अंतर्गत संस्थानला वार्षिक वीजवापराएवढी लागणारी ४० लाख युनिट एवढी वीज निर्मिती पवन चक्कीव्दारे करावयाची असल्यास २.५० मे.वॅट क्षमतेच्या पवनचक्कीसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१. | जमीन | ००,२०,००,०००.०० |
| ०२. | पवन चक्कीची किंमत | १०,४२,५०,०००.०० |
| ०३. | उभारणी व कार्यान्वित करणेचा खर्च | ०१,५०,००,०००.०० |
| ०४. | सबस्टेशन उभारणी खर्च | ००,७५,००,०००.०० |
| ०५. | मेडा प्रोसेसिंग चार्जेस | ००,१२,५०,०००.०० |
| | **एकुण रक्कम रु.** | **१३,००,००,०००.००** |

उपरोक्त रकमेव्यतिरिक्त हा प्रकल्प उभारण्यासाठी लागणाऱ्या प्रकल्पाच्या किंमतीच्या २.० टक्के (दोन टक्के) इतके महाउर्जाचे सल्लागार शुल्क अधिक वॅट व इतर टॅक्स वेगळे आदा करावे लागतील)

या प्रकल्पासाठी लागणा-या उच्च दाब आणि उच्च दाब केंद्राचे व त्यांना लागणा-या परिषण व वितरण वाहिन्यांचे सर्वेक्षण महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ व महाऊर्जा संयुक्तपणे करतात. सर्वेक्षणाप्रमाणे उभारण्यात येणारी उच्च दाब व अति उच्च दाब उपकेंद्रे व त्यांना लागणा-या अतिउच्च दाबाच्या परिषण व वितरण वाहिन्यांची कामे महाऊर्जा किंवा खाजगी पवन ऊर्जा प्रवर्तक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने मान्य केलेल्या अंदाजपत्रकानुसार व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या तांत्रिक प्रमाणानुसार महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या देखरेखीखाली करुन घेतात. या निष्कासन व्यवस्थेमध्ये अस्तित्वात असलेली उपकेंद्रे आणि पारेषण व वितरण वाहिन्यांमध्ये जे काही सुदृढीकरण अथवा बदल करावे लागतात त्यांचाही समावेश आसतो. पवन ऊर्जा प्रकल्पांच्या ठिकाणांपासून ते उच्च दाब व अति उच्च दाब उपकेंद्रांपर्यंत जोडल्या जाणा-या ३३ के.व्ही.दाबाच्या वाहिन्यांचाही समावेश या व्यवस्थेमध्ये असतो.

प्रकल्पाचा प्रस्ताव महाउर्जाकडे मान्यतेसाठी सादर करताना आपणाला महाऊर्जाकडे प्रस्ताव फी म्हणून रू.६,०००.०० + सुरक्षा ठेव रू.३०,०००.०० + सादरीकरण फी रु.१०,०००.०० अशी सर्व मिळून रू.४३,०६,०००.०० इतकी रक्कम जमा करावी लागेल. या रक्कमेतील रू. ४०,००,०००.०० इतकी रक्कम महाउर्जाकडे प्रस्ताव सादर केल्यानंतर महाउर्जाकडून मागणी आल्यानंतरच आदा करावी लागेल . व नंतर ही रक्कम ज्या उत्पादकाला हे काम दिले जाईल त्याचे बीलातून रु.४०,००,०००.०० इतकी रक्कम वळती करून घेता येईल.

याकामी पवनचक्की प्रकल्प उभारण्याकामी लागणाऱ्या प्रकल्पाच्या किंमतीच्या २.० टक्के (दोन टक्के) इतके सल्लागार शुल्क महाऊर्जामार्फत आकारण्यात येते.हे सल्लागार शुल्क आकारुन पवनचक्की उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करणे, निविदा मसूदा तयार करणे, प्राप्त निविदांची छाननी करुन संस्थानला अहवाल सादर करणे, पवनचक्की प्रकल्प उभारणी चालू असताना किंवा आस्थापीत केल्यानंतर वेळोवेळी पाहणी करुन संस्थानला अहवाल सादर करणे , इत्यादी सेवा महाउर्जामार्फत पुरविल्या जातील. पवनचक्की प्रकल्प उभारण्याकामी निविदा मागविणे व उत्पादकाला कार्यादेश देवून रक्कम आदा करण्याबाबतची कार्यवाही संस्थानला करावी लागेल.

या कामी अंदाजे एकुण खर्च रू.१३,००,००,०००.०० (रु.तेरा कोटी मात्र) + वॅट + प्रकल्पाच्या किंमतीच्या २.० टक्के (दोन टक्के) इतके महाउर्जाचे सल्लागार शुल्क इतका अपेक्षित असून ऊत्पादकांकडून बोलवावे लागणारे टेंडर/बीड डाक्युमेंट हे महाऊर्जा यांच्याकडून तयार करून घ्यावे

लागतील. व त्यानंतर वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जाहीर टेंडर/बीड मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत मेडा यांचे प्रतिनिधी श्री एस.आर.चौधरी व श्री मनोज पिसे उपस्थित होते, त्यांनी या प्रकल्पाबाबत सविस्तर माहिती सभेस करुन दिली. तसेच सदस्यांना विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.अपारंपारिक ऊर्जेअंतर्गत पवनचक्की प्रकल्प ऊभारणीकामी मेडा यांचेकडून टेंडरफॉर्म तयार करुन घेऊन वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जाहीर टेंडर/बीड मागविणेत यावीत असे ठरलें. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७. जिल्हा परिषद स्कुल बिल्डींग साईटवरील मेन एल.टी.लाईन व एच.टी.लाईन शिफ्ट करणेबाबत.**

**निर्णय क्र. ५३९.** मे.नितीन बी.औताडे , कॉन्ट्रॅक्टर यांनी संस्थानकडे कळविले होते की, जि.प.स्कुल बिल्डींग साईटवर स्कुल बिल्डींगचे काम सुरू केले आहे व या बिल्डिंगच्या कामामध्ये मेन एच.टी.लाईन व एल.टी.लाईनचा अडथळा येत आहे. ही मेन एच.टी.लाईन व एल.टी.लाईन त्वरीत शिफ्ट करून देण्याविषयी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला संस्थानमार्फत कळविण्यात आले होते. तसेच मा.सहाय्यक अभियंता व मा.कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी , शिर्डी यांचेशी वारंवार समक्ष व दुरध्वनीवरून चर्चा करण्यात आली होती. दिनांक १२.८.२००५ रोजी मा.कनिष्ठ अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, शिरडी यांनी त्यांचे पत्र क्र.जेईएल/शिरडी/१२१/दिनांक १२-०८-२००५ अन्वयें खालीलप्रमाणे मागणी केली होती.

०१. येणाऱ्या खर्चाच्या कामाच्या रकमेच्या १५ टक्के रक्कम सुपरव्हिजन चार्जेसपोटी संस्थान महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे भरावयास तयार असल्याचे संस्थानचे संमतीपत्र .

०२, शिरडी नगरपंचायत यांचे या कामासाठी ना हरकत प्रमाणपत्र

उपरोक्त मुद्दा क्र.(१) नुसार मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी,संगमनेर यांना संस्थान जा.क्र. एसएसएस / विद्युत / ९१०९ / २००५ दिनांक :-२३-०८-२००५ नुसार कळविण्यात आले होते. व उपरोक्त मुद्दा क्र. (२) नुसार शिर्डी नगरपंचायत ,शिर्डी यांचेकडे संस्थान जा.क्र.एसएसएस / विद्युत / ९१०६ / २००५दिनांक :-२३-०८-२००५ अन्वये ना हरकत प्रमाणपत्राची मागणी करण्यात आली होती. शिरडी नगरपंचायत ,शिरडी यांचे पत्र क्र. क्र. न.पं.बांध /कावि-५ / ६१७ / २००५ दिनांक :- ३०-०८-२००५ अन्वये ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले असून हे मूळ ना हरकत प्रमाणपत्र संस्थान जा.क्र. एसएसएस / विद्युत / ९५७९ / २००५ दिनांक :-०२-०९-२००५ अन्वये मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी , संगमनेर यांचेकडे पाठविण्यात आले असून त्यांना ही मेन एच.टी.लाईन व एल.टी. लाईन त्वरीत शिफ्ट करून देण्याची विनंती करण्यात आली होती.

उपरोक्त जि.प.स्कुल बिल्डींग साईटवरील एल.टी.लाईन व एच.टी.लाईन शिफ्ट करण्यासाठी मा.कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी , शिरडी यांनी दिलेल्या टेक्नीकल इस्टिमेट्नुसार रु.९९,०००.०० इतका अंदाजे शिफ्टींग खर्च ग्रृहीत धरून व सुपरव्हिजन चार्जेसपोटी १५ टक्के रक्कम रु. १४,८५०.०० मिळून रू. १,१३,८५०.०० ( राऊंड अप रू. १,१४,०००.०० ) इतका खर्च अपेक्षित गृहीत धरून या खर्चास मान्यता मिळणेसाठी हा प्रस्ताव दिनाक १८-०९-२००५ रोजी होणाऱ्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे सादर करण्यात आला होता.

यानंतर आता दिनांक ०२-०९-२००५ रोजी मा.सहाय्यक अभियंता , महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी , राहाता यांनी या कामासाठी १५ टक्के रक्कम म.रा.वि.वि.कंपनीच्या सुपरव्हिजन चार्जेसपोटी कोटेशन पाठविले असून रू. १५,१५०.०० इतक्या रकमेचा भरणा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे करावा म्हणून कळविले आहे. तसेच यासोबतच त्यांनी त्यांचे पत्र क्र.स.अ./कृ व नि./ आस्था /इ/६२५दिनांक २.९.२००५ अन्वये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या तीन कंत्राटदारांकडून या कामासाठी कोटेशन घेऊन प्रत्येक कोटेशनवर स्वाक्षरी करून त्यावर त्यांचा अभिप्राय पाठविला आहे.

(१) मा.सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी , राहाता यांनी पाठविलेली कोटेशन खालीलप्रमांणे -

| अ.नं. | कंत्राटदाराचे नांव | कामाची रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१ | श्री. प्रताप एल.झगडे, राहाता | ०१,००,९६८.०० |
| ०२ | श्री. आर. एन. भडांगे, राहाता | ०१,०७,६८८.०० |
| ०३ | पंचकृष्ण इलेक्ट्रीकल, संगमनेर | ०१,०९,१२०.०० |

(०२) मा.सहाय्यक अभियंता , महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी , राहाता यांचा वरील कोटेशनवरील लेखी अभिप्राय खालीलप्रमाणे :-

शिर्डी येथील एच.टी./ एल.टी.लाईनचे कामासंबंधी सोबत अधिकृत कंत्राटदारांचे निविदा पत्राचे अनुषंगाने श्री.पी.एल. झगडे, कॉन्ट्रॅक्टर, राहाता. यांची निविदा कमीत कमी दराची असून त्यांना मंडळातील एच.टी./ एल.टी. लाईनचे कामाचा अनुभव आहे. तरी त्यांना कामाचे कॉन्ट्रॅक्ट देण्यात यावे.

मा.सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, राहाता यांनी कळविलेल्या रू. १५,१५०.०० इतकी १५ टक्के सुपरव्हिजन चार्जेसची रक्कम व कामासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण

कंपनीच्या कंत्राटदारांकडून प्राप्त झालेल्या कोटेशनवरील मा.सहाय्यक अभियंता , महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी , राहाता यांनी शिफारस केलेले व लोएष्ट असलेले श्री. प्रताप एल.झगडे, राहाता यांचे दर रू. ०१,००,९६८.०० मिळून या कामासाठी एकुण खर्च रु. ०१,१६,११८.०० इतका होणार आहे.

मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे रू. १,१४,०००.०० इतका खर्च अपेक्षित गृहीत धरून या खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर आलेला होता. या रकमेपेक्षा होणारा खर्च रू. ०२ , ११८.०० ने जास्त आहे.

मा.सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, राहाता यांनी कळविलेली रू. १५,१५०.०० इतकी १५ टक्के सुपरव्हिजन चार्जेसची रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे भरणेसाठी तसेच या कामासाठी मा.सहाय्यक अभियंता , महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी , राहाता यांनी शिफारस केलेले व लोएष्ट असलेले श्री. प्रताप एल.झगडे, राहाता यांना आदेश देणेस व होणाऱ्या रू. ०१,१६,११८.०० इतक्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८ ड्रेनेज चेंबर्स वरील लोखंडी झाकणे बनविणेबाबत.**

**निर्णय क्र. ५४०.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९. नियोजित सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचे वाढीव लोडसाठी नविन ५०० केव्हीए जनसेटबाबत.**

**निर्णय क्र.५४१.** रुग्णालयाचे विस्तारीकरणाचे काम सध्या प्रगतीपथावर असून या विस्तारीकरणाचे कामात, काही मशिनरी वाढणार असल्याने लोड वाढणार आहे. मा.व्यवस्थापन समितीसमोर, या विस्तारीकरणाचे कामात वाढणारा लोड व त्याबरोबर इतर बांधकामे विचारात घेऊन मोठा ५०० के.व्ही.ए क्षमतेचा जनसेट घेण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. हा प्रस्ताव दिनांक ०३-०५-२००५ च्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत मान्य झाला आहे. येणा-या खर्चास व दर मागविणेसाठी तत्वतः मान्यता मिळाली होती. मान्यतेनुसार वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जाहीर टेंडर मागविण्यात आले होते. मुदतीत ०३ टेंडर प्राप्त झाले होते व त्यांचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | मे. मॅग्नेटिक ईले.ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स, औरंगाबाद | ३३,५७,८६०.०० | अकॉस्टिकसह जनसेटचे दर आहेत. |
| ०२ | मे.आदिती इलेक्ट्रिकल्स, नाशिक | ३७,३१,८९१.०० | अकॉस्टिकसह जनसेटचे दर आहेत. |
| ०३ | मे. बी.जे. इलेक्ट्रिकल्स, नाशिक | ३७,३८,४७४.६० | अकॉस्टिकसह जनसेटचे दर आहेत. |

दिनांक ०९-०७-२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेत रुग्णालयासाठी नविन ५०० के.व्ही.ए. जनरेटर बसविणेबाबत मे. मॅग्नेटिक इले. ॲड इलेक्ट्रॉनिक्स, औरंगाबाद यांनी कमी दिलेले दर ( रू. ३३,५७,८६०.००) मान्य झाल्यानंतर त्यानुसार मे.मॅग्नेटिक इले. ॲड इलेक्ट्रॉनिक्स, औरंगाबाद यांना जा.क्र.एसएसएस - विद्युत - ८८७८- २००५ दिनांक १७-०८-२००५ अन्वये कामाचा आदेश देण्यात आला आहे. आदेश देऊन एक महिन्याचा कालावधी पूर्ण झाला आहे. अद्याप मे.मॅग्नेटिक इले. ॲड इलेक्ट्रॉनिक्स, औरंगाबाद यांनी कोणत्याही प्रकारे कामास सुरुवात केलेली नाही. तसेच कामाच्या प्रगती बद्दल कोणत्याही प्रकारचे लेखी त्यांचेकडून अद्याप प्राप्त झाले नाही.

मे.मॅग्नेटिक इले. ॲड इलेक्ट्रॉनिक्स, औरंगाबाद यांनी आता दिनांक १०-०९-२००५ रोजी एक पत्र पाठवून यात त्यांनी टेंडरमध्ये अकॉस्टीकसह रेट दर्शविले नसल्याचे कळवून जनसेट अकॉस्टीकसह लागत असल्यास त्याचे वेगळे दर पडतील असे लेखी कळविले आहे.

मे.मॅग्नेटीक इले. ॲड इलेक्ट्रॉनिक्स , औरंगाबाद यांचे संस्थानकडे सादर केलेले टेंडर पाहता मॅग्नेटीक इले. ॲड इलेक्ट्रॉनिक्स , औरंगाबाद यांनी टेंडरमध्ये ५०० के.व्ही.ए.जनसेट्चा दर हा अकॉस्टीकसह नमूद केलेला-दर्शविलेला आहे. त्यांचे पत्र प्राप्त झाल्यानंतर याबाबत त्यांना दुरध्वनीवरून, आपले मूळ टेंडर संस्थान दप्तरी आहे , व या टेंडरमध्ये आपण ५०० के.व्ही.ए.जनसेट्चा दर हा अकॉस्टीकसह दिलेला होता व त्यामूळे जादा दराची आपली मागणी मान्य करणे शक्य नाही तसेच याबाबत आपण चर्चा करण्यासाठी तसेच आपण भरलेले मूळ टेंडर पाहण्यासाठी शिर्डी तेथे तातडीने यावे, असे सांगूनही व वारंवार कळवून ते ही बाब मान्य करण्यास तयार नाहीत तसेच करारनामा करून देण्याविषयी वारंवार सांगूनही ते करारनामा करून देत नाहीत व करारनामा करून देण्यासाठी तसेच चर्चेसाठी शिरडीस यावयास तयार नाहीत. मे.मॅग्नेटिक इले. ॲड इलेक्ट्रॉनिक्स, औरंगाबाद यांची अर्नेस्ट मनी डिपॉझीटची रक्कम रू.२०,०००.०० संस्थान कडे जमा आहे. आदेश देऊन एक महिन्याचा कालावधी पूर्ण झाला आहे. अद्याप मे.मॅग्नेटिक इले. ॲड इलेक्ट्रॉनिक्स, औरंगाबाद यांनी कोणत्याही प्रकारे कामास सुरुवात केलेली नाही. या सर्व बाबी पाहता मे.मॅग्नेटिक इले. ॲड इलेक्ट्रॉनिक्स, औरंगाबाद यांची

संस्थानच्या नियोजित रुग्णालयासाठी लागणारा ५०० के.व्ही.ए.जनसेट पुरविण्याची इच्छा दिसून येत नाही. व यामुळे जर जनरेटरसेट वेळेत बसवून चालू झाला नाही तर सुपरस्पेशालिटी रुग्णालयाला लागणारा जनरेटरचा सप्लाय पुरविण्यास अडचण होणार आहे. यामुळे या पुढील वेळेची दिरंगाई टाळण्यासाठी व जनरेटरसेट वेळेत बसवून चालू होऊन सुपरस्पेशालिटी रुग्णालयाला लागणारा जनरेटरचा सप्लाय पुरविणे शक्य व्हावे म्हणून मे.मॅग्नेटिक इले. ॲंड इलेक्ट्रॉनिक्स, औरंगाबाद यांना दिलेला आदेश रद्द करून सेकंड लोएस्ट असलेले मे.आदिती इलेक्ट्रिकल्स, नाशिक यांना रू. ३७,३१,८९१.०० इतक्या रकमेची ऑर्डर देणे किंवा पुन्हा वर्तमानपत्रात जाहिरात देऊन रिटेंडर मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर चर्चा होऊन यापुढील वेळेची दिरंगाई टाळण्यासाठी तसेच वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा बोलावणे वगैरे साठी वेळ जाणार असल्याने व जनरेटर सेट वेळेत बसवून चालू होऊन, सुपर स्पेशालिटी रुग्णालयाला लागणारा जनरेटरचा सप्लाय पुरविणे शक्य व्हावे म्हणून मे.मॅग्नेटीक इले.ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स, औरंगाबाद यांना दिलेला कार्यादेश रद्द करुन सेकेंड लोएस्ट असलेले मे.आदिती इलेक्ट्रीकल, नाशिक यांना रुपये ३७,३१,८९१.०० इतक्या रकमेचा कार्यादेश देण्यात यावा, असें ठरले.

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०. निर्याजित सुपर स्पेशालिटी रुग्णालयामधील कॅन्टीन, डॉक्टर निवासस्थाने व फार्मसी विभागाचे इलेक्ट्रिक वायरिंगबाबत.**

**निर्णय क्र. ५४२.** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६-०८-२००५ चे सभेतील निर्णय क्र.४५७ अन्वये नियोजित सुपर स्पेशालिटी रुग्णालयामधील कॅन्टीन, डॉक्टर निवासस्थाने व फार्मसी विभागाचे इलेक्ट्रीक वायरींग करणेसाठी रू. ०२,७२,६५३.०० इतक्या खर्चास मान्यता मिळून या कामासाठी कोटेशन्स मागविणेचा निर्णय झालेला आहे. त्यानुसार विद्युत विभाग जा.नं.एसएसएस / विद्युत / ९५७८ / २००५ दिनांक ०२-०९-२००५ अन्वये कोटेशन्स मागविण्यात आली होत. त्यानुसार खालीलप्रमाणे नऊ कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | मे. निना इलेक्ट्रिकल्स, मुंबई |
| ०२ | मे. आदिती इलेक्ट्रिकल्स , नासिक |
| ०३ | मे. श्री.साई एन्टरप्राईझेस, शिर्डी |
| ०४ | मे. श्री.साईश्रद्धा इले., नासिक |
| ०५ | मे. जाधव इलेक्ट्रिकल्स, कोपरगांव |
| ०६ | मे.रामराज्य इंजिनिअर्स, नासिक |
| ०७ | मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नासिक |
| ०८ | मे.देवांग इलेक्ट्रिकल्स, नासिक |
| ०९ | मे.प्रथमेश इलेक्ट्रोटेक सर्व्हिसेस,नासिक |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडणेत आली असता कोटेशन्सधारकांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | देऊ केलेले दर |
|---|---|---|
| ०१ | मे. निना इलेक्ट्रिकल्स, मुंबई | ३,२८,६६०.०० |
| ०२ | मे. आदिती इलेक्ट्रिकल्स , नासिक | ३,१८,५३०.०० |
| ०३ | मे. श्री.साई एन्टरप्राईझेस, शिर्डी | ३,५०,००१.०० |
| ०४ | मे. श्री.साईश्रद्धा इले., नासिक | २,९५,१९५.०० |
| ०५ | मे. जाधव इलेक्ट्रिकल्स, कोपरगांव | २,५७,६९५.०० |
| ०६ | मे.रामराज्य इंजिनिअर्स, नासिक | २,९६,४२३.०० |
| ०७ | मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नासिक | २,७२,६४३.०० |
| ०८ | मे.देवांग इलेक्ट्रिकल्स, नासिक | २,७२,३०१.०० |
| ०९ | मे.प्रथमेश इलेक्ट्रोटेक सर्व्हिसेस,नासिक | २,६१,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन,सुपरस्पेशालिटी हॉस्पीटल दसरा उत्सवात सुरु करावयाचे असल्याने व त्यावेळी डॉक्टर निवासस्थाने तसेच फार्मसी (औषधे ) विभाग व कॅन्टीने चालू असणे आवश्यक आहे यामूळे वेळेची दिरंगाई टाळण्यासाठी तातडीने वायरिंगचे काम सुरु करण्याची गरज आहे म्हणून मे.जाधव इलेक्ट्रीकल्स, कोपरगांव यांचे निम्नतम दर स्वीकारुन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा असें ठरलें.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११. समाधी मंदिरात नंदी हॉल व गाभारा यामध्ये असलेल्या हॉलमध्ये फ्लोअर स्टॅंडिंग टॉवर टाईप एअर कंडिशनर बसविणेबाबत.**

**निर्णय क्र. ५४३.** दिनांक ०९.०७.२००५ चे व्यवस्थापन समितीचे सभेत श्री समाधी मंदिरात नंदी हॉल व गाभारा यामध्ये असलेल्या हॉलमध्ये फ्लोअर स्टँडींग टॉवर टाईप एअरकंडीशनर बसविणे कामी कोटेशन्स मागविण्यात यावेत असे ठरले होते. त्यानुसार जा.नं.एसएसएस-विद्युत /९१०७-२००५ दिनांक २३.०८.२००५ अन्वये कोटेशन्स मागविण्यात आलेले होते. त्यानुसार प्राप्त झालेले खालीलप्रमाणे कोटेशन्स प्राप्त झालेले आहेत.

| अ.न. | कोटेशन्सधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.अल्फा, नाशिक |
| ०२ | मे.ए.एच एंटरप्रायजेस, मुंबई |
| ०३ | मे.ऑरचिड कुलींग अॅण्ड क्लिनिंग प्रा.लि. नाशिक |
| ०४. | मे.गारवा एंटरप्रायजेस, नाशिक |

उपरोक्त प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडणेत आले असता कोटेशन्सधारकांनी खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.

| अ.न. | कोटेशन्सधारकाचे नांव | कोटेशन्समध्ये देऊ केलेले दर |
|---|---|---|
| ०१ | मे.अल्फा, नाशिक | ५,७५,४५५.६८ (कॅरीअर कंपनी) |
| ०२ | मे.ए.एच एंटरप्रायजेस, मुंबई | ३,९६,०००.०० (ब्लू स्टार कंपनी ) |
| ०३ | मे.ऑरचिड कुलींग अॅण्ड क्लिनिंग प्रा.लि. नाशिक | ५,५१,१००.०० (एल.जी. कंपनी ) |
| ०४. | मे.गारवा एंटरप्रायजेस, नाशिक | ३,७७,२४७.०० (ब्लू स्टार कंपनी ) |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त तक्त्यातील अ.नं.०४ मे.गारवा एंटरप्रायजेस, नाशिक यांचे निम्नतम दर मान्य करण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असें ठरलें.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२. अॅलम (तुरटी) खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र. ५४४.** मे.एस.व्ही.एस केमिकल्स कार्पोरेशन पुणे यांना त्यांचे कोटेशन दराप्रमाणे व दिनांक २९/०९/२००५ चे समक्ष चर्चा/वाटाघाटीनुसार ३० टना फेरिक अॅलम (तुरटी) पुरविणे बाबत ऑर्डर देण्यात आलेली होती. त्याप्रमाणे त्यांनी आजपर्यंत मालाचा पुरवठा केला आहे. ३० टनापैकी ३० टना अॅलम आपण माहे. ऑगस्ट पर्यंत मागविलेला आहे. त्यापैकी आपलेकडे आता फक्त १० टन अॅलम शिल्लक आहे. तो माहे सप्टेंबर व ऑक्टोबर मध्ये वापरावा लागणार आहे. ३० टन अॅलमची दिलेली उपरोक्त ऑर्डर ही माहे जानेवारी २००६ पर्यंत देण्यात आलेली होती. परंतू पावसाळा सिझन असल्याने कॅनॉलला येणारे पाणी हे जादा प्रमाणात गढूळ आल्याने पाणी स्वच्छ करण्याचे दक्षतेसाठी अॅलमचे प्रमाण वाढवावे लागले. त्यामुळे अॅलम मागणीपेक्षा जास्त लागणार आहे. मार्च २००६ अखेर पर्यंत २० टन आणखी अॅलम मागवावा लागेल.

तरी याबाबत पुर्वीचेच पुरवठादार में.एस.व्ही.एस केमिकल्स कार्पोरेशा पुणे यांना मंजुर दराप्रमाणे पुढील ऑर्डर देणेस व त्यासाठी येणारे मंजुर दराप्रमाणे रूपये २,६८१/- प्रतीटन प्रमाणे २० टन अॅलमकरीता एकुण रूपये ५३,६२०/- चे खर्चास व अॅलम खरेदीस मंजुरी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- पाणीपुरवठा विभागप्रमुख/अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३. लेखापरिक्षण कामकाजासाठी सक्षम संस्थांची नियुक्ती करणेबाबत.**

**निर्णय क्र. ५४५.** मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१७ एप्रिल, २००५ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.१४३ अन्वये, संस्थानच्या आर्थिक कार्यपध्दती व लेख्यांचे अंतर्गत लेखापरिक्षण अशा एकूणच कामकाजासाठी प्रशासनाअंतर्गत पुरेशा मनुष्यबळाअभावी सक्षम संस्थेची नियुक्ती होणे आवश्यक असल्याने, मा.सदस्य श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांचे मार्गदर्शनानुसार अशा सक्षम संस्थेची नेमणूक तातडीने करण्यात यावी, असे ठरले होते. सध्या संस्थानअंतर्गत एक स्वतंत्र कार्यगट स्थापन करण्यात आलेला असून, त्याचेमार्फत सादील व चल मालमत्ता पडताळणीचे कामकाज करण्यात येत आहे. परंतु संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक मे.नंदू रेडीज अॅण्ड कंपनी, मुंबई यांचेशी गेली तीन वर्षात वेळोवेळी झालेल्या चर्चेदरम्यान, त्यांनी सदरील कामकाजाचे महत्त्व पटवून देऊन, या कामकाजासाठी सध्या अंतर्गत लेखापरिक्षण विभागात उपलब्ध असलेले मनुष्यबळ हे खूपच कमी असून, त्याखेरीज संस्थानमध्ये उपलब्ध असलेल्या मनुष्यबळापैकी आणखी काही अनुभवी व तज्ञ मनूष्यबळ उपलब्ध करुन देऊन, सदरील कामकाज होणे गरजेचे आहे, अशा सूचना केलेल्या आहेत. मात्र, त्यासाठी आवश्यक कर्मचा-यांची नियुक्ती होणे वा उपरोक्तप्रमाणे बाहेरील संस्थेकडून काम करवून घेणे असे दोन पर्याय आहेत.

त्या अनुषंगाने अंतर्गत लेखापरिक्षणासाठी सक्षम संस्थेची नियुक्ती करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९ जुलै, २००५ सभेपुढे ठेवण्यात आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन पुढीलप्रमाणे निर्णय क्र.२५२ घेण्यात आलेला आहे. "श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेकरीता

नेमावयाच्या अंतर्गत लेखापरिक्षकासाठी मा.विश्वस्तांनी त्यांना माहित असलेले नांव मा.कार्यकारी अधिकारी यांना कळवावे, त्यांचेकडून कोटेशन्स मागवून अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले."

त्यास अनुसरुन आज अखेर ज्या संस्थेचे अर्ज प्राप्त झालेले आहेत, त्यांचा तपशिल पुढीलप्रमाणे:-

| अ.नं. | संस्थेचे नांव | अर्जाची तारीख | शिफारस केलेल्या मा.विश्वस्ताचे नांव | मानधनसाठी कळविलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. मोहन देशमुख अॅण्ड कं. चार्टर्ड अकौंटंट, पुणे | ०२ जून, २००५ | मा.श्री.राधाकृष्ण विखे पाटील | रु.६०,०००/- मात्र प्रतिमहा, त्याशिवाय त्यांचा होणारा प्रत्यक्ष खर्च व या सर्वावरील टॅक्स |
| ०२. | श्री.शरद एस. गायकवाड अॅण्ड कं., चार्टर्ड अकौंटंट, मुंबई | -- | -- | -- |
| ०३. | मे.शास्त्री पुरोहित अॅण्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकौंटंट, पुणे | १६ जुलै, २००५ | मा.अध्यक्ष साहेब | संस्थाननियमानुसार |
| ०४. | श्री.ए.जी.लोंगाणी, चार्टर्ड अकौंटंट, कोपरगांव | १४ जुलै, २००५ | ०१. मा.डॉ.एकनाथ बी. गोंदकर<br>०२. मा.श्री.अशोक बी. खांबेकर | एकत्रित दरमहा रु.५०,०००/- (सर्व्हिस टॅक्स व इतर अंतर्भूत) मानधनासाठी वाटा-घाटीस तयारी आहे. |
| ०५. | श्री.पी.आर.भंडारी अॅण्ड असोसिएट्स, कोपरगांव | १८ जुलै, २००५ | मा.श्री.अशोक बी. खांबेकर | रुपये ३५,०००/- दरमहा |

उपरोक्तप्रमाणे एकूण पाच संस्थेचे अर्ज प्राप्त झालेले असून, अ.नं.०३ या संस्थेच्या प्रतिनिधींनी दि.२१ रोजी शिरडी येथे भेट देऊन, विशेषत: रुग्णालय विभागाकडील चालणा-या दैनंदिन कामकाजाची माहिती घेतली आहे. मा.अध्यक्ष साहेब यांचे निर्देशान्वये दोन्ही रुग्णालयांची लेखा व आर्थिक कार्यपध्दती अधिक कार्यक्षम व निकोप होण्याच्या दृष्टीने सविस्तर अहवाल तयार करण्याची जबाबदारी त्यांचेवर सोपविण्यात आली आहे.

उपरोक्त सर्व संस्थांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे बोलावून त्यांचेशी कामकाजा-संबंधी कार्यकक्षा ठरविणे आवश्यक आहे. तसेच त्या कार्यकक्षेअंतर्गत त्यांचे कामाचे स्वरुप- घ्संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षण करुन तृटींची पुर्तता करण्यासाठी/निकोप सुरक्षित व कार्यक्षम कार्यपध्दती तयार करणे आणि प्रशासनाच्या व संबंधित विभागाच्या सहकार्याने ती कार्यपध्दती राबविण्यास, तसेच संस्थानच्या विविध वैधानिक पूर्तता (वैधानिक लेखापरिक्षकाच्या पूर्तता अहवालासह) करण्यास सक्रिय सहाय्य करणे ङ अशा स्वरुपाचे असावे, असे नम्र मत आहे.

तरी उपरोक्त संस्थांपैकी योग्य त्या संस्थेची अंतर्गत लेखापरिक्षणासाठी नियुक्ती होणेस, तसेच त्यांचा कालावधी, मानधन व कार्यकक्षेविषयी निर्णय होणेसाठी, मा.कार्यकारी अधिकारी यांनी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६ ऑगष्ट, २००५ रोजीचे सभेसमोर प्रस्ताव सादर केला होता.

त्या अनूषंगाने उपरोक्त संस्थेच्या प्रतिनिधींना मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी उपस्थित राहणेकामी दि.०४ ऑगष्ट, २००५ रोजी दूरध्वनीव्दारे कळविण्यात आले होते. परंतु, तद्नंतरही ०२ संस्थेचे अर्ज प्राप्त झाले असून, सभेच्या ठिकाणी आणखीही एकूण ०४ संस्थेचे नांवे मा.विश्वस्तांकडून सुचविण्यात आले आहेत. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :-

| अ.नं | संस्थेचे नांव | शिफारस केलेल्या मा.विश्वस्ताचे नांव | शेरा |
|---|---|---|---|
| ०१. | प्रा.मुकुंद घैसास, चार्टर्ड अकौंटंट, अ.नगर | मा.श्री.राधाकृष्ण विखे पाटील | दि.०१ ऑगष्ट, ०५ रोजी अर्ज प्राप्त |
| ०२. | मे.बी.जी.गायकवाड अॅण्ड कंपनी, अहमदनगर | मा.श्री.सुरेश वाबळे | दि.०५ऑगष्ट, ०५ रोजी अर्ज प्राप्त |
| ०३. | मे.गिरिश घैसास अॅण्ड कं., अहमदनगर | मा.कार्यकारी अधिकारी | सभेच्या ठिकाणी |
| ०४. | मे.अनिल कोल्हे, नाशिक | मा.श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे | सभेच्या ठिकाणी |
| ०५. | मे.बॉटलीबॉय अॅण्ड असोसिएट्स, (ए.एन.वाय.) | ०१. मा.श्रीमती लोहीया मॅडम<br>०२. मा.श्री.शैलेश कुटे | सभेच्या ठिकाणी |
| ०६. | मे.हरिभक्त अॅण्ड कंपनी | ०१. मा.श्रीमती लोहीया मॅडम<br>०२. मा.श्री.शैलेश कुटे | सभेच्या ठिकाणी |

उपरोक्त एकूण ११ संस्थांपैकी पुढील ०७ संस्थेचे प्रतिनिधी मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०६ ऑगष्ट, २००५ रोजीच्या सभेसमोर चर्चा/वाटाघाटीसाठी उपस्थित होते.

| अ.नं. | संस्थेचे नाव |
|---|---|
| ०१ | श्री.मोहन देशमुख अॅण्ड कंपनी, पुणे |
| ०२ | श्री.शरद एस.गायकवाड अॅण्ड कंपनी, मुंबई |
| ०३ | मे.शास्त्री पुरोहित अॅण्ड असोसिएट्स, पुणे |
| ०४ | श्री.ए.जी.लोंगाणी, कोपरगांव |
| ०५ | श्री.पी.आर.भंडारी अॅण्ड असोसिएट्स, कोपरगांव |
| ०६ | मे.बी.जी.गायकवाड अॅण्ड कंपनी, अहमदनगर |
| ०७ | मे.गिरीश घैसास अॅण्ड कंपनी, अहमदनगर |

उपस्थित सर्व संस्थाच्या प्रतिनिधींशी काजकाजाबाबत मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर सविस्तर चर्चा करण्यात आली. संबंधित संस्थेच्या प्रतिनिधींनी सुचित केलेले मुद्दे, संस्थानच्या लेखापरिक्षणाच्या कामाचा व्याप, याबाबत सविस्तर चर्चा होऊन, एका संस्थेकडून सदरचे काम होऊ शकणार नाही, या मुद्दयांवर सर्वांचेच एकमत झाले. सदरचे कामकाज अधिक प्रभावी होण्याच्यादृष्टीने, चार अंतर्गत लेखापरिक्षकांकडून **(Internal Auditor)** हे काम करवून घेण्याचे ठरविण्यात आले. त्या व्यतिरिक्त, वैधानिक लेखापरिक्षक **(Statutory Auditor)** व व्यवस्थापकीय लेखापरिक्षक **(Management Auditor)** यांची नियुक्ती स्वतंत्रपणे करावी, असे ठरले.

या संस्थाना, गटप्रमुख-वरिष्ठ लेखापरिक्षक यांचेकरीता रु.४००/- प्रतिदिन व कनिष्ठ लेखापरिक्षक (आर्टिकलशीप करणारे प्रशिक्षणार्थी) यांचेकरीता रु.२००/- प्रतिदिन, या दराने मानधन देण्यात यावे. जाणे-येणेकामी प्रत्यक्ष खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात यावी. तसेच लेखापरिक्षणाच्या कालावधीत त्यांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था, संस्थान निवासस्थान व प्रसादालयात मोफत करण्यात यावी, आणि प्रत्येक कामकाजासाठी मनुष्यदिन (Mandays) निश्चित करुन देण्यात यावेत, असे नम्र मत आहे.

सदर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार सन २००५-०६ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणासाठी पुढीलप्रमाणे नेमणूका करणेबाबत सुचविण्यात आले आहे.

**अ. वैधानिक लेखापरिक्षक (Statutory Auditor)**

मे.बॉटलीबॉय ॲण्ड असोसिएट्स (ए.एन.वाय.)

मे.बॉटलीबॉय ॲण्ड असोसिएट्स, यांनी शिर्डी येथे येऊन, प्रत्यक्ष कामकाजाची पाहणी करुन घ्यावी. त्यानंतर त्यांचे नियुक्तीबाबतचा पुढील निर्णय घेण्यात येईल.

**ब. व्यवस्थापकीय लेखापरिक्षक (Management Auditor)**

मे.मोहन देशमुख ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंट, पुणे

(सभा कामकाज, सामान्य प्रशासन,सर्वसाधारण नियोजनविषयक बाबी, नियोजीत प्रकल्प वगैरे)

**क. अंतर्गत लेखापरिक्षक (Internal Auditor)**

१. मे.शास्त्री पुरोहित ॲण्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकौंटंट, पुणे
२. श्री.ए.जी.लोंगाणी, कोपरगांव
३. श्री.शरद एस.गायकवाड ॲण्ड कंपनी, मुंबई
४. मे.अनिल कोल्हे, नाशिक

कामाच्या व्यापानुसार अंतर्गत लेखापरिक्षणाच्या कामकाजाची विभागणी पुढीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे:

| अ.नं. | अंतर्गत लेखापरिक्षकाचे नांव | विभागाचे नांव |
|---|---|---|
| ०१. | श्री.ए.जी.लोंगाणी, कोपरगांव | १. बांधकाम २. विद्युत विभाग<br>३. आस्थापना विभाग ४. पाणी पुरवठा<br>५. शैक्षणिक संकुल ६. माहिती तंत्रज्ञान |
| ०२. | मे.शास्त्री पुरोहित ॲण्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकौंटंट, पुणे | १. रुग्णालय विभाग<br>२. लेखाशाखा |
| ०३. | श्री.शरद एस.गायकवाड ॲण्ड कंपनी, मुंबई | १. नवीन भक्त निवास (५०० रुम्स)<br>२. चौकशी विभाग ३. धर्मशाळा (२०० रुम्स)<br>४. वाहन विभाग ५. स्वच्छता विभाग<br>६. कॅन्टीन विभाग ७. कामगार व विधी विभाग |
| ०४. | मे.अनिल कोल्हे, नाशिक | १. प्रसादालय विभाग २. खरेदी विभाग ३. भांडार विभाग<br>४. ध्वनिक्षेपण ५. रेकॉर्ड विभाग<br>६. मुंबई कार्यालय |
| ०५. | मे.गिरीश घैसास ॲण्ड कंपनी, अहमदनगर | १. मंदीर विभाग २. प्रकाशने,<br>३. बगीचा ४. संरक्षण, |

उपरोक्तप्रमाणे नियुक्त्या केल्यास अ.न.०१ ते ०४ यांचेकडे वर उल्लेख केल्याप्रमाणे विभागाच्या अंतर्गत लेखापरिक्षणाचे कामकाज सोपविता येईल. तसेच अ.नं.०५ यांची नियुक्ती केल्यास, प्रा.मुकुंद घैसास, अहमदनगर, सदस्य, व्दितीय महाराष्ट्र राज्य वित्त अयोग यांच्या सेवेंचाही संस्थानला (निधींचा विनियोग, वित्तीय नियोजन व विकास प्रकल्पांचा आराखडा इत्यादींसाठी सल्लागार म्हणून) उपयोग करुन घेता येईल. तसेच उर्वरीत चार विभाग हे अ.नं.०५ यांचेकडे देता येतील.

अंतर्गत लेखापरिक्षणासाठी उपरोक्तप्रमाणे कामाची विभागणी करण्यात आली असून, प्रत्येक लेखापरिक्षकांनी लेखापरिक्षणाबाबतचा त्रैमासिक अहवाल थेट कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करावा. अहवालातील त्रुटीबाबतची पूर्तता करुन घेण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्रशासकीय अधिकारी यांची राहील. प्रशासकीय अधिकारी यांनी लेखापरिक्षण अहवालातील त्रुटींची पूर्तता संबंधित खातेप्रमुखांकडून करुन घ्यावी व तसा पूर्तता अहवाल विनाविलंब कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करावा. त्यानंतर सदरचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीस सादर करण्यात येईल.

उपरोक्तप्रमाणे लेखापरिक्षणाच्या कामासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या नियुक्त्यांनुसार कार्यादेश देणेबाबत, कामाच्या विभागणीबाबत, देण्यात येणा-या मानधनाबाबत व ठरविण्यात आलेल्या कार्यपध्दतीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

आयत्या वेळेचा
विषय नं.१४. **श्री.भागचंद मुरलीधर ठोंबळ, कांगोणी, श्री.बाळासाहेब सोपानराव रोहम,संवत्सर, श्री.दामोदर श्रीधर जोशी,पुणे, श्री.नेजकर महमंदगौस रसुल, इचलकंरजी, श्री.मधुकर दिनकरराव जाधव, कागल, सौ.सावंत मंगल दिलीप, दहिगाव व श्री.शशिकांत राजाराम कदम,नाशिक यांचे वैद्यकीय आर्थिक अनुदान मिळणेबाबतचे अर्ज.**

**निर्णय क्र. ५४६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.१५. परिचारीका प्रशिक्षणार्थीना प्रात्यक्षिक अनुभव देणेबाबत.**

**निर्णय क्र. ५४७.** मा.अध्यक्ष,श्री विवेकानंद नर्सिंग होम ट्रस्टचे, श्री विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग, श्री शिवाजीनगर (राहूरी फॅक्टरी) ता.राहूरी, जिल्हा-अहमनगर यांनी त्यांचे दिनांक २६.८.२००५ रोजी पत्राने त्यांनी त्यांचे संस्थेत प्रशिक्षण घेत असलेल्या परिचारीका प्रशिक्षणार्थ्यांना श्रीसाईनाथ रुग्णालयात अनुभवास परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रशिक्षणार्थी सोबत या संस्थेच्या पाठ्यनिदेशिका मार्गदर्शनाकरिता पाठविणार आहेत. या संस्थेचे प्रशिक्षणार्थी सकाळी ८.०० ते दुपारी १२.०० वाजपर्यंत संस्थानचे रुग्णालयात पाठविणार आहेत. तसेच प्रशिक्षणार्थींची ने-आण करण्याची व्यवस्था त्यांचे संस्थेमार्फत केली जाणार आहे.

उपरोक्त संस्थेच्या प्रशिक्षार्थ्यांना संस्थानचे रुग्णालयात नर्सिंगचे अनुभवाची परवानगी दिल्यास ते शिक्षणाबरोबर व्यवसायिक कौशल्य प्राप्त करु शकतील आणि त्यातुन रुग्ण तसेच सामाजिक सेवेचा अंगीकार करतील. श्रीसाईनाथ रुग्णालयात दैनंदिन येणाऱ्या रुग्णांची संख्या ८०० ते १००० पर्यंत आहे व अंतर्रुग्णांची संख्या २०० चे आसपास असते. याकरिता सदर प्रशिक्षणार्थ्यांचा आपल्या रुग्णालयात येणाऱ्या रुग्ण सेवेसाठी उपयोग करुन घेता येईल. सकाळी ८.०० ते दुपारी १२.०० या वेळेत प्रत्येक वॉर्डमध्ये विभागुन देता येतील. त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

आयत्या वेळेचा
**विषय नं.१६. नवीन नियोजित रुग्णालयाच्या कर्मचारी निवासस्थान योजनेबाबत.**

**निर्णय क्र. ५४८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१७. तातडीची औषधे खरेदीस मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र. ५४९.** श्रीसाईनाथ रुग्णालयाचे दैनंदिन वापरासाठी सन २००५-०६ या वर्षाकरीता वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच थेट उत्पादक कंपन्यांकडून कोटेशन/दरपत्रके मागविण्यात आली होती. सदरील कोटेशन्समधील निम्नतम दरानुसार वार्षिक औषधे पुरवठ्याचे आदेश दिनांक १.८.२००५ रोजी देण्यात आलेले आहेत.

सर्व पुरवठाधारकांना मालाचा पुरवठा करणेबाबत दूरध्वनीवरुन तगादा करण्यात आलेला आहे. तथापि, त्यातील बहूतेक पुरवठाधारकांनी मुंबई झालेल्या अतिवृष्टीमुळे बऱ्याचशा कंपन्यांची गोडाऊन पाण्यात बुडाल्याने मालाचा पुरवठा करण्यास किमान १ महिन्याचा कालावधी लागेल असे सांगितले आहे. त्यामुळे रुग्णालयात सोबत **परिशिष्ट "अ" मध्ये** दर्शविलेल्या यादीतील औषधांचा तुटवडा भासत असून सदर यादीतील औषधे बाजारभावाने स्थानिक बाजारातून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,०१,६२८.०० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही - वैद्यकीय अधिक्षीका, रुग्णालय/वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

आयत्या वेळेचा
**विषय नं.१८. सी.टी.स्कॅन मशिनसाठी लागणारी इंजेक्शन खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.५५०.** श्री साईनाथ रुग्णालयामध्ये नुकतेच नवीन 64-Slice सि.टी.स्कॅन मशिन खरेदी करुन बसवून कार्यान्वीत करण्यात आलेले आहे.

सदर मशिन रुग्णांचे सि.टी.स्कॅन करणेपूर्वी रुग्णांना इजेक्शन द्यावी लागतात. यापूर्वी संस्थान रुग्णालयात सि.टी. स्कॅन मशिन नसल्याने सदरचे इंजेक्शन रुग्णालयात ठेवण्यात येत नव्हती. रेडिओलॉजी विभागाने दिनांक ०३.०८.२००५ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे इंजेक्शनची मागणी केलेली आहे.

| अ.न | इंजेक्शनचे नांव | मागणी | अंदाजे रक्कम प्रति नग | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 01 | Inj. Iomeran 400 mg. | 200 | 865.00 | 1,73,000.00 |
| 02 | inj. Iomeran 350mg. | 50 | 772.00 | 38,600.00 |
| 03 | Oral Contrast Castrovideo | 100 | 75.00 | 7,500.00 |
| | | | Total Rs. | 2,19,100.00 |

वरीलप्रमाणे इजेक्शन ही खालील अधिकृत विक्रेते यांचेकडून कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,१९,१००.०० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | नांव |
|---|---|
| ०१ | मे.अनिता मेडिकल सिस्टम, मुंबई |
| ०२ | मे.युनिव्हर्सल ट्रेडर्स,पुणे |
| ०३ | मे.निर्मल एजन्सी,अहमदनगर |
| ०४ | मे.चोक्सी ब्रदर्स,मुंबई |
| ०५ | मे.लाईफ लाईन सर्जीकल, कोपरगांव |
| ०६ | मे.रजत सेल्स कार्पोरेशन,मुंबई |

(कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय/वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९. संधीवात आजारावरील शिबीराचे खर्चाबाबत**

**निर्णय क्र. ५५१.** व्यवस्थापन समितीचे दिनांक १३.०५.२००५ चे सभेत ठरलेप्रमाणे दिनांक २८.०८.२००५ रोजी संधीवात शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरात एकूण १५९ रुग्णांनी लाभ घेतलेला आहे. या सर्व रुग्णांना संस्थानमार्फत मोफत औषधे पुरविण्यात आलेली आहेत.

सदर शिबीरासाठी रुपये २५०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. शिबीरासाठी रुग्णालयातील नित्याच्या वाटपाची काही औषधे रुग्णांना दिली जातात. तसेच जी औषधे रुग्णालयात उपलब्ध नसतील त्यासाठी रुपये २५०००/- चे खर्चास दिनांक १३.०५.२००५ चे सभेत मान्यता देण्यात आलेली आहे. परंतू नित्याच्या वापराची औषधे रुग्णालयात उपलब्ध नसल्याने या शिबीरासाठी आवश्यक असणारी रुपये ५२,७५३.०० मात्र रकमेची आवश्यक असलेली औषधे तातडीने खरेदी करावी लागली. मंजूर रकमेपेक्षा रुपये २७,७५३.०० इतका जादा खर्च आला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- वैद्यकीय अधिक्षीका, रुग्णालये)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०. ऑक्सीजन पाईपलाईनचे वाढीव मशिनरीबाबत**

**निर्णय क्र. ५५२.** श्री साईनाथ रुग्णालयात करावयाचे नविन ऑक्सीजन पाईप लाईन करीता व्यवस्थापन मंडळ सभा दि.१३.०३.२००५ चे सभेतील निर्णय क्र.९५(सी) अन्वये मे.अलमेड इक्वीपमेंट, मुंबई यांना इकडील पत्र क्र.२८३४ दि.१५.०३.२००५ अन्वये रु.१३,९२,४१७/- इतक्या रुपयाचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार मे.अलमेड इक्वीपमेंट, मुंबई यांनी रुग्णालयात प्रत्यक्ष काम चालू केलेले असून ते अंतिम टप्प्यात आहे.

सदर पाईप लाईनची जाहिरात देवून निविदा मागवते वेळी सध्याचे धर्मशाळा येथील रुग्णालयात असलेली पाईप लाईन शिफ्ट होणार असल्याचे गृहीत धरुन सदर सिस्टीम मधील काही मशिनरी / उपकरणे (उदा. Air Compressor, Control Pannel, Vaccum Pump इत्यादी) निविदा मागवतेवेळी मागणी केलेली नव्हती.

परंतु धर्मशाळा इमारतीतील रुग्णालय हे आता तेथेच राहणार असल्याने तेथे सुध्दा ऑक्सीजन पाईप लाईन सिस्टीमची आवश्यकता लागणार आहे. त्यामुळे सदर सिस्टम मधील मशिनरी/उपकरणे नविन सिस्टीमला वापरता येणार नाही.

मे.अलमेड इक्वीपमेंट, मुंबई यांनी त्यांचे दि.०२.०९.२००५ चे पत्रान्वये सदर उपकरणे / मशिनरीची कोटेशन दिलेले असून त्यासाठी रु.४,५२,८३०/- चे कोटेशन दिलेले आहे. सदरची मशिनरी / उपकरणे असल्याशिवाय ऑक्सिजन सिस्टीम कार्यान्वीत होवू शकणार नाही. तरी सदरची उपकरणे खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ४,५२,८३०/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१. सुपर स्पेशालिटी रुग्णालयाकरिता मशिनरी खरेदीबाबत.**

**निर्णय क्र. ५५३.** नवीन सुपरस्पेशालिटी रुग्णालयाकरीता लागणाऱ्या मोठ्या मशिनरी करीता मा.व्यवस्थापन समितीच्या मंजूरीनुसार पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार थोड्याच दिवसात सदर मशिनरीचा पुरवठा होणार असून इतर अनुषंगिक हॉस्पिटल फर्निचर, कार्यालयीन फर्निचर, उपकरणे इत्यादी खरेदीबाबत कार्यवाही चालू आहे.

मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी वरील उपकरणे / मशिनरी /फर्निचर व्यतिरिक्त खालील मशिनरी खरेदीबाबत सूचना दिल्या असून सदर मशिनरी /उपकरणांची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे-

| अ.नं | मशिनरीचे नांव | मागणी | अंदाजे किंमत रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | Syringe Pump | 20 | 10,00,000.00 |
| ०२ | Laproscope | 01 | 10,00,000.00 |
| ०३ | Cardiac Operation Table | 01 | 10,00,000.00 |
| ०४ | Air Beds | 10 | 20,000.00 |
| ०५ | Water Beds | 10 | 20,000.00 |
| ०६ | Portable oxygen cylinders 1.5 cubic | 25 | 1,00,000.00 |
| ०७ | Boyles oxygen cylinder 1 cubic | 25 | 75,000.00 |
| ०८ | Boyles Nitrus cylinder 1 cubic | 25 | 75,000.00 |
| | | Total Amount | 32,90,000 |

वरील प्रमाणे मशिनरी /उपकरणे खरेदीकामी अंदाजे रक्कम रुपये ३२,९०,०००/- खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त अ.नं.०१ ते ०३ करीता प्रत्येकी रुपये १० लाखपर्यन्त खरेदी असल्यामूळे त्या आयटेमची खरेदी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन खरेदी करण्यात यावी, उर्वरित ०४ ते ०८ करीता कोटेशन्स मागवून खरेदी करण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही - वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२. आधार शिक्षण व ग्रामीण विकास मंडळ, नांदूरी दुमला, ता.संगमनेर संचलित, साई सेवा निवासी मतिमंद मुला-मुलींची शाळा, शिर्डी यांचे विद्यार्थ्यांना मोफत भोजन देणेबाबत.**

**निर्णय क्र. ५५४.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३. मे.साई गोपी असोसिएटस व मे.साई गोपी रिसोर्टस प्रा.लि.,यांची जमीन गट नं.१०८/१/१ ते १०८/१/४ क्षेत्र ३-७८ आर १७ चौ.मी.भू-संपादनाने घेणे व आस्थापना चार्जेस देणेबाबत.**

**निर्णय क्र. ५५५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२४. श्रीसाई संस्थान नोकरांची सहकारी पतपेढी लि.,शिर्डी यांचेमार्फत चालविण्यात येणारे स्वागत कक्ष येथील क्लोकरुमला मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र. ५५६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२५. गुरुकृपा सेल्स, कोपरगाव यांना भक्तनिवास येथील स्टॉल, साईगंगाची विक्री करणेकामी चालविण्यास देणेबाबत.**

**निर्णय क्र. ५५७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२६. राहाता येथील न्यायालयास मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती यांचे भेटीबाबत.**

**निर्णय क्र. ५५८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२७. सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय मानोरी, अध्यक्ष, गणेशखिंड देवस्थान ट्रस्ट,वांगी, सरंपच ग्रामपंचायत कार्यालय नांदुर्खी यांना देण्यात आलेल्या शिध्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबत**

**निर्णय क्र. ५५९.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२८. श्री पुण्यतिथी आराधना विधी- प्रसाद भोजन**

**निर्णय क्र. ५६०.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२९. पादुका दर्शन सोहळा भक्त संमेलन हैद्राबाद बाबत.**

**निर्णय क्र. ५६१.** हैद्राबाद येथे श्रींचे पादुका दर्शन सोहळा व भक्त संमेलनाचे आयोजनकामी दि.०५/०९/२००५ रोजी सायंकाळी ५.०० वा. हैद्राबाद येथील दिलसुखनगर येथील मंदिरात सभेचे आयोजन केले होते. त्यानुसार श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत मा.कार्यकारी अधिकारी श्री भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सर्वश्री शैलेश श्रीहरी कुटे, अशोक भिमाशंकर खांबेकर व डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, विश्वस्त प्रतिनिधी म्हणून हजर होते.

उपरोक्त दिनी हैद्राबाद येथील विविध ठिकाणच्या जवळ जवळ ४४-४५ मंदिराचे चेअरमन, व्हाईस चेअरमन व पदाधिकारी मिळून साधारणपणे ९० -१०० जण हजर होते.

सभा ठिक ५.३० ला सुरु झाली. प्रथमतः श्री नागेश्वर शर्मा , खजिनदार, यांनी मान्यवरांची ओळख जमलेल्या पदाधिका-यांशी करुन दिली, नंतर सदरची सभा कश्यासाठी आयोजित केलेली आहे, त्याबाबतची सविस्तर माहिती दिली. तसेच नंतर श्री पांडुरंग राव, यांनी श्रींचे पादुका दर्शन सोहळा

हैद्राबाद येथे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत आयोजित करत असलेबद्दल हैद्राबाद वासियांचे भाग्य आहे, त्यासाठी संस्थानचे धन्यवाद मानले. तसेच त्यांनी जमलेल्यांना स्वयंस्फुर्तीने कोणकोण सदरच्या कार्यक्रमात सहभागी होणार याबाबत आव्हान केले असता जवळ जवळ सर्वांनी आम्ही वेगवेगळ्या प्रकारे काहीना काही सहकार्य करु असे सांगितले.

सदरच्या कार्यक्रमास इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस व मेयर यांची पुर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार तेथील कमिटी परवानगी घेणार असल्याचे सांगण्यात आलेले आहे.

सदरच्या सभेत खालीलप्रमाणे निर्णय झाले -

०१) कार्यक्रमाचे ठिकाण - एन.टी.आर.ग्राऊंड - ३ दिवसाचे भाडे संस्थानमार्फत अदा करावयाचे आहे.

०२) कार्यक्रमाची तारिख - शनिवार, दि.२६/११/२००५ ते सोमवार, दि.२८/११/२००५ अखेर.

०३) मंडप - यात ३ प्रकारचे स्टेज असतील - त्यात एकेठिकाणी पादुका दर्शन सोहळा असेल, दुस-याठिकाणी अखंड साईनाम, तिस-याठिकाणी कार्यक्रम - प्रथमतः मंडप किती बाय कितीचा घालावयाचा, दर स्क्वेअर फुट प्रमाणे - बारकेटींग सिस्टिम, संस्थान मार्फत स्टॉल, चप्पल स्टँड, स्वागतकक्ष, कार्यालय, देणगी कार्यालय, सिक्युरिटी ऑफिस इ.चे नियोजन करावयाचे आहे. स्थानिक मंडपधारकाकडून कोटेशन मागवून त्यात ध्वनीक्षेपण, विजपुरवठा, खुर्च्या, ताडपत्र्या इ.चा समावेश करावयाचा.

०४) सदर पादुका सोहळ्याचा प्रसार करणेकामी बॅनर्स, बोर्डस्, जाहिराती, निमंत्रण पत्रिका, स्थानिक वर्तमानपत्रे, केबलधारक इ. बाबतीत स्थानिक लोकांचे सहकार्य घेऊन नेहमीप्रमाणे व्यवस्था करावयाची आहे.

०५) प्रसाद म्हणून १-१ लाडू पाकीट व उदीप्रसाद संस्थानमार्फत द्यावयाचा असून त्यासाठी स्थानिक मिठाईवाल्यांकडून बनवून घेणेचे आहेत.

०६) स्थानिक व्हॉलींटीयर्स - साधारणपणे ३०० - २ वेळचे जेवण. - व्हॉलिंटीएर्सचे २ शिफ्टस्

०७) इंटर्नल सिक्युरिटी - साधारणपणे ५० गार्डस् दिवसाला - त्यात १० गार्डस् पादुकाचे ठिकाणी - संस्थानची सिक्युरिटी गार्डस् सह. व इतर ठिकाणी ४०. (सिक्युरिटीचे ३ शिफ्टस्)

०८) व्हॉलिंटीएर्सना बॅचेस, मान्यवरांना बॅचेस तयार करावे लागतील.

०९) उपरोक्तकामी तेथील काही मान्यवरांची एक मुख्य कमिटी बनविणे व इतर कामांसाठी वेगवेगळी अश्या ६ -७ कमिट्या तयार करुन संबंधितांवर कामाची जबाबदारी सोपविणे, या सर्वांबरोबर संस्थानचे काही अधिकारी व पदाधिकारी त्यात समाविष्ट करुन त्यांचेबरोबरीने व मदतीने सदरचा कार्यक्रम व्यवस्थितरित्या व संस्थानवर कोणत्याही प्रकारचा आक्षेप येणार नाही अश्यादृष्टीने कामे करावयाची आहेत.

१०) यात संस्थानचेवतीने सदर कार्यक्रमासाठी कोण -कोण कश्याप्रकारचे योगदान करणार याबाबत आवाहन करावयाचे आहे व त्यानुसार सदर मदत यांच्या सौजन्याने करण्यात आलेली आहे असे जाहिर करुन त्यांचा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत सत्कार करावयाचा आहे.

तसेच हैद्राबादवासियांना आवाहन करावयाचे आहे की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) यांची दुसरी कोठेही शाखा नसुन इतर साई मंदिरांशी श्री साईबाबा संस्थानचा कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. तरी ज्यांना डोनेशन द्यावयाचे असेल तर " मा.कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) " यांचे नांवे देण्यात यावे. संस्थानमार्फत नगरसुल रेल्वे स्टेशनपासून शिरडी पर्यंत हैद्राबादवासियांना व सर्व साईभक्तांना बसेसची सेवा सुरु करण्यात आलेली आहे.

सदर बाबतीत श्री एम कृष्णकुमार, सिकंदराबाद यांचे ४-५ ई-मेल आलेले असून, त्यात दि कमिशनर व दि डायरेक्टर ऑफ स्पोर्टस्, म्युन्सीपल कार्पोरेशन, हैद्राबाद यांना एनटीआर ग्राऊड मिळणेबाबत पत्राचा मसुदा, तसेच सर्व पत्रव्यवहार श्री एस पांडुरंग राव, श्री साई सेवा समाजम, सिकंदराबाद यांचे नांवे करावा. असे कळविले आहे. तसेच सन २००४ सालात माहे डिसेंबरमध्ये आसारामजी बापू यांचे धार्मिक कार्यक्रमास सदरचे ग्राऊंड दिले होते, असे कळविलेले आहे.

तसेच ग्राऊंड परमिशनबाबत म्युन्सीपल कार्पोरेशन हैद्राबाद यांनी सुचविलेली गाईड लाईन प्रमाणे अनुकरण करा म्हणजे कोणत्याही प्रकारचा अडथळा येणार नाही, असे कळविले आहे. तसेच सदर कार्यक्रमासाठी दि.२४/११/२००५ ते दि.२९/११/२००५ अखेर ग्राऊंड मिळणेबाबत परवानगी घ्या कारण पहिले दोन दिवस म्हणजे २४/११/२००५ ते दि.२५/११/२००५ रोजी कारपेट इ.टाकणेसाठी व शेवटच्या म्हणजे दि.२९/११/२००५ रोजी सर्व सामान परत करणे व इतरकामी लागत असतात. तसेच सदर ग्राऊंडचे एका दिवसाचे भाडे रु.१०,०००/- इतके असून सहा दिवसासाठी रु.६०,०००/- इतके ग्राऊंड भाडेपोटी द्यावे लागणार असल्याचे सांगितले.

उपरोक्त कार्यक्रम हा संस्थानने आयोजित केलेला असून सर्व खर्च हा संस्थानमार्फत करण्यात येणार आहे. सदरच्या कार्यक्रमास साधारणपणे अंदाजे रु.२० ते २५ लाख पर्यंत खर्च येण्याची शक्यता असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, शनिवार, दि.२६/११/२००५ ते सोमवार, दि.२८/११/२००५ अखेर असे तीन दिवस पादूका दर्शन सोहळा हैद्राबाद येथे आयोजित करण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २५ लाख पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही - प्रशासनशाखा वशी-५/जनसंपर्क अधिकारी /अधिक्षक, मंदीर विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३०. स्वामी रामदेवजी महाराज यांचे योग साधना शिबीराबाबत.**

**निर्णय क्र. ५६२.** श्री.आर.सी.अग्रवाल, औरंगाबाद हे स्वामी रामदेवजी महाराज, हरिद्वार यांचा माहे डिसेंबर २००५ मध्ये शिर्डी येथे योगसाधना शिबीर भरवणेस तयार असून, संस्थानने दिव्य योग मंदिर ट्रस्ट, कनखल, हरिद्वार यांना खालीलप्रमाणे लेखी देणेबाबत दिनांक १७.९.२००५ चे फॅक्स पत्रान्वये कळविले आहे.

ए) निवासी योगसाधना शिबीरासाठी २००० प्रशिक्षणार्थींसाठी निवासव्यवस्था संस्थानमार्फत मोफत करण्यात येईल.

बी) प्रसादालय विभागातून सकाळी - साधा नाष्टा - Dailya , दुपारचे लंच व सायंकाळचे साधे जेवण हे संस्थानमार्फत मोफत द्यावयाचे आहे.

सी) शिबीरासाठी जास्तीत जास्त ३ एकर एवढे मोठे मैदान.

डी) शिबीरात २ सेट्स ८० KVA जनरेटर विद्युत पुरवठ्यासाठी आवश्यक.

इ) शिबीर २ वेळ भरविण्यात येईल - (०१) सकाळी ५ ते ८ व (०२) सायंकाळी ५ ते ८

एफ) शिबीरासाठी आवश्यक असणारे मंडप, बिछायत, बैठक व्यवस्था, लाऊड स्पीकर, इलेक्ट्रिक फिटींग, टी.व्ही. इ. ची व्यवस्था दिव्य योग मंदिर ट्रस्ट, हरिद्वार यांचेमार्फत करण्यात येईल.

जी) निवासी शिबीराचे देणगी तिकीटे रु.६,०००/- मात्रचे २००० लोकांसाठीची विक्री संस्थानमार्फत मुंबई, औरंगाबाद इ. ठिकाणी करावयाची असून सदरची रक्कम ही दिव्य योग मंदिर ट्रस्ट, हरिद्वार यांचेकडे जमा करावयाचा आहे.

एच) संस्थान - शिर्डी येथील लोकांसाठी मोफत पास देऊ शकते, त्यांचे बसण्याची व्यवस्था निवासी शिबीरार्थींसाठींचे मागील बाजूस करण्यात येईल असे पासेस २००० ते ३००० देऊ शकतात. उपरोक्त मोफत पासेस हे अनिवासींसाठी असेल. आम्ही अनिवासी शिबीरार्थीसाठी निवासव्यवस्था करणेचे असेल तर एका डोनेशन पासची किंमत रु.५००/- इतकी असून सदरची रक्कम दिव्य योग मंदिर ट्रस्ट, हरिद्वार यांचे नांवे जमा करणेची आहे.

आय) स्वामीजी व ४ लोकांच्या रहाण्याची व्यवस्था स्पेशल व्ही.आय.पी रुम्समध्ये करावयाची असून २ व्यक्तींचे एका बाजूचे विमानाचे भाडे संस्थानमार्फत करणेचे आहे.

जे) टी.व्ही.क्रु च्या १० माणसांची निवास व भोजन व्यवस्था संस्थानमार्फत करावयाची आहे.

के) हरिद्वारहुन येणा-या ३० जणांची भोजनाची व्यवस्था संस्थानमार्फत करावयाची असून आयुर्वेदिक औषधासाठीचे स्टॉलची व्यवस्था दिव्य योग मंदिर ट्रस्ट, हरिद्वार यांचेमार्फत करण्यात येईल.

एल) हरिद्वारहून येणा-या १० आर्युवेदिक डॉक्टरांसाठीची निवास व भोजन व्यवस्था संस्थानमार्फत करावयाची आहे.

उपरोक्तप्रमाणे जर संस्थानने मंजूरी दिली तर श्री आर.सी.अग्रवाल, औरंगाबाद हे प्रत्यक्ष येऊन साईट इ.ची पहाणी करणार आहेत.

आजचे सभेत श्री.आर.सी.अग्रवाल,औरंगाबाद हे उपस्थित होते. त्यांनी स्वामी रामदेवजी महाराज हरिद्वार यांचे शिर्डी येथे घ्यावयाचे शिबीराबाबत तसेच संस्थानने यासाठी करावयाचे नियोजन याबाबत सविस्तर माहिती दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- प्रशासन शाखा,वशी-०५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३१. शिधा सामुग्री मिळणेबाबत समस्त गांवकरी, करुले, ता.संगमनेर, जिल्हा अहमदनगर यांचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र. ५६३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३२. श्रीतुळजा भवानी मंदीर संस्थान, तुळजापुर यांना विकास कामासाठी आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र. ५६४.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३३. महाविद्यालयाचे बांधकामासाठी व श्रीसाईबाबा महाविद्यालय असे नांव देणेस आर्थिक मदत मिळणेबाबत, प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगांव, ता.खटाव, जिल्हा सातारा यांचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र. ५६५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३४. श्रीसाईलीला संपादकीय कार्यालयासाठी संगणक खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र. ५६६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३५. रुग्णवाहिका नं.एमएच१७/के-६६०१ या अपघातग्रस्त गाडीचे दुरुस्ती खर्चाबाबत.**

**निर्णय क्र. ५६७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३६. मा.विश्वस्तांना उत्सवाचे फोटो देणेबाबत.**

**निर्णय क्र. ५६८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३७. मालिकेच्या जाहिरातीसाठी मंदिर परिसरात व्हीडिओ स्क्रिन लावुन धार्मिक गीते दाखविणेबाबत.**

**निर्णय क्र. ५६९.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३८. संस्थान सेवकांना सानुग्रह अनुदान देणेबाबत.**

**निर्णय क्र. ५७०.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३९. अधिक्षक हे पदनाम व त्या पदाची वेतनश्रेणी मिळणेबाबत श्री.रामराव शेळके व इतर दोन यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र. ५७१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४०. शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रुई रस्ता ( पिंपळवाडी रस्ता ते निमगांव शिवपर्यन्त ) कॉंक्रीटीकरण करणेबाबत.**

**निर्णय क्र. ५७२.** दि. ०३/०३/२००५ रोजी मा. अध्यक्ष सो., मा. सदस्य डॉ. गोंदकर व मा. कार्यकारी अधिकारी यांनी मौजे निमगांव को-हाळे येथिल शेतीमहामंडळाकडून ताबा घेतलेला जमिनीची पहाणी केली. तसेच शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रुई रस्त्यासह इतर काही रस्त्यांची पहाणीही यावेळी करण्यात आली. त्यानुसार प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. १३/०३/२००५ चे सभेत सादर करण्यात आला होता. नि.क्र. १०८ अन्वये रुई रस्त्याचे २८.८० लक्ष खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

मा. मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी ७०० मी. लांबीचा व ६.०० मी. रुंदीचा रुई रस्ता (जुना पिंपळवाडी रस्ता ते निमगांव शिव रस्ता ) कॉक्रीटीकरण करुन मिळणेबाबत रु. ४६,१३,५४०.०० खर्चाचा सुधारीत प्रस्ताव सादर केला आहे. संस्थान आर्कीटेक्ट मे. निकम पा. श्रीरामपूर यांनी रु. ४६,१३,५४०.०० मात्रचे एस्टीमेट तपासणी करुन दिलेले आहे. म्हणजेच सदर रस्त्यासाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि. १३/०३/२००५ चे सभेतील मंजूर रक्कम रु. २८.८० लक्ष पेक्षा रु. १७,३३,५४०.०० मात्र जादा खर्च येणार आहे.

तरी नगरपंचायत हद्दीतील रुई रस्ता (जुना पिंपळवाडी रस्ता ते निमगांव शिव रस्ता) कॉंक्रीटीकरण करणेसाठी येणारे एकूण रु. ४६,१३,५४०/- मात्र चे सुधारीत खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू प्रस्तावास मान्यता देण्यात आली. तसेच श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियमातील तरतूदीनुसार शासनाची मान्यता घेण्यात यावी, असें ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४१. संस्थानतर्फे करण्यात येणाऱ्या बांधकाम प्रकल्पांचे अंदाजपत्रकांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे तांत्रीक मंजूरी घेणेबाबत.**

**निर्णय क्र. ५७३.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी ) तर्फे सध्या अनेक लहान मोठ्या स्वरुपाचे बांधकाम प्रकल्प हाती घेण्यात आलेले आहेत. त्यामध्ये रस्ते कॉंक्रीटीकरण, डांबरीकरण, इमारती बांधकाम इ. कामांचा समावेश आहे. तसेच नजीकच्या भविष्यात अनेक मोठ्या स्वरुपाचे बांधकाम प्रकल्प संस्थानतर्फे हाती घेण्याचे नियोजन आहे. अशा प्रकारे ही एक सातत्याने चालणारी प्रक्रिया असून त्यासाठी संस्थानतर्फे मोठ्या प्रमाणावर निधीचा विनियोग करण्यात येत आहे.

विद्यमान कार्यपध्दतीनुसार बांधकाम प्रकल्पांचे अंदाज पत्रके, त्यासाठी नेमणूक करण्यात आलेल्या आर्कीटेक्ट / तांत्रिक सल्लागार यांचेकडून तयार करुन घेण्यात येतात. प्रत्येक प्रकल्पासाठी बहुदा वेगवेगळ्या आर्कीटेक्टची नेमणूक करण्यात येते. त्यामुळे स्थानीक D.S.R. दरानुसार अंदाजपत्रक तयार करणेकामी आर्कीटेक्ट यांना माहिती पूरवून पाठपुरावा करावा लागतो. सार्वजनीक बांधकाम विभाग यांचेकडील अंदाजपत्रकांचे नमुन्यानुसार आर्कीटेक्ट यांचेकडून अंदाजपत्रके तयार करुन घेण्याचे उदीष्ट आहे.

"श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी ) अधिनियम २००४" दि. २३ ऑगस्ट २००४ रोजी अमलात आलेला आहे. त्यानुसार संस्थावर शासनाचे नियंत्रण आलेले आहे. त्यामुळे संस्थानतर्फे हाती घेण्यात येणा-या बांधकाम प्रस्तावांचे संदर्भात शासनाचे सार्वजनीक बांधकामाची तांत्रीक मंजुरी घेणे

कार्यपध्दतीमध्ये सुसुत्रता आणण्याच्या दृष्टीने सोयीचे होईल. त्यासाठी उपरोक्त अधिनियमातील कलम ११, पोटलकल ६ अन्वये तयार करण्यात येत असलेल्या नियमामामध्ये यांसंबधित तरतूद समाविष्ट करता येईल.

संस्थानचे बांधकामाचे अंदाजपत्रकांना सार्वजनीक बांधकाम विभागाची तांत्रिक मंजुरी घेणे कामी शासनाकडे नियमाप्रमाणे आवश्यक ती फी भरावी लागेल.

तरी संस्थानतर्फे हाती घेण्यात येणाऱ्या बांधकाम प्रकल्पांच्या अंदाजपत्रकांना शासनाचे सार्वजनिक बाधंकाम विभागाची तांत्रीक मंजुरी घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,नवीन प्रसादालय बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग (महाराष्ट्र शासन) यांची तांत्रिक मान्यता घेण्यात यावी. तसेच त्यासाठी नियमाप्रमाणे फी देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४२. मौजे शिर्डी ता.राहाता स.नं. ११४/१ व स.नं. १२५ मधील चारीची नं.१२ साठी आर.सी.सी. पाईपलाईन व कम्पाऊंड भिंत बांधकामासाठी मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र. ५७४.** श्री साईनाथ रुग्णालयांअर्तगत सुपर स्पेशालीटी रुग्णालयाचे काम अंतिम टप्प्यात आलेले आहे. सदर रुग्णालयासाठी पार्कीगसाठी असलेली जागा कमी पडणार असल्याने श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थे मार्फत पाटबंधारे खात्याची रुग्णालयाचे लगत असणा-या चारी नं. १२ व चारीचे बाजूला असणारे स.नं. ११४/१ (पै.)व स.नं. १२४ मधील अंदाजे १५ गुंठे क्षेत्राची भाडेपट्टा तत्वावर मागणी केलेली आहे. सदर मागणी केलेले क्षेत्र हे चारी नं. १२ च्या संपादीत क्षेत्रातील असून विनावापर आहे. सुपर स्पेशालीटी रुग्णालयास वाहनांची वर्दळ लक्षात घेता उपलब्ध पार्कीगसाठीचे क्षेत्र कमी पडणार आहे. त्यामुळे पाटबंधारे खात्याकडील उपरोक्त क्षेत्राचा वापर मुख्यत्वे पार्कीगसाठी करता येईल.

सदरचे क्षेत्र संस्थानला मिळाल्यास संपादीत क्षेत्रात अतिक्रमणे होणार नाहीत व चारीतील प्रवाहातील सिंचनास अडथळा निर्माण न होता सदर क्षेत्रातील चारीवर संस्थान मार्फत १२०० मि.मी. व्यासाची आर.सी.सी. पाईप लाईन टाकून प्रवाह चालू ठेउन फक्त पृष्ठभागाचा वापर करण्यात येणार आहे व सध्या अस्तित्वात असलेल्या चारी रस्त्याऐवजी पर्यायी रस्ता उपलब्ध करुन दिला जाणार आहे. यासाठी महसूल व पाटबंधारे खात्याची मान्यता घेणेकामी कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर चारीचा भाग आर.सी.सी. पाईप लाईन टाकून बंद करणे कामाचे अंदाजपत्रक आर्कीटेक्ट मे. काबरे चौधरी, नाशिक यांनी तयार केलेले असून त्यानुसार सदर कामासाठी रु.२,३२,४००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे जुनी कम्पाउंड भिंत काढून चारीचे दक्षिण बाजूस नवीन कम्पाऊंड भिंत बांधकामासाठी अंदाजे रु. ७०,०००/- मात्र खर्च येईल. अशा प्रकारे एकूण रु. ३,०२,४००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदर खर्चास व कामासाठी वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे निविदा मागविणेकरीता कार्यवाही करता येईल अथवा काम लवकर होणेच्या दृष्टीने सध्या काम करीत असलेले ठेकेदार एन बी औताडे यांचेकडून सध्या काम करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही -बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४३. शिधा सामुग्री मिळणेबाबत श्री बंडू नाना वाबळे, श्री मारुतीबुवा भजनी मंडळ, राहाता यांचे पत्राबाबत**

**निर्णय क्र. ५७५.**खालील संस्थांनी मा.आमदार श्री राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील यांचेकडे श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला केलेला असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | बंडु नाना वाबळे श्री मारुतीबाबा भजनी मंडळ, मु.पो.ता.राहाता जि.अहमदनगर | सुवर्ण महोत्सवी भागवत सप्ताह कार्यक्रम दि.२३/९/२००५ ते दि.३०/९/२००५अखेर | शिधा - तांदुळ-३पोते, साखर-४पोते,तुप-१२डबे मुगडाळ-५०कि. मठ-१५० कि. गोडतेल-२डबे, शेंगदाणे-२०कि.पत्रावळी-१०००० नग, साबुदाणा-१पोते इ. वस्तुरुपाने मिळणेबाबत. रु.२५,०००/- |

यावर सविस्तर चर्चा होऊन, सुवर्ण महोत्सवी भागवत सप्ताह कार्यक्रमाचे कालाप्रसादाचे महाप्रसादाकामी या धार्मिक व सामाजिक कार्यक्रमासाठी संस्थानकडून अ.नं.१ साठी रु.२५,०००/-पर्यंतचा शिधा स्वरुपात मदत देणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४४. प्लॅस्टिक सर्जरी शिबीर घेणेबाबत.**

**निर्णय क्र. ५७६.** रोटरी क्लब ऑफ कोपरगाव यांनी त्यांचे दिनांक १६.९.२००५ चे पत्रान्वये श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) व रोटरी क्लब, कोपरगाव यांचे संयुक्त विद्यमाने श्रीसाईनाथ रुग्णालयात प्लॅस्टिक

सर्जरी शिबीराचे आयोजन करावे व याबाबत सहकार्य रुग्णालयाने करावे असे कळविलेले आहे. सदरचे पत्रासोबत मा.श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष, यांनी सदर शिबीर श्रीसाईबाबा संस्थान व रोटरी क्लब, कोपरगाव यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित करावे व या शिबीरासाठी संस्थानचे रुग्णालय उपलब्ध करुन द्यावे असे पत्राने कळविलेले आहे.

आजचे सभेत रोटरी क्लब, कोपरगाव यांचे पदाधिकारी उपस्थित होते. त्यांनी या शिबीराबाबत सभेस सविस्तर माहिती करुन दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, रोटरी क्लब, कोपरगाव व श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे संयुक्त विद्यमाने शिर्डी येथे प्लॅस्टिक सर्जरी शिबीर आयोजित करण्यास तसेच याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका, रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४५. ऑपरेशन थिएटर लाईट खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.५७७.** नवीन सुपर स्पेशालिटी रुग्णालयात एकूण सहा ऑपरेशन थिएटर आहेत. त्यासाठी एकूण ७+४ डोमचे ६ नग तर सिंगल डोमचे ४ नगाची मागणी केली होती. सदर ऑपरेशन थिएटरपैकी एक ऑपरेशन थिएटर कार्डीयाक ऑपरेशनसाठी असून उर्वरित पाच हे जनरल ऑपरेशन थिएटर्स आहेत.

कार्डीयाक ऑपरेशन थिएटरसाठी मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक ०६.०८.२००५ चे सभेतील निर्णय क्र. ३९३ अन्वये दोन ऑपरेशन लाईटस मे. एस.बी. डायनामेड, मुंबई यांचेकडून रुपये २१,०१,०३२.०० अधिक कस्टम ड्युटी या दराने खरेदी करणेस मंजूरी मिळाली असून त्यानुसार मे.एस.बी. डायनामेड, मुंबई यांना दिनांक ०५.०९.२००५ चे पत्रान्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

सदरचे सभेत तज्ज्ञ सल्लागार म्हणून बोलविलेले पुणे येथील डॉ.सरनोत यांनी सामन्य उपयोगासाठी येणारे लाईटस हे पुणे येथे मे.ए.जी. जोशी ॲण्ड कंपनी हे तयार करतात. त्यांच्या मालाची प्रत्यक्ष पहाणी करुन आवश्यक तेवढे नग त्यांचेकडून घेता आल्यास संस्थानसाठी लाभदायक ठरेल असे ठरले आहे.

त्यानुसार दिनांक १५.०९.२००५ रोजी मा. विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, वरिष्ठ प्रशासक डॉ.टाकळकर व प्रशासकीय अधिकारी श्री पी.टी. जोशी हे पुणे येथे समक्ष गेले होते. त्यांनी मागणीप्रमाणे लाईटचे कोटेशन्स आणलेले आहेत. ते खालीलप्रमाणे -

| Sr.No | Description | Quantity | Price per unit | Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01 | Joshis Surgical Light Model M 7 (Sat) Combination of M7 & AG 4 with Heat Reducing, colour correcting filters with 12v/50 W Halogen Lamps | 03 | 1,75,000.00 | 5,25,000.00 |
| 02 | Model SLPA Mobile Surgical Light with 19" Dome | 02 | 18000.00 | 36,000.00 |
| 03 | Model Del 14 (Mobile ) Mobile Light for Minor Surgery | 02 | 8,500.00 | 17,000.00 |
| | | | Total Amount | 5,78,000.00 |
| | Less Special Discount 20% (After Negotations | | | 1,15,600.00 |
| | | | Total amount | 4,62,400.00 |
| | | | Add Vat@ 12.5% | 57,800.00 |
| | | | Total Rs. | 5,20,200.00 |

वर्तमानपत्रातील निविदेस अनुसरुन सात + चार मॉडेल्सचे ओ.टी लाईटसाठी खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहे.

**A) Hanaulux O.T. Light**

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नांव | कोटेशन्समधील मूळ दर | दिनांक ०६.०८.२००५ रोजी चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेल दर |
|---|---|---|---|
| 01 | Hospitech Mumbai | 265000.00 | 10% Discount |
| 02 | Janak Mumbai (AXL 5501) | 569000.00 | 550000.00 |
| 03 | Minitek, Mumbai Model –1 | 288250.00 | 237806.00 |
| | Model -2 | 360000.00 | 297000.00 |
| 04 | HL Mumbai –sola –700-500-500 | 1492593.00 | 1000000 + 12.5% Vat |
| 05 | Vaibhav , Pune | 248000.00 | 248000.00 |
| 06 | Qualisurge Pune | 92000.00 | 92000.00 |
| 07 | Esbee, Mumbai | 2400000.00 | 2101032.00 + custom Duty |

तर सिंगल डोमचे लाईटसाठी वर्तमानपत्रातील जाहिरातीस अनुसरुन खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

B) O.T Single light Dome -

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नांव | कोटेशन्समधील मूळ दर | दिनांक ०६.०८.२००५ रोजी चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेल दर |
|---|---|---|---|
| 01 | Hospitech Mumbai | 64000.00 | 10% Discount |
| 02 | Janak Mumbai (AXL 5501) | 334000.00 | 330000.00 |
| 03 | Esbee, Mumbai | 970024.00 | 970024.00 |
| | | 265474.00 | 265474.00 |
| 04 | Minitek, Mumbai Model –1 | 74000.00 | 17.5% Discount |
| | Model –2 | 30000.00 | |
| 05 | Vaibhav , Pune | 65000.00 | 65000.00 |
| 06 | Qualisurge Pune | 15000.00 | 15000.00 |
| 07 | | 2400000.00 | 2101032.00 + custom Duty |

(अ) सात + चार या मॉडेल्ससाठी मे.क्वॉलिसर्ज, पुणे यांचे प्रती युनिट रुपये ९२,००० सर्व करांसह असे आहेत. म्हणजे ते मे.ए.जी.जोशी ॲण्ड कंपनी यांचे दरापेक्षा कमी आहेत.

(ब) सिंगल डोमलाईटसाठी देखील मे.क्वॉलिसर्ज, पुणे यांचे प्रती नग १५०००/- सर्व करांसह आहेत. म्हणजे ते मे.ए.जी.जोशी ॲण्ड कंपनी यांचे दरापेक्षा कमी आहेत. मे.जोशी यांच्या लाईटची तांत्रीक क्षमता मे.क्वॉलिसर्ज, पुणे यांचेपेक्षा चांगली आहे. ती फिलीप्स कंपनीच्या क्वालिटीशी जूळणारी आहे.म्हणून मे.ए.जी. जोशी ॲण्ड कंपनी, पुणे यांचे लाईटस् उपयुक्त होणार असल्याने ते खरेदी करणेचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४६.** **रुग्णालय नवीन इमारतीमध्ये वाढीव सुविधा पुरविणेसाठी बांधकामाबाबत**

**निर्णय क्र.५७८.** मा.विश्वस्त डॉ.प्यारेलाल तिवारी व कॅप्टन सुरेश वासुदेवा यांनी दिनांक १८.०९.२००५ रोजी नवीन रुग्णालय इमारतीमध्ये चालू असलेल्या वाढीव बांधकामाची पहाणी केली त्यावेळी मा.डॉ.व्ही.जी.टाकळकर, वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये, श्री पी.टी.जोशी, प्रशासकीय अधिकारी व श्री आर.बी.आहेर, वरिष्ठ मुख्य अभियंता हे उपस्थित होते. सदर पहाणीचे वेळी त्यांनी खालीलप्रमाणे वाढीव कामे करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

| | |
|---|---|
| ०१. जुनी डी.इमारत | |
| अ) सी.टी.स्कॅन कक्ष | ०१. नवीन व्हिनाईल (Vinyle flooring) बसविणे |
| | ०२. दरवाज्यांना वुड फिनिशचे लॅमिनेशन लावणे. |
| | ०३. खिडक्यांना बिडींग (Wooden beading) लावणे |
| | ०४. रुममध्ये असणारे इलेक्ट्रीकल मेन स्वीचला लॅमिनेट प्लायवुडचे बॉक्सींग करणे |
| | ०५. भिंतीचे संपूर्ण पृष्ठभागावर (Wooden cladding) करणे |
| ब) | रिसेप्शन काऊंटर (Reception counter) तयार करणे |
| ०२. | सर्व अतिदक्षता वॉर्ड (ICUWards) ना फॉल्स सिलींग करणे |

वरील सर्व कामे रुग्णालय लवकरात लवकर सुरु करणेचे दृष्टीने तातडीने करणे आवश्यक आहेत. याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास व सध्या काम करीत असलेल्या ठेकेदारांकडून काम करुन घेण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये/ बांधकाम विभागप्रमुख)

वरील निर्णय क्र.४७७ ते ५७८ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.
यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(भाऊसाहेब रा.वाकचौरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी )

स्वाक्षरीत/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी )